# माणूस

। शनिवार । तेरा डिसेंबर एकोणीसशे पंचाहत्तर । एक रुपया ।

## तुमच्या डाव्या आणि उजव्या हाताला...

तुम्ही नेहमीच मोठमोठ्या गोष्टी बोलता; पण आचरणात काहीच आणीत नाही, याचे मला अत्यंत दुःख होते. लेखकांनी, कवींनी आणि कलावंतांनी आपले क्षुद्र हेवेदावे, क्षुद्र महत्त्वाकांक्षा आणि क्षुद्र स्वप्ने यांचा त्याग करून राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी आपली कला आणि प्रतिभा राबवली पाहिजे. तुमच्या उजव्या आणि डाव्या हाताला पसरलेले दैन्य आणि दारिद्र्य तुम्हाला दिसत नाही काय ? स्वतःच्या स्वप्नकोषातच संतुष्ट होऊन राहणे हा आत्मद्रोह आहे. अद्वैत हे मनातच ठेवायचे असते, ते आचरणात कधीच आणावयाचे नसते—हे कुठचे तत्त्वज्ञान ? पतित, दलित आणि शापित जनतेच्या कल्याणासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक भान ठेवून लेखकांनी, कवींनी आणि कलाकारांनी या संक्रान्ति-कालात आपली प्रतिभा पणाला लावायला पाहिजे ! उठा, जागे व्हा आणि कार्याला लागा ! आजचा भारतीय लेखक अप्रामाणिक, ध्येयशून्य आणि गतिभ्रष्ट आहे असा पाश्चात्य राष्ट्रांत जो दुर्लौकिक झालेला आहे तो दूर करणे हे तुमचे आद्य कर्तव्य आहे.

—स्वामी विवेकानंद

मद्रास येथील ट्रिप्लिकेन येथे साहित्यसमितीत दिलेले व्याख्यान

३ मार्च १८९७

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : सत्ताविसावा**

**१३ डिसेंबर १९७५**

**मूल्य : एक रुपया**



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


# सप्रेम नमस्कार

☐ नुकतेच विजय तेंडुलकर यांचे महाराष्ट्र टाइम्सच्या दिवाळी अंकातील 'मरेपर्यंत फाशी' हे चक्षुर्वै सत्यं घटनेचे लेखरूप वाचले. 'फाशी जाणे' हा अनुभव कसा काळीज गोठवणारा, वज्रनिष्ठुर आणि एका अर्थाने करुणाजनक असतो हे तेंडुलकरांनी हलवून सोडणाऱ्या भाषेत लिहिले आहे. आपण माणूसमध्ये प्रसिद्ध करीत असलेल्या 'थँक्यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीच्या पूर्वार्धातील फाशी जाऊ घातलेला नायक त्याच अनुभवाचे हृदय गलबलविणारे पण तितकेच धीरोदात्त स्वरूप दाखवून वाचकाचे मन एकाच वेळी अस्वस्थ आणि स्तिमित करतो.

या कादंबरीच्या रूपाने एक रसरशीत–जिवंत जीवनचित्र मराठी वाचकापुढे आले यात शंका नाही. आजकालच्या दिवाळी–अंकवादी –साहित्यसृष्टीत अशी निर्मिती अभावानेच दिसते. एका जेलबंद वातावरणातील पीळदार संघर्ष मनाचा कोपरा न् कोपरा भारून टाकतो. विशेषत: कैदीनंबर आठसोबयालीस जेव्हा आपल्या देहमात्र–संपत्तीचे मृत्युपत्र स्वदेशबांधवांकरिता तयार करतो, (तेही श्रमकरी बांधवांना अग्रक्रम देऊन) तेव्हा साक्षात् अमरताही त्याच्यापुढे मान लववील असे वाटते. आणि म्हणूनच त्याचा 'कम्युनिझम' ही उसना–उपरा न वाटता स्वदेशी-चिंतनात भिनत जाणारा कष्टकऱ्यांचा राष्ट्रवाद वाटू लागतो.

एखादे राजकीय तत्त्वज्ञान हा कादंबरीचा विषय होण्यात उघड मर्यादा आहेत. त्या दृष्टीने एका राजकीय तत्त्वज्ञानाच्या दाहक ज्वालेची ही एक क्षणान्त कहाणी आहे हे कोणीही कबूल करील. मात्र अशी जीवन–ज्वाला प्रसंगी सूर्यालाही पेटवू शकते, त्याचप्रमाणे विझल्यानंतर जीवनवेडा चटकाही लावून जाते. एका जातिवंत कलावंताच्या लेखणीची ही केवळ एक तेजोरेखा आहे, हे वाचकाने लक्षात घ्यावयाचे असते.

सावरकरांच्या 'माझी जन्मठेप' मधील जेलर बारी आणि आल्बेर कामूंचा 'आउटसाइडर' स्थलकालमर्यादा ओलांडून एकाच अनुभवपातळीवर आणण्यात बर्वे कमालीचे यशस्वी झाले आहेत.

**मुकुंद कृष्ण इनामदार,** शिरूर

## संदेश

कधी तरी
त्यांच्या
मंत्रोच्चाराने
सूर्य उगवला...
आणि आपल्या
शब्दाशब्दांमधून
त्यांनीच मग
प्रकाश
जागवला ॥

खिन्नभार काळोख रात्री
पडणाऱ्या
दु:स्वप्नांमधून
हुतात्म्यांनो,
तुम्हालाच
जाग आली असेल तर
चिरेबंद थडग्यांवर बसून
गाणाऱ्या पाखराने
खात्रीने !
आमच्यासाठीच आता
काही संदेश
आणलेला असेल ॥

**– मधुश्री**

# अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन, कराड

# अधिवेशन ५१ वे

## उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण

कराड येथे भरलेल्या एक्कावन्नाव्या मराठी साहित्यसंमेलनाच्या समारोपप्रसंगी भाषण करताना अध्यक्ष श्रीमती दुर्गाबाई भागवत यांनी या संमेलनाचे उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण प्रसिद्ध झाले नाही याबद्दल खेद व्यक्त केला. वास्तविक इतर भाषणे जशी वृत्तपत्रांतून व इतरत्र प्रसिद्ध झाली तसे हेही भाषण रिवाजाप्रमाणे प्रसिद्ध व्हायला काहीच हरकत नव्हती. ते छापले गेलेले होते व त्याच्या प्रतीही संमेलनाच्या सुरुवातीला वृत्तपत्रप्रतिनिधींना देण्यात आलेल्या होत्या. तसे या भाषणात न छापण्यालायक असे काही न आढळल्याने 'माणूस'च्या वाचकांसाठी ते येथे पुनर्मुद्रित केले आहे. संमेलनासंबंधी आणखी काही मजकूर पुढील अंकात देण्याचा विचार आहे.

अध्यक्ष श्रीमती दुर्गाबाई भागवत, स्वागताध्यक्ष भारताचे विदेशमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व सभ्य बंधुभगिनींनो,

हे संमेलन श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या अध्यक्षतेखाली भरत आहे ही महाराष्ट्र सरस्वतीच्या सौभाग्याची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे मराठी साहित्यकारांच्याही भाग्याची गोष्ट आहे. कोणत्याही मराठी साहित्यसंमेलनाचा मान व प्रतिष्ठा वाढविणारी व्यक्तीच अनेक वेळा मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान झाली आहे, असे या संमेलनांच्या इतिहासाचे सिंहावलोकन केले असता लक्षात भरते. दुर्गाबाईंच्यामुळे हेही संमेलन इतिहासात सुंदर अक्षरांनी अशाच रीतीने कायम नोंदले जाईल, असा आम्हास भरवसा आहे. असा भरवसा आहे म्हणूनच योगायोग असा की या आंतरराष्ट्रीय महिला-वर्षाच्या अवधीत दुर्गाबाई अध्यक्ष म्हणून लाभल्या आहेत. या वर्षाच्या महिम्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे दुर्गाबाई होत. आपल्या या संमेलनाचा मंडप त्यांचे विचार व त्यांची प्रतिभा यांच्या वलयांनी वेष्टून टाकला आहे, असे मला भासत आहे.

मराठी साहित्यसंमेलनांच्या बहुतेक माजी अध्यक्षांनी वैशिष्टयपूर्ण असे पथप्रदर्शक विचार मांडले आहेत तशीच प्रस्तुत अध्यक्षांच्या बद्दलही अपेक्षा आहे. महाराष्ट्र साहित्यपरिषदेने संमेलनाध्यक्षांची १९०९ पासून १९६९ पर्यंतची भाषणे, डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी संपादिलेली, तीन खंडांत प्रसिद्ध केली आहेत. त्यांचे विहंगावलोकन करीत असता त्यांतील विचारांतील मुख्य मुद्दे साधारणपणे खालीलप्रमाणे लक्षात भरतात : (१) अगदी प्रथम मराठीला आधुनिक विद्यापीठामध्ये म्हणजे उदा. मुंबई विद्यापीठामध्ये अध्ययनविषय म्हणून स्थान मिळणे योग्य आहे, असा विचार मांडला गेला. मराठी ही सर्व विषयांच्या अध्ययन–अध्यापनाची विद्यापीठाची भाषा व्हावी, ती मुख्य माध्यम व्हावी, असाही दृष्टिकोन अनेकदा मांडण्यात आला. (२) शास्त्रे व कला किंबहुना सर्व आधुनिक विद्या यांचे साहित्य मराठीत निर्माण व्हावे, याही विचारांना चालना मिळाली. (३) अनेक अध्यक्षांनी, थेट कीर्तिकरांच्या अध्यक्षीय भाषणापासून आतापर्यंत, मराठी साहित्यगंगेचे विहंगावलोकनही केले आहे. त्यात मराठीत झालेले काव्य, कादंबरी, नाट्य, लघुकथा, ललितनिबंध इ. ललितसाहित्य; कोश, व्याकरण, निबंध व अन्य प्रकारचे शास्त्रीय साहित्य यांचे मूल्यमापनही केले आहे. (४) कला व साहित्य यांच्या समीक्षेचे तात्त्विक प्रश्नही अनेक अध्यक्षांनी विचारात घेतले आहेत आणि (५) कित्येक वेळा साहित्य व राजकारण यांच्या परस्परांमधील गुंतागुंतीचा कठीण प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा त्यातही मार्गदर्शन करण्यास मागेपुढे पाहिले नाही. उदा., संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न.

या संमेलनाचा प्रथम उपक्रम भारताच्या आधुनिकतेचे अग्रदूत प्रज्ञावंत महादेव गोविंद रानडे यांनी पुणे येथे 'मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन' भरवून केला. त्याला लोकहितवादींचेही नेतृत्व लाभले होते. रानडे व लोकहितवादी यांच्या शुभ हस्तांनी मराठी साहित्याच्या आधुनिकतेचा उषःकालच सूचित केलेला दिसतो. मराठी साहित्यकारांची प्रतिभा भविष्यकाळाला अभिमुख झाली, ती भव्य भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर हे त्यानंतरच्या मराठी वाङमयाच्या धीरे धीरे चाललेल्या यात्रेवरून लक्षात येते. मध्ययुगीन मराठी साहित्याचे लक्ष पारमार्थिक श्रेयावर केंद्रित झाले होते, तर आधुनिक मराठी साहित्याचे लक्ष ऐहिक श्रेयावर केंद्रित झालेले आहे. हीच गोष्ट सहाव्या संमेलनात अध्यक्ष भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनी दुसऱ्या शब्दांत सांगितली. ते म्हणतात, प्राचीन मराठी साहित्य देवभक्तीवर आणि आधुनिक मराठी साहित्य देशभक्तीवर आधारलेले आहे.

सयाजीमहाराजांच्या कृपाछत्राखाली वडोदे येथे कै. का. र. कीर्तिकर यांनी शास्त्रविषयक व कलाविषयक ग्रंथ देशी भाषांतूनच

का झाले पाहिजेत, हे मार्मिक भाषेत सूक्ष्म विवेचन करून मांडले आहे. ते म्हणतात की, भावना, विचार व वर्तन यांना जन्मल्यापासून जी भाषा वळण देते, मानसिक व आध्यात्मिक वाढ ज्या भाषेत होते, जीवात्म्याशी जी भाषा तन्मय झालेली असते, अशी भाषा एकच असू शकते. तिलाच मातृभाषा म्हणतात. हे स्वभाषेच्या द्वारा ज्ञानप्राप्तीचे समर्थन करणारे पहिले कारण होय. त्यांनी सांगितलेले दुसरे कारण तितकेच महत्त्वाचे आहे. सामान्य लोकांना ज्ञान द्यावयाचे आहे ना; मग ते प्रत्यक्ष मातृभाषेतच चांगल्या रीतीने देता येईल. सामान्य जनशिक्षणात शास्त्रीय विषयांची गणना करून ज्ञानाचा प्रसार आपणास करावयाचा आहे. यासंबंधी त्यांच्या भाषणातील एक उत्कृष्ट परिच्छेद कायम ध्यानात ठेवण्यासारखा आहे :—

' ह्या कार्यार्थ किंवा दुसऱ्या कोणत्याही कार्यार्थ आपली मायभाषा असमर्थ आहे, असे कोणी समजू नये. कवी मुक्तेश्वरांनी नलराजाविषयी म्हटले आहे की, ' सुरमंडळी सहस्रनयन । ग्रहमंडळी सहस्रकिरण । पाताळभुवनी सहस्रवदन । तेवी तो मान्य भूतळी ॥ ' मी त्याच उपमा मराठी भाषेला देऊन म्हणतो की, आमच्या परिस्थितीची एवढी व्यापकता व आमच्यापुढे असलेल्या सहस्रावधी भिन्न विषयांचे आकलन करणारी जिची दृष्टी आहे, ती ही आमची मराठी भाषा खरोखर सहस्रनयन आहे. ग्रहमंडळांचा सहस्रकिरण जसा सहस्रावधी सचेतन पदार्थांवर आपले किरण पाडून त्यांना इष्ट स्वरूप देत आहे, त्यांकडून इष्ट कार्य घडवून आणीत आहे, तसेच आमच्या ह्या भाषेचे सहस्रावधी किरण ज्या ज्या व्यक्त किंवा अव्यक्त विचारांवर पडतील, त्या त्या विचारांना योग्य स्वरूप येऊन त्यांचा जगास उपयोग झालाच पाहिजे ! ज्याने अखिल भूलोक आपल्या मस्तकी धारण केला आहे, तो सहस्रवदन शेष; जिची अखिल शब्दसृष्टी आपल्या मस्तकावर धारण करण्याची योग्यता आहे, ती सहस्रवदन मराठी भाषा ! अशा भाषेचा योग्य उपयोग करणे हे ग्रंथकाराचे कर्तव्य आहे. '

अकोला येथील १९१२ च्या संमेलनाचे अध्यक्ष महान कादंबरीकार हरी नारायण आपटे यांनी या कीर्तिकरांच्या विचारांना दुजोरा दिला आहे, तो असा :—

' मातृभाषेचा अभिमान आपण धरला पाहिजे. तो ज्यांनी धरला, त्यांच्या अभिमानामुळेच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. इतकी की, वाटेल ते शिक्षण तिच्याद्वारे देता येईल, वाटेल तो विचार तिच्या द्वारे उच्चारता येईल, वाटेल तो विकार तिच्याद्वारे जागृत करता येईल व वाटेल तसे लोकमनोरंजनही तिच्याद्वारे करता येईल. सारांश, वाङमयाचे सर्व हेतू सिद्ध करण्याइतके तिच्या अंगी सामर्थ्य आले आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आपण करून तिला अधिक समर्थ करणे हे आपल्या हातचे आहे. एवढ्याकरिता जे या कार्यक्षेत्रात आज काम करताहेत त्यांना आणि जे अद्यापी मर्यादारेषेवर उभे राहून त्या काम करणाऱ्यांची नुसती मौज पहात आहेत, त्यांना मी पुन: एकदा त्या उपनिषदद्रष्ट्या ऋषिवरांच्या शब्दांनी प्रार्थना करतो :—

वाग्वै तत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति । स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते । यावद्वाचो गतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते ॥

" वाणीच सर्व ज्ञान करून देते. तेव्हा वाणीची उपासना करा. जो वाणीला ब्रह्म समजून तिची उपासना करतो, तो वाणीच्या साम्राज्यात स्वतंत्र होतो. वाणीला ब्रह्म समजून उपासना करतो तोच असा होतो. "

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून ललितकला व साहित्य यांच्या समीक्षांच्या तत्त्वांसंबंधी वारंवार उद्बोधक असा ऊहापोह झालेला आहे. त्यांतील अनेक विचार चिरंतन मूल्यांचे आहेत. त्यांपैकी चिरस्मरणीय असा समीक्षासिद्धांत साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी बडोदे येथील १९२१ च्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून मांडला आहे. वाङमयानंदाची चर्चा त्या कालखंडात मराठी साहित्यात चालू होती. वाङमयातील रस व अलंकार यांसंबंधी विवरण करताना ते म्हणतात : " या आनंदाने एक प्रकारची तल्लीनता येते व तो आनंद फारच उत्कट झाला, तर त्यापासून समाधीही लाभू शकेल. या दृष्टीने पाहता ' खरी सविकल्प समाधि उत्पन्न करू शकते ते वाङमय, ' अशी नवीन व्याख्या मी बनविली आहे. वाङमयाची कोणतीच व्याख्या समर्पक होऊ शकत नाही, हे मी जाणतो. तरीही ही माझी व्याख्या आपल्या विचाराकरिता मी सादर करीत आहे. " ही साहित्यसम्राटांची व्याख्या श्रेष्ठ ललितसाहित्याला वा ललितकलेला जशी लागू पडते, तशीच ती उत्कृष्ट शैलीतील इतिहास, बर्ट्रांड रसेलसारख्या प्रसन्न शैलीत लिहिणाऱ्या विचारवंतांचे तात्त्विक निबंध, किंबहुना काही वैज्ञानिक प्रबंध अथवा गणित यांनाही लागू पडते.

कराड हे महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील एवढेच नव्हे, तर इतिहासपूर्व कालातील अत्यंत महत्त्वाचे एक सांस्कृतिक केंद्र आहे. प्राचीन कालीन अनेक राजांची ही राजधानी होती असेही म्हणतात. स्कंदपुराणात याला आदितीर्थ म्हटले आहे. दोन नद्यांच्या संगमालाही धर्मशास्त्राच्या परिभाषेप्रमाणे ' तीर्थ ' ही संज्ञा येते. साहित्यिकांना आनंद वाटावा, असे हे कृष्णा-कोयनांच्या प्रीतिसंगमाचे तीर्थस्थान आहे. तीर्थस्थानी पूर्वजांचे स्मरण करून त्यांना श्रद्धापूर्वक आदरांजली अर्पण करायची असते. साहित्यसंमेलनाचे दिवंगत असे अनेक माजी अध्यक्ष येथे मला आठवतात. उदाहरणार्थ, सहाजीमहाराज गायकवाड, भवानराव पंतप्रतिनिधी, हरी नारायण आपटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, वि. दा. सावरकर, प्र. के. अत्रे, श्री. म. माटे, शं. दा. पेंडसे, कुसुमावती देशपांडे, भा. वि. वरेरकर, शं. द. जावडेकर, न. वि. गाडगीळ इत्यादी. ज्यांचा ज्यांचा मी येथे निर्देश केला आहे, त्यांनी त्यांनी मराठी वाङमयगंगेला सुंदर असे साहित्याचे घाट बांधले आहेत व तिच्या तीरावर नवीन नवीन मंदिरे उभारली आहेत.

आपल्या अध्यक्ष दुर्गाबाई भागवत यांनी मुंबई येथील मराठी साहित्यसंघाच्या सत्कारप्रसंगी नुकतेच जे भाषण केले, त्याचा येथे मी कृतज्ञतापूर्वक निर्देश करतो. दुर्गाबाईंनी आपल्या ' ऋतुचक्र ' या ललित निबंधात ' मार्गशीर्ष ' हा शांत व क्षुब्ध मास होय, असे म्हटले आहे. या प्रदेशाच्या आकाशात शांतता भरलेली दिसते; परंतु महाराष्ट्रातील येथे जमलेल्या व न जमलेल्या बहुसंख्य लहानमोठ्या साहित्यिकांच्या हृदयाकाशात क्षोभ भरलेला दिसतो; परंतु हा क्षोभ

पृष्ठ ३१ वर

# महापूर

## भावनांचा, दिवास्वप्नांचा

पुणे केंद्रातील महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा २ डिसेंबरला पार पडल्या. गेल्या आठवड्यात त्यांचे निकाल जाहीर झाले. त्यावर उलटसुलट चर्चाही झाल्या. गेली आठ-दहा वर्षे नियमितपणे स्पर्धेतील या नाट्य-प्रयोगांची दखल 'माणूस' घेत असतो. या वर्षी मात्र ते जमू शकले नाही. आवर्जून ज्यांची नोंद घ्यावी असे दोन-तीनच नाट्यप्रयोग या वर्षी सादर झाले. त्यातील 'महापूर' या नाटकाचे डॉ. उल्हास लुकतुके यांनी केलेले हे समीक्षण...

काम संपले तेव्हा चांगले नऊ वाजले होते. दिलीप आला. हातात भले मोठे पार्सल होते. म्हणाला, 'आर्टवरची पुस्तकं आणली आहेत. पाहू या का?' पाहता पाहता "क संपूर्ण पुस्तक साल्व्हादोर दालीवर निघाले. मला भलताच आनंद झाला. एकंदर पेंटिंग्ज वगैरे शेवटची पाहिली त्याला काही वर्षे झाली असतील. त्यात साल्व्हादोर दाली-सर्वश्रेष्ठ सरिअॅलिस्ट–म्हणजे चैनच. या अति-वास्तववादी पेंटिंग्जची मला नेहमीच भुरळ पडते. छिन्नविच्छिन्नतेचा एवढा भयमिश्रित सुखद आनंद इतर कुठे क्वचितच मिळतो.

पुढे दोन दिवसांनी विद्याधर म्हणाला, 'आज रात्री 'महापूर'ला ये.' म्हटले, 'ठीक आहे. येतो.' थिएटर अॅकॅडमीची नाटके पाहणे नेहमीच सुखावह असते. तर पुढे त्याने शेपूट जोडले की, 'ये आणि काही तरी लिही!' आता मात्र पंचाईत आली. नाटके पहाण्याची सवय सुटूनही केवढा काळ लोटला होता! म्हटले, 'हे तर कठीण दिसते आहे;' पण एकंदर मला या 'महापूर' बद्दल कुतूहल होतेच. तेव्हा जाण्याचे ठरवले.

मनोविकाराशी संबंधित वर्तुळात विद्याधरने 'महापूर' वाचले होते; पण तेव्हा मी तिथे नव्हतो. एवढे कानावर आले होते की मनोव्यापाराचा फारच आकर्षक खेळ लेखकाने मांडलेला आहे. 'महापूर' बद्दल माहिती होती ती एवढीच आणि आता हा म्हणत होता 'ये आणि लिही!' प्रश्नच आला. कुठली भूमिका घेऊन जावे? तेव्हा ठरवले की, अगदी साधा प्रेक्षक म्हणून जावे आणि आपले व्यावसायिक ज्ञान तर अगदी गुंडाळून ठेवून जावे. बघू या तरी मंडळी काय काय करतात ते. इतके ठरवून गेल्यावर माझ्या मनावर घातलेले हे आवरण जर हा नाट्यप्रयोग फोडू शकेल तर तो विजयच समजला पाहिजे.

म्हणून आत जाऊन बसलो. पडदा वर गेला आणि रंगमंचावर जे पात्र होते त्याने पहिल्याच काही पावलांत स्टुलावरून दोन वेळा छलांग मारली. पटकन एक मन म्हणाले, 'मॅनरिस्टिक.' दुसरे मन म्हणाले, 'पुरे. पुरे. हा नायक दिसतो आहे एवढा निष्कर्ष पुरे!' तेवढ्यात हा नायक इकडे तिकडे हिंडून टेबलाजवळ जाऊन बसला. असा बसला की बस! पहिल्या मनाने एकदम दाद दिली. 'सिट्स् क्राउचिंग विथ ड्रूपिंग शोल्डर्स. अनड्यूली सेल्फ अॅबसॉर्बड्.' तर पुढे नायक ऊर्फ खरा मोहन गोखले याने एक पेटी उघडली व काही तरी मोजल्याचा खट्खट् आवाज व मोजल्याचा एक–दोन–तीन–चार ...असा भयाण आवाज ऐकू येऊ लागला. पहिले मन म्हणाले, 'कलेक्टस् रबिश. डिटॅच्ड फ्रॉम रिअॅलिटी.' दुसरे मन म्हणाले, 'चुप. नीट पहा!' आणखी एक पात्र अवतरले. नायक बोलू लागला. काही वाक्यांतच त्याने असे काही तिरकस लॉजिक मारले की पहिले मन ओरडून म्हणाले, 'स्किझोफ्रेनिया, स्किझोफ्रेनिया!' दुसऱ्या मनाचा आवाजसुद्धा निघाला नाही. पहिल्या काही मिनिटांतच नाटकाने विजय मिळवला होता. तेवढ्यात सूट पहेरलेले आणखी एक रुबाबदार पुरुष-पात्र स्टेजवर अवतरले. मनात विचार आला हा मनोविकारतज्ज्ञ तर नाही? चार वाक्यांत खात्री पटली की हा मनोविकारतज्ज्ञच!

इथून पुढे पहाण्याजोगे तसे काही उरले नव्हते. रोगनिदान झाले होते. मनात विचार आला, आता बहुतेक केस हिस्टरी पहावी लागणार–माझ्या दृष्टीने लेखक, दिग्दर्शक व नटांसमोर हे भलतेच मोठे चॅलेंज होते. मी हळूच प्रेक्षकांवर नजर फिरवली. काही जण नायकाच्या विचित्र तर्कविसंगतीवर खूष होऊन हसत होते, काही जण भांबावले होते. काही जण पुढे काय होते आहे याबद्दल उत्सुक होते. पुण्यासारख्या ठिकाणी प्रेक्षक बहुतेक सुज्ञ, बहुश्रुत व उच्चशिक्षित असतात. थिएटर-अॅकॅडमीचा प्रेक्षकवर्ग तरी असा असतोच; पण या वर्गाला सुद्धा मनोव्यापार व मनोविकार याबद्दल कुतूहल असते. त्यामुळे या प्रेक्षकांना काही तरी विचित्र देऊन दोन तास खिळवून ठेवणे किंवा खूष करणे सहज शक्य होते. कुठलाही स्मार्ट लेखक, दिग्दर्शक वा नट ते करू शकेल. माझ्या मनात शंका येत होती, 'रोगनिदान माहीत आहे. केस

हिस्टरीच्या' लाइनवर नाटक पुढे वाटचाल करणार हेही उघड आहे. प्रश्न एवढाच उरला आहे की थिएटर अॅकॅडमीचा हा 'इंटुक' म्हणून गाजलेला ग्रुप आता फक्त स्मार्ट ठरतो की यातून पुढे काही आर्ट फॉर्म सादर करतो? शिवधनुष्य उचलायला निघाले आहेत खरे. आता बघू या काय होते ते.'

पण मंडळी ताकदीची निघाली.

तशी या नाटकाची कथा सांगता येणार नाही. एक तर तसे या नाटकात घडत काहीच नाही. दुसरे रिॲलिटी व फॅंटसी यामधून हे नाटक सारखे जा-ये करत असते. तिसरे नाटकाच्या एकंदर बैठकीतच मनोव्यापार महत्त्वाच्या घटना केवळ निमित्तपात्र. त्यामुळे संगतवार घटना सांगून कथा सांगण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नाही. एवढे सांगितले तर पुरे की एका स्किझोफ्रेनिया या रोगाने मन दुभंगलेल्या तरुणाची ही कथा. त्याचा मनोभंग कसा झाला, पालकांचा वाटा किती, प्रेयसी–जी त्याची कधीच नव्हती–तिचा वाटा किती, शेजाऱ्यांचा किती, परिस्थितीचा परिणाम–एकलकोंडेपणाचा बळी अशा किती तरी गोष्टी कधी वास्तव तर बहुतांश फॅंटसीत घडणाऱ्या घटना दाखवत नाटक पुढे जाते. हिंदी सिनेमातल्यासारखा एक मनोविकारतज्ज्ञ आणून प्रेक्षकांचा त्याबाबत मुळीच घोळ होऊ नये अशीही पक्की व्यवस्था करून टाकली आहे. नाटक असे मार्गक्रमण करीत असता स्किझोफ्रेनिया या रोगाची किती तरी लक्षणे अगदी क्लासिकरीत्या या मंडळींनी दाखविली. खरे म्हटले तर हेही नसे थोडके. मनोविकाराच्या नावाखाली कित्येक वेळा असत्य मूर्खपणा पहावा लागतो. तेव्हा कलात्मकरीत्या या रोगाची लक्षणे जशी खरी असतात तशी पहायला मिळणे हेही शाबासकी देण्याजोगे आहे. जागोजागी मन दाद देत होते, 'अरे हे टेलेस्कोपिक थिंकिंग, अरे, ही आयडिया ऑफ डीपर्सनलायझेशन, अरे, हे स्क्यू लॉजिक.' खूप बरे वाटले. कौतुक याचे वाटते की लेखक, दिग्दर्शक व नटांपैकी कोणीही मनोविकार किंवा मानसशास्त्र यात प्रशिक्षित नाहीत.

केस हिस्टरीच्या अंगाने नाटक पुढे सरकणार हे तर उघडच होते. रोगाची काही लक्षणेही दिसली. बरे वाटले. एक भीती वाटत होती. शास्त्रीय नियतकालिकात असते तसे एकांगी, प्रामाणिक व डाउन टु अर्थ असे तर हे नाटक होणार नाही? वर म्हटलेले सर्व गुण असून सुद्धा शास्त्रीय नियतकालिकाप्रमाणे कंटाळवाणी झालेली काही नाटके मी पाहिलेली आहेत.

पण त्यासाठी लेखकाने मोठा चतुर घाट घातला होता. तरुण नायक-त्याचे सामान्य चाळकरी शेजारी व स्वातंत्र्यसैनिक पालक या सगळ्यांचे मनोव्यापार मोठ्या मनोहारी पद्धतीने त्याने रंगविले. भूतकाळात रमणारे निष्प्रभ आईवडील व त्यांच्या आशानिराशा याला सामाजिक उपहासाची एक झालर त्याने लावली आहे. त्यामुळे नाटकाची पार्श्वभूमि एकदम प्रचंड होते व राग-लोभ-शृंगार उपहास-हास्य अशा किती तरी रस व भावनांची त्याठायी त्याने गल्लत केली आहे. या नाटकात प्रेक्षक कधी ताणून बसत होते, कधी हसत होते, कधी रडत होते, कधी दया, कधी सहानुभूती दाखवीत होते. एकंदर सगळे महापुरात वाहून गेले होते.

नाटक पाहताना किती तरी वेळा फ्राइडची आठवण आली. साधारणतः वापरलेली प्रतीके व विवरणे फ्रॉइडियन आहेत. मनोविकारतज्ज्ञाची ट्रीटमेंटची पद्धत पाहून वोल्प या प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञाची आठवण आली. मनोविकाराशी संबंधित नाटक पहात असताना त्या संबंधित शास्त्रज्ञांची आठवण होणे यात काहीच नवल नाही; परंतु इतरही किती तरी असोसिएशन्स उत्तेजित झाली. सबंध नाटकात छिन्नविछिन्नतेचा भयमिश्र सुखदायक कुतूहलजन्य असा अनुभव सतत येत राहतो. साल्व्हादोर दालीच्या पेंटिंग्जची त्या वेळी खूप आठवण झाली. हे नाटक आणखी एका अर्थाने सरिॲलिस्ट आहे. रिॲलिटी व फॅंटसीचे विचित्र मिश्रण यात जागोजागी आढळते. अतिवास्तववादी चित्रात जसे फॉर्मचे डिस्टॉर्शन वारंवार आढळते तसा यातील विचाराचा फॉर्म किती तरी ठिकाणी ताणला-पिळला किंवा वळवला आहे. असाच एक फॅंटसीतला राजकन्येचा सीन आहे. त्यातील राज्यकन्या पाहून रूबेन्सच्या पेंटिंग्जची आठवण झाली. नायकाची आई ऊर्फ सौ. अनुसयाबाईच्या एंट्रीलाच रविवर्म्याच्या काही पेंटिंग्जची आठवण झाली. प्रकाशाची कारमतही मला आनंददायी वाटली. सतीश गुजरालच्या सुरुवातीच्या चित्रात प्रकाशाचा सोर्स शोधता येत नसे. तसाही काही आभास मला या नाटकात अनुभवास आला. संगीताचे तुकडे चपखल बसवले होते. एके जागी तर चक्क स्वर्गीय कुंदनलाल सैगल यांचाच आवाज वापरला होता. एका नाटकात मला फ्रॉईड, वोल्प, दाली, रूबेन्स, रविवर्मा, सतीश गुजराल, कुंदनलाल सैगल इतक्या निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींची असोसिएशन्स उत्तेजित झाल्याचा अनुभव आला आणि म्हणून हे नाटक मला केस हिस्टरीमधून उडून कलात्मक अनुभवाच्या श्रेणीत जाऊन बसते असे वाटते.

एक मात्र आहे. नाटकाचा अनुभव निरनिराळ्या पदरांचा, कलात्मक व बहुशः आनंददायक असला तरी बावनकशी सोन्याचा नव्हता. लेखक म्हणून सतीश आळेकरांचा 'मिकी आणि मेमसाहेब' ते 'महापूर' हा प्रवास भल्या झपाट्याचा व मोठ्या सामर्थ्याचा आहे यात शंका नाही; तरी पण या नाटकात मनोविकारतज्ज्ञांचे पात्र त्यांनी कशासाठी घातले हे फारसे उमजत नाही. या पात्राशिवाय जर हे नाटक त्यांनी उभे केले असते तर कदाचित अधिक शुद्ध आर्ट फॉर्म त्यांना सापडला असता. तपशिलाच्या दृष्टीने एक मोठी चूक मला वाटते ती अशी आहे की नाटकाची सर्व घटना मनोविकारतज्ज्ञाच्या दवाखान्यात घडावयास हवी होती. मनोविकारतज्ज्ञाने रोग्याच्या घरी जाऊन मानसोपचार करणे, विशेषतः ज्या पद्धतीचे उपचार नाटकात दाखवले आहेत ते करणे–अशी पद्धत नाही व शक्यताही नाही. दिग्दर्शन या दृष्टीने मोहन गोखले यांनी मोठीच यशस्वी कामगिरी केलेली आहे; पण कधीकधी नाटक शब्दबंबाळ होते. फॅंटसीमध्येसुद्धा नायक सतत बोलतच असतो व अशा काही जागा मला वाटल्या की शब्दांचा आश्रय सोडून अॅक्शनमधून मनाचा दौरा व्यक्त होण्यास वाव होता. मनोविकारतज्ज्ञाच्या भूमिकेचा एकंदरच विचार लेखन, दिग्दर्शन व अभिनय या तिन्ही दृष्टींनी या नाटकात चुकला आहे असे मला वाटते. लेखनाच्या दृष्टीने वर सांगितलेच आहे. दिग्दर्शन या दृष्टीने कदाचित हे पात्र अधिक डॉमिनंट, अधिक कंपोझ्ड असे घेतले असते तर बरे झाले असते किंवा फास्ट डिलिव्हरीने

पृष्ठ २८ वर

# सोलकढी

## –हे निर्वाणमार्गच !

शाळेत असताना, इतिहास हा काही माझ्या पक्क्या विषयांपैकी एक नव्हता. मात्र त्यात माझे पुरते पानिपत होत नसे. कारण तारतम्य हे तेव्हासुद्धा माझ्या व्यक्तिमत्त्वाचे एक विलोभनीय वैशिष्टच होते. ते सलामत राखले तर इतिहास दगलबाजी करत नाही हे माझ्या फार लौकर लक्षात आले होते. त्यामुळे, गाळलेले शब्द भरा; सन आणि स्थळे आणि व्यक्ती यांच्या योग्य जुड्या जमवा यासारख्या प्रश्नांची उत्तरे, नेमकेपणाच्या अभावी चुकत गेली, तरी अमुक महाराजांची योग्यता ठरवा, तमुक शहांनी केलेल्या सुधारणा सांगा यासारख्या प्रश्नांची उत्तरे, नेमकेपणाच्या अभावी, आपली बरोबर येत गेली. योग्यता ठरवायचा प्रश्न ज्यांच्या बाबतीत उपस्थित होई किंवा ज्यांनी केलेल्या सुधारणांचा तपशील उत्तरात द्यावा लागे अशा ऐतिहासिक स्त्रीपुरुषांनी बहुधा नवे रस्ते बांधलेले असायचे आणि त्यांच्या दुतर्फा झाडे लावलेली असायची.

ज्या देशांचा इतिहास उज्ज्वल असतो त्या देशात भरपूर रस्ते असून त्यांच्या दुतर्फा झाडे लावलेली असतात. भारताइतका उज्ज्वल इतिहास दुसऱ्या कोणत्याही देशाला नाही. त्यामुळे भारतात कोणी रस्ता बांधला की त्याच्या दुतर्फा झाडे आपसुकच उगवत असतील आणि कोठे दोन झाडे उगवली की त्यांच्यामधून तयार रस्ता आपोआपच उलगडत असेल, अशी माझी समजूत होती; पण तसे नाही म्हणे. झाडांचे एक वेळ मी समजू शकलो असतो; पण साऱ्या दुनियेत भारतातले रस्ते सर्वांत अधिक धोकेबाज आहेत अशी आकडेवारी आता पुढे आली आहे.

जागतिक आरोग्यसंघटनेचा अहवाल असे सांगतो की भारतातले मार्ग हे निर्वाणमार्गच आहेत. दर दहा हजार वाहनांमागे ब्रिटन आणि अमेरिकेतल्या मार्गांवर जेवढे अपघाती मृत्यू होतात त्यापेक्षा पंधरा पटींनी अधिक अपघाती मृत्यू भारतातल्या मार्गांवर होतात. या देशांपेक्षा भारतात वाहने अधिक म्हणून असे होत असेल म्हणावे तर तसेही नाही. वाहने कमी; अपघात जास्त : मार्ग, मार्गांवरल्या रहदारीची नियंत्रणव्यवस्था, वाहने, वाहनांचे चालक यांच्या सामुदायिक व संघटित कर्तृत्वाची किमया आहे ही. चाकांखालचा आणि पुढचा मार्ग आपल्या (ऐतिहासिक) बापाचा आहे अशा थाटात वाहनचालक वाहने हाकत असतात; पायांखालचा मार्ग आपल्या (ऐतिहासिक) बापाचा आहे अशा ऐटीत पादचारीमंडळी चालण्याचा आपला मूलभूत नागरिक हक्क बजावत असतात; (आणि ऐतिहासिक बापांच्या द्वंद्वयुद्धात वर्तमान लेकरांचा जीव जातो); वास्तविक वाहनांनासुद्धा बाहेरून ढकलत न्यावे अशी बहुतेक वाहनांची स्थिती असते; ती आत बसून चालवायची तर चालकांना दारूचे उत्तेजन लागतेच; मधूनमधून मानवी व यांत्रिक वाहतूक–नियंत्रक ठेवून मार्ग सुशोभित केलेले असतात; मार्गक्रमणनियमांचे उल्लंघन करणाऱ्या धटिंगणांना मार्गावर आणण्यासाठी कायद्याने समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या जातात एवढेच; पोटाला पट्टा बांधणे, शिरस्त्राण वापरणे, असल्या गोष्टी आपण बुवा अजागळपणाच्या मानतो.

जीवनाचा मार्ग हा खरोखर निर्वाणमार्गच आहे, या श्रेष्ठ आध्यात्मिक तत्त्वाचे स्मरण पदोपदी आणि चाकोचाकी करून देण्यासाठी तर भारतातल्या मार्गांवर ही अशी अट्टलपट्टल व्यवस्था करण्यात आली नाही ना ? तसे असेल तर षड्दर्शनांतून नजरचुकीने राहून गेलेले हे 'सातवे मार्गदर्शन' समजायला हवे. (असे काही ललित लिहूनसुद्धा जर 'सोलकढी'ला चिंतनशीलतेची 'डूब' नाही असे वाचक म्हणणार असतील तर या अनंतरावाने काय बरे करावे ? कोठे जावे ?)

–अनंतराव

---

¤ नुकत्याच यवतमाळला झालेल्या नाट्यसंमेलनातल्या अध्यक्षीय भाषणात भालचंद्र पेंढारकर म्हणतात, : व्यावसायिक रंगभूमीखेरीज हौशी रंगभूमी म्हणजे पंख तुटलेला पक्षी.

–मी तर म्हणतो, हौशी–प्रायोगिक रंगभूमीखेरीज व्यावसायिक रंगभूमी म्हणजे पक्षी तुटलेला पंख !




# नव्या बदलांचा अर्थ

वा. दा. रानडे

बहुगुणांचा राजिनामा, उत्तर प्रदेशात राष्ट्रपतींची राजवट, केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्घटना व त्याअनुषंगाने हरियानाच्या मुख्य मंत्रिपदात झालेला बदल या गेल्या दोन आठवड्यांतील अंतर्गत राजकारणातील महत्त्वाच्या घटना काय सूचित करतात ? हे बदल आताच करण्याची काय आवश्यकता होती ? त्यामागे काय उद्देश आहेत ? सरकारी निवेदनातून यासंबंधी काहीच उलगडा होत नसल्याने त्याबद्दल अंदाज बांधणे एवढेच आपल्या हाती आहे.

या घटनांवरून पहिली आठवण होते १९७२ च्या निवडणुकांपूर्वी घडलेल्या अशाच स्वरूपाच्या घटनांची. १९७२ च्या निवडणुकांच्या आधी पंतप्रधान श्रीमती गांधींनी तीन राज्यांचे मुख्य मंत्री बदलले होते. या वेळी दोन राज्यांचे मुख्य मंत्री आतापर्यंत बदलण्यात आले आहेत. निवडणुकीत काँग्रेसची प्रतिमा उजळ करून यश मिळवावे हाच १९७२ च्या निवडणुकीपूर्वी झालेल्या बदलांचा मुख्य उद्देश होता. आताचे बदल अशा काही उद्देशानेच करण्यात आले आहेत का असा अंदाज केल्यास तो असंभवनीय म्हणता येणार नाही. सध्याच्या पार्लमेंटची मुदत येत्या मार्चमध्ये संपते. घटनेप्रमाणे त्यापूर्वी नव्या निवडणुका व्हावयास हव्यात. निवडणुकांची घोषणा साधारणपणे मतदानाच्या तीन महिने आधी होते. मार्च १९७१ मध्ये झालेल्या लोकसभा–निवडणुकांची घोषणा २७ डिसेंबर १९७० ला झाली होती. निवडणुका मुदतीत घ्यावयाच्या असतील तर त्यासंबंधीची घोषणा डिसेंबरअखेर अपेक्षित आहे. आणीबाणीच्या परिस्थितीत पार्लमेंटने ठराव पास करून निवडणुका एक वर्ष पुढे ढकलता येतात. निवडणुका वर्षभर पुढे ढकलल्या जाणार असल्याचा अंदाज काही आठवड्यांपूर्वी प्रसिद्ध झाला होता. पंतप्रधान दोन्ही पर्यायांचा विचार करीत आहेत. अजून त्यांनी याबाबत अंतिम निर्णय घेतलेला नाही; पण निवडणूक तयारीच्या हालचाली सुरू केल्या आहेत असे दिसते.

उत्तर प्रदेशात बहुगुणांना नेतेपदावरून बदलण्याची मागणी गेल्या एप्रिलपासूनच करण्यात येत होती. मेमध्ये तिला विशेष जोर चढला होता. गुजरात निवडणुका होईपर्यंत याबाबतचा निर्णय पुढे ढकलण्यात आला होता. नंतर आणीबाणी जाहीर झाली आणि हा प्रश्न लांबणीवर पडला;. पण काँग्रेस अंतर्गत दोन गटांतील संघर्ष चालूच होता. आणीबाणीतसुद्धा काँग्रेस पक्षातील गट आपसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने कार्य करू शकत नाहीत हाच याचा अर्थ. आणीबाणीमुळे सरकारी नोकरांत व सरकारी कारभारांत शिस्त आल्याचे सांगण्यात येते पण सत्तारूढ काँग्रेस पक्षात मात्र ती आलेली नाही. राज्यांच्या मुख्य मंत्रिपदात बदल करताना साधारणपणे पर्यायी नेता अगोदर हेरून मुख्य मंत्र्याला राजिनामा द्यायला सांगितले जाते. बहुगुणाच्या बाबतीत तसे घडलेले नाही. पर्यायी नेता अजून डोळ्यांपुढे नाही. तो निवडायला किती अवधी लागेल हे सांगता येत नाही. म्हणून उत्तर प्रदेशात राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली. पण एवढ्या तडकाफडकी हे बदल करण्याची काय निकड होती ? काही काळ राष्ट्रपतींची राजवट आणल्याशिवाय उत्तर प्रदेशाचा कारभार सुधारता येणार नाही अशी पंतप्रधानांची खात्री झाली असली पाहिजे आणि येत्या मार्चमध्ये निवडणुका घेण्याचा त्यांचा विचार असेल तर त्यापूर्वी दोन-अडीच महिने राष्ट्रपती-राजवट आणून तेथील कारभाराची प्रतिमा सुधारावी असे त्यांनी योजले असणे शक्य आहे. दोन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकांत काँग्रेसने उत्तर प्रदेशात जेमतेम बहुमत मिळविले. बहुगुणा मुख्य मंत्री झाल्यानंतरही गटबाजी चालूच राहिल्याने पक्षाची प्रतिमा काही उजळली नाही. देशातले हे सर्वांत मोठे राज्य. लोकसभेत त्याचे ८५ खासदार, (नव्या मतदारसंघरचनेनुसार ही संख्या आणखी वाढली आहे) तेव्हा तेथील कारभाराची प्रतिमा सुधारण्यासाठी आपण आतापासूनच काही केले नाही तर निवडणुका जिंकणे कठीण जाईल असे पंतप्रधानांना वाटले असणे शक्य आहे. राष्ट्रपती–राजवट तडकाफडकी लागू करण्याच्या निर्णयाचा याशिवाय दुसरा काही समाधानकारक उलगडा होऊ शकत नाही.

केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्घटना याच वेळी तातडीने करण्यासारखी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती ? स्वर्णसिंग व उमाशंकर दीक्षित यांनी राजिनामे दिल्याने मंत्रिमंडळाची पुनर्घटना करण्यात आली असे सरकारी निवेदनात म्हटले आहे. स्वर्णसिंगांनी आगामी निवडणुकांपर्यंत आणि दीक्षित यांनी राज्यसभेच्या सभासदत्वाची त्यांची मुदत संपेपर्यंत थांबावे अशी विनंती पंतप्रधानांनी केली असती तर या दोन मंत्र्यांनी ती मानली नसती असे वाटत नाही. गेल्या वर्षी मंत्रिमंडळाच्या खात्यांची फेरवाटणी करण्यात आली त्या वेळी दीक्षित यांचे गृहखाते काढून त्यांना बिनखात्याचे मंत्री करण्यात आले तेव्हाच त्यांचे महत्त्व कमी झाले होते. आपल्या काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी एक विश्वासू सहकारी मंत्रिमंडळात असावा म्हणूनच पंतप्रधानांनी त्यांना मंत्रिमंडळात ठेवले होते. नवे बिनखात्याचे मंत्री बन्सीलाल यांच्यावर या जबाबदाऱ्या आता टाकण्यात येतील असे दिसते. गेल्या वर्षी स्वर्णसिंगांचे परराष्ट्रखाते काढून त्यांना संरक्षणखाते दिले हा बदल त्यांना पसंत नव्हता; पण याशिवाय आणखी काही प्रश्नांवर पंतप्रधानांशी त्यांचे मतभेद होते काय ? राजिनाम्यानंतर त्यांच्याकडे दुसरी कोणती महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात येणार असल्याचे सूचित झालेले नाही, त्यामुळे वरील शंका दुणावते.

लोकसभेचे सभापती गुरुदयाळसिंग धिल्लाँ यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. सभापतींना मंत्रिपद देण्याचा हा पायंडा अनिष्ट आहे. सभापतींकडे निःपक्षपाती व्यक्ती म्हणून पाहिले जाते. आपली हीच प्रतिमा त्यांनी कायम ठेवायला हवी. धिल्लाँ यांनी स्वतःच मंत्रिपद नाकारायला हवे होते. तसे केल्याने त्यांच्या पदाची प्रतिष्ठा वाढली

पृष्ठ २५ वर

एका नक्षलवादी क्रांतिकारकाच्या जीवनावर आधारलेली छोटी कादंबरी (उत्तरार्ध)

# थँक्यू मिस्टर ग्लाड

अनिल बर्वे

शेजारच्या खाटेवरल्या दमेकरी कैद्याच्या खोकखोक खोकण्याने नक्षलवाद्याला जाग आली; पण आदल्या रात्री बसलेल्या भयंकर माराने आणि अंगात भरलेल्या ज्वराने डोळे उघडण्याची ताकदही त्याच्यात उरली नव्हती. मग मिटल्या डोळ्यांनी तो नुसता कण्हला.

नक्षलवाद्याला जाग आली आहे हे पाहताच नाइटड्यूटीचा वॉचमन वर्दी द्यायला आर. एम. ओ. कडे गेला. ग्लाडसाहेबाच्या हुकुमावरून खास नक्षलवाद्याच्याच तैनातीला ठेवलेल्या वॉर्डबॉयने पटकन पुढे होऊन कोलनवॉटरची पट्टी बदलली. जेलच्या दवाखान्यात मरू घातलेल्या कैद्याच्याही वाट्याला न येणारी शुश्रूषा नक्षलवाद्याला लाभली होती.

ग्लाडसाहेबाचा हुकूमच होता तसा तो !

लांबवरून पावलांचा खाडखाड आवाज ऐकू येऊ लागला.

दवाखान्यातला कलकलाट एकदम थांबला. रोग्यांच्या भोवती घोंघावणाऱ्या माशाही दडी मारून बसल्या. ग्लाडसाहेबाने दवाखान्यात पाऊल टाकले. आर. एम. ओ. बरोबर ग्लाडसाहेब नक्षलवाद्याच्या खाटेसमोर येऊन उभा राहिला...

'हॅलो यंग बॉय...' ग्लाडसाहेबाने हाक मारली; पण त्या हाकेला प्रत्युत्तर देण्याचेही त्राण नक्षलवाद्यात उरले नव्हते.

'थोडंसं टेंपरेचर आहे अंगात,' आर. एम. ओ. ने माहिती दिली. तसा ग्लाडसाहेबाने आपला हात नक्षलवाद्याच्या कपाळावर ठेवला. त्या लठ्ठ राठ हातालाही मायेचा ओलावा पाहून नक्षलवाद्याने डोळे उघडले. ग्लाडसाहेब खाली वाकून नक्षलवाद्याच्या कानात विचारत होता—

'फार लागलं तुला पोरा ?'

नक्षलवाद्याने नकारार्थी मान हालवली आणि तो म्हणाला, 'आय वॉज लिट्ल राँग मिस्टर ग्लाड. यू आर नॉट ए पेटी ब्युरॉक्रॅट...'

नक्षलवाद्याच्या या खुलाशाने ग्लाडसाहेब एकवार समाधानाने हसला नि गर्रकन अबाउट टर्न करून ताडताड ऑफिसकडे चालू लागला.

ग्लाडसाहेब आपल्या खुर्चीत स्थानापन्न झाला आणि सीनियरने त्याच्या हातात टेलिग्राम ठेवला; पण आलेला टेलिग्राम उघडून पाहण्याचीही उत्सुकता साहेबाने दाखवली नाही. त्याने फक्त खुशीने आळस दिला नि तो पुटपुटला,

'बच्चा बेवकूफ आहे, पण ऑनेस्ट आहे. नाउ ही रिअलाइज दॅट आय ॲम नॉट ए पेटी ब्युरॉक्रॅट.'

मग साहेबाने खर्रकन ड्रॉवर ओढून मर्सिपिटिशन काढला आणि समोरचा कागद फाडून त्यावर लिहिले...

'पोरा, आयुष्य फार दुर्मीळ आहे. सही कर...!'

साहेबाने घंटी दाबताच वॉर्डरने येऊन सलाम ठोकला. साहेबाने देऊ केलेला मर्सिपिटिशन आणि चिठ्ठी घेऊन तो हॉस्पिटलात चालू पडला...

ग्लाडसाहेबाने व्हिस्कीचा पाइंट तोंडाला लावला आणि वॉर्डरच्या येण्याची तो वाट पाहू लागला; पण वॉर्डर अपेक्षेपेक्षा लवकरच परत आला...

ग्लाडसाहेबाने त्याच्या हातातले कागद ओढून घेत उत्सुकतेने पाहिले. आताही मर्सिपिटिशनवर नक्षलवाद्याने सही केलेली नव्हती. फक्त साहेबाच्या चिठ्ठीखाली लिहिले होते,

'मिस्टर ग्लाड, आयुष्य दुर्मीळ आहे...पण हौतात्म्य दैवदुर्मीळ आहे !'

ग्लाडसाहेबाने खिन्नपणे कपाळाला हात लावला......उन्हे उतरत होती. मर्सिपिटिशनचा अखेरचा दिवस उलटत होता.

ठण ऽ ठण ऽ ऽ ठण ऽ ठण ऽ ऽ

बंदीचे टोल पडू लागले. मर्सिपिटिशनची मुदत संपली. दगड होऊन जमिनीला खिळलेला ग्लाडसाहेब जड अंतःकरणाने उठला. माणसामागोमाग माणसे खुषीत हँग करणाऱ्या ग्लाडसाहेबाने आयुष्यात प्रथमच कोणाचा तरी जीव वाचवायचा प्रयत्न केला होता;

पण त्यातही अपयशच त्याच्या पदरी पडले होते. साहेबाने आवेगाने हात टेबलावर आपटला आणि तो आतल्या आत ओरडला......

'खाटकाचा जन्म आहे माझा. खाटकाचा–'

'सरऽऽ'

सीनियरच्या हाकेने साहेब भानावर आला.

'सर, सकाळचा टेलिग्राम अजून पाहिला नाहीत तुम्ही!'

सीनियरने आठवण करून दिली. साहेबाने यंत्रवत टेलिग्राम फोडला आणि त्यावर नजर टाकली...

'आय ॲम कमिंग पापा...फॉर एव्हर युवर्स...जेनी.'

टेलिग्राम वाचून साहेब देहभान विसरला नि ओरडला, , जेनीऽ, ओ माय लिटल जीन, स्वीट जीन, जेनी!'

साहेबाच्या बंदुकीसारख्या कडाडण्याने झाडांवरली पाखरे एकदम चिवचिवाट करीत सैरावैरा उडाली.

साहेबाची लाडकी लेक इंडियाला निघाली होती. तिला रिसीव्ह करण्यासाठी साहेबाला बॉबेला जायलाच हवे होते. साहेबाने फराफरा रजेचा अर्ज खरडून सीनियरच्या हाती दिला...

ग्लाडसाहेब चार दिवसांच्या रजेवर जातोय हे पाहून तुरुंगातल्या वडा-पिंपळाच्या झाडांनाही एकदम मुक्त झाल्यासारखे वाटू लागले. आणि......

—साहेबाची पावले मोठ्या खुशीत खाडखाड बंगल्याकडे चालू लागली!

•

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाड्खाड् वाजू लागली. गार्ड-ड्युटीवरले हवालदार अटेन्शनमध्ये उभे राहिले आणि वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर एक शीळ ऐकू येऊ लागली...

गार्डड्युटीवरल्या जमादाराने कपाळावर आठ्या चढवल्या आणि सभोवर नजर फेकली. आश्चर्याच्या धक्क्याने त्याचे तोंड उघडले नि डोळे फाडफाडून तो समोर पाहतच राहिला.

ग्लाडसाहेबाची पावले तालात होती. हातातली छडी नाचत होती. साहेबाची नजर आज करडी नव्हे तर प्रसन्न होती आणि ग्लाडसाहेब स्वतःच शिळेवर गाणे गुणगुणत होता...

'हे प्रिये, तुझ्यासाठी सैतानालाही आव्हान दिले मी; पण तुझ्याचमुळे का ईश्वरालाही विसरलो मी?'

जमादार पुनःपुन्हा डोळे फाडून बघत होता...ग्लाडसाहेबाची पावले तालात होती...छडी नाचत होती...नजर प्रसन्न होती... आणि ओठावर सुरेल शीळ होती, 'हे प्रिये तुझ्यासाठी सैतानालाही आव्हान दिले मी; पण तुझ्याचमुळे का ईश्वरालाही विसरलो मी?'

ग्लाडसाहेब जवळ आला तसा भानावर येत स्तंभित झालेल्या जमादाराने सॅल्यूट ठोकला. ग्लाडसाहेबाने सस्मित त्याची मानवंदना स्वीकारली आणि पावले तालात फेकली. छडीने बुटावर ठेका धरला. शिळेचे सूर उंचावले.

मेनगेटचे दरवाजे करकरले. ग्लाडसाहेबाचे पाऊल तुरुंगात पडले; पण इतक्या हळुवारपणे की दगडी फरशीलाही खुपू नये. साहेब खटल्याला बसला तेव्हा थरथरत्या पायांनी, धडधडत्या अंतःकरणांनी सारे कैदी उभे राहिले. ग्लाडसाहेबाने एकवार सर्वांना दमात घेतल्या-सारखे केले नि ओरडला–'काय रे, फार मस्ती चढली का? पुन्हा तक्रार आली तर तुडवून काढीन!' पण ग्लाडसाहेबाच्या आजच्या धमकीला तलवारीची धार नव्हती, तर सारंगीची तार होती. ग्लाड-साहेबाने सर्वांना सक्त ताकीद देऊन सोडून दिले आणि साहेब राउंडला निघाला.

साहेब आज असा विक्षिप्तासारखा का वागतोय हे कुणालाच समजेना. सीनियर जेलरच्या आठवणीप्रमाणे अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये ग्लाडसाहेब असा कधीच वागला नव्हता. ग्लाडसाहेब तुरुंगाच्या बागेत आला नि हळुवारपणे त्याने चार जाईच्या कळ्या खुडल्या आणि एकदम चांदण्या रात्री ओढ्याकाठच्या खडकावर बसून चंद्राकडे पाहत लठ्ठ बेडकाने खर्ज लावावा तसा सूर लावला... कळ्यांना कुरवाळत ग्लाडसाहेब गाऊ लागला,

'हे प्रिये, तुझ्यासाठी सैतानालाही आव्हान दिले मी; पण तुझ्याचमुळे ईश्वरालाही विसरलो मी?'

साहेबाची पावले आज तालात होती...हातातली छडी नाचत होती...नजर प्रसन्न होती...साहेब भिशीला चालला होता.

वर्तुळाकार भिशीमध्ये साहेब शिरला तशी सर्वत्र सामसूम झाली. ग्लाडसाहेब धडधडणाऱ्या चुलाणापाशी आला नि भाकऱ्यांच्या थप्पीतील दोन करपून खाक झालेल्या भाकऱ्या उचलीत भिशीच्या जेलरवर खेकसला...

'हू इज देअर? जाळ कमी करा! कैद्यांना भाकऱ्या काय करप-लेल्या खायला घालणार?' आणि मग ग्लाडसाहेबाने रेशनची तपासणी केली: रवा, साखर शिल्लक पाहून कैद्यांना गोड रवा करून वाढण्याचा हुकूम केला. भिशीचा जेलर बावचळून पाहतच राहिला! एवढा चार-पाचशेचा माल खिशात घालायच्याऐवजी कैद्यांच्या घशात घालायचा? त्याला काही समजेचना; पण एव्हाना ग्लाडसाहेब भिशीच्या बाहेरही पडला होता.

साहेबाची पावले आज तालात होती. हातातली छडी नाचत होती. नजर प्रसन्न होती. साहेबाने अचानक मार्ग बदलला.

साहेब अचानक सुतारखान्यात आलेला पाहून एकच धांदल उडाली; पण दोन पोरसवदा पोरांना उडालेल्या गोंधळाची कल्पनाही नव्हती. सागवानी ओंडक्याआड ती पुस्तके वाचीत बसली होती. ग्लाडसाहेबाला अचानक समोर उभा ठाकलेला पाहून दोघेही धडपडत उठली. भीतीने त्यांच्या तोंडून शब्दही फुटेना. ग्लाडसाहेबाने त्यांच्या हातातली पुस्तके काढून घेऊन त्यांवर नजर फिरवली, तोच सीनियर जेलर अदबीने पुढे आला नि त्याने माहिती पुरवण्यास सुरुवात केली. 'सर, दोघे एस. एस. सी. ला बसले आहेत. रात्री बराकीत अभ्यास करता येत नाही असं खोटंच सांगून कामचुकारपणा करतात!'

'खोटंच काय सांगतात? पंधरवड्यावर परीक्षा आल्या यांच्या नि तरी यांना कामाला कोणा गाढवानं लावलं? यांना कामाची माफी द्या! सेप्रेट खोल्यांत बंदीला ठेवा नि कोठडीत मोठे बल्ब लावा!'

साहेबाच्या या परंपरा मोडणाऱ्या हुकुमाने सीनियर जेलरची अवस्था मोठी केविलवाणी झाली; पण ग्लाडसाहेबाचे त्याकडे लक्षच नव्हते. त्या पोरसवद्या कैद्यांचे खांदे थोपटत ग्लाडसाहेब म्हणाला,

'परीक्षेत पास होऊन दाखवा. पंधरा पंधरा दिवसांची माफी देईन!'

आणि ग्लाडसाहेब गर्रकन वळला.

साहेबाची पावले आज तालात होती...हातातली छडी नाचत होती...नजर प्रसन्न होती आणि ग्लाडसाहेबाने फाशीगेटमध्ये प्रवेश केला.

ग्लाडसाहेबाला आलेला पाहताच ' मैंने खून किया नहीं, मैंने खून किया नहीं !' असे अहोरात्र ओरडणारा वेडा कैदी घाबरून भ्यालेल्या कुत्र्याच्या पिल्लाप्रमाणे भिंतीच्या कोपऱ्यात वळचणीला अंगाची मुटकुळी करून बसला. ग्लाडसाहेब त्याच्या कोठडीसमोर थबकला नि अतीव करुणेने त्याला न्याहाळत घोगऱ्या दयार्द्र आवाजात साहेबाने विचारले,

' तू खून केला नाहीस ना रे ?'

वेड्या कैद्याने नकारार्थी मान हलवली.

' मग असा भितोस कशाला ? जवळ ये. जवळ ये माझ्या !' वेडा कैदी लाचारीने भीत भीत ग्लाडसाहेबाच्या जवळ आला. ग्लाडसाहेबाने गजातून हात घालीत त्याचे डोके कुरवाळले आणि सांगितले,

' अरे वेड्या, जीजसलादेखील हकनाक क्रूसावर चढावं लागलं. मग तू का असा फाशीच्या दोरखंडाला भितोस ? घाबरू नकोस. ईश्वर तुझा निवाडा करील !'

वेड्याचे डोळे डबडबून आले तसा ग्लाडसाहेबाने पुन्हा खर्ज लावला. ' हे प्रिये तुझ्यासाठी...'

गात गात ग्लाडसाहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन उभा राहिला. कपाळावर आठ्या चढवून नक्षलवादी साहेबाच्या त्या नव्या अवताराकडे पाहतच राहिला. तसा ग्लाडसाहेबच पुढे होऊन त्याला म्हणाला,

' आमच्या गाण्याने तकलीफ झाली का ? अरे, आमचा आवाज नसेल सैगलएवढा गोड; पण तेवढा भरदार तर आहे ना ?'

नक्षलवाद्याने एकदा मंद स्मित केले नि उभा राहात तो ग्लाडसाहेबाला म्हणाला, ' आवाजाचं राहू दे मिस्टर ग्लाड; पण तुम्ही म्हणताय ती कविता फार सुंदरय. कोणाची आहे ?'

आणि बेसावधपणे ग्लाडसाहेब बोलून गेला–

' ऑफ कोर्स, माझ्या प्रियेची !'

एकवार रोखून पाहत नक्षलवाद्याने खोचक शब्दांत ग्लाडसाहेबाला विचारले,

' तुमच्या प्रियेची ?'

आपण फसल्याचे ग्लाडसाहेबाच्या ध्यानात आले नि ग्लाडसाहेब गडगडून हसला. नक्षलवाद्याला म्हणाला,

' यू नॉटी बॉय, अरे बेटा, जग मोठं क्रूरय. इथं कुणावर जीव लावू नये; कुणाला जीव लावू देऊ नये. मी ना कुणावर प्रेम केलं, करीत आहे, ना कुणावर करणार !'

कसे काय कुणास ठाऊक; पण फाशीगेटच्या वेंधळ्या जमादारालाही समजले की ग्लाडसाहेब खोटे बोलतोय.

' कुठे असते आता ती ?' ग्लाडसाहेबाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत नक्षलवाद्याने उलटा प्रश्न विचारला. ग्लाडसाहेब गांगरला, गलबलला. मग हतबल होत बोलला, ' कुठे असणार ? अरे, ती जर्मन ज्यू होती आणि हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश होता. त्याने माझ्या मरियमला गॅसचेंबरमध्ये लोटलं आणि आता बघ, ती दोघेही आहेत वर स्वर्गात आणि मी, मी मात्र इथं तुरुंगात !'

ग्लाडसाहेबाने एका दमात सर्व सांगून टाकले आणि डोळे घट्ट मिटले. फाशीगेटच्या वेंधळ्या जमादाराला वाटले, ग्लाडसाहेबाने डोळे घट्ट मिटून पाणी येऊ दिले नाहीय. एका आवंढ्याबरोबर गहिंवर गिळला आहे.

साहेबाने पुन्हा खर्ज लावला, ' हे प्रिये, तुझ्यासाठी...' पण ग्लाडसाहेबाच्या आवाजात थोडासा रडवेलेपणा आला होता. मिनिटभरच नि ग्लाडसाहेबाच्या गुबगुबीत गुलाबी राठ अँग्लोइंडियन गालांवर एकदम खळी उमलली नि सहा वर्षांच्या मुलाच्या उत्साहाने तो नक्षलवाद्याला सांगू लागला,

' तुला मरियम कशी होती पहायचीय ? माझ्या मुलीला पहा– जेनीफरला– अगदी थेट मरियमसारखी दिसते ती ! लहानपणापासून तिला बर्लिनलाच ठेवलं होतं मी. मरियमच्याच शाळेत घातलं होतं. दोन वर्षांपूर्वी तिथंच लग्न केलं तिनं. मला न विचारता. असा संतापलो बघ, की सारे संबंधच तोडून टाकले; पण महिन्यापूर्वी तिचं पत्र आलं. दिवस गेलेत म्हणून लिहिलं तिनं. मग बघ, झाला माझ्यातला इंडियन जागा. तसा पक्का इंडियन बर का मी ! म्हटलं, मुलीचं पहिलं बाळंतपण कसं माहेरीच झालं पाहिजे. घेतलं नि काय बोलावून काल दहा वर्षांनंतर. रात्री इंडियात आली ती. रात्रभर गप्पा मारीत होतो. तिला तुझं मृत्युपत्र सांगितलं. तेव्हा ती म्हणाली– ' डॅडी, इटस् ए रेव्होल्युशनरी पोएम. मला या कवीला भेटायचंय. तुला कवी म्हणते बरं का ती. नक्षलवादी नाही. भेटशील तिला तू ? बोलशील तिच्याशी ?'

' का नाही. आपल्या कवितेच्या चाहत्याला भेटायला कोणाला आवडणार नाही ?' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

' अरे, बघतच रहाशील तिला ! माझी मुलगी जास्तीत जास्त किती सुंदर असेल ? कल्पना कर बरं !' ग्लाडसाहेबाने विचारले.

' जास्तीत जास्त... माझ्या मृत्यूइतकी सुंदर असेल फार तर !'

नक्षलवाद्याने उत्तर दिले. तसे ग्लाडसाहेबाने आपल्या राठ हातात नक्षलवाद्याच्या झिंज्या पकडून त्याचे डोके हलकेच गजावर आपटले नि साहेब पुटपुटला– ' यू ब्रेव्हो यंग मॅन. दोन वर्षांपूर्वी भेटला असतास तर माझी छोकरीच दिली असती तुला ! वाट बघ... संध्याकाळी घेऊन येतो तिला मी !'

नि ग्लाडसाहेब गर्रकन् वळला. ग्लाडसाहेबाची पावले तालात पडत होती. हातातली छडी नाचत होती. नजर प्रसन्न होती नि ग्लाडसाहेबाने खर्ज लावला होता.

' हे प्रिये, तुझ्यासाठी सैतानालाही आव्हान दिले मी; पण तुझ्याचमुळे का ईश्वरालाही विसरलो मी !'

...काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाडखाड वाजली नाहीत, तरीही रस्ता निर्मनुष्य झाला आणि आसपासच्या झाडांवरल्या पाखरांची किलबिलही शांत झाली. ग्लाडसाहेब लेकीला घेऊन तुरुंगाकडे निघाला होता.

वाहणाऱ्या मंद वाऱ्याबरोबर जीनने डोक्याला बांधलेला रुमाल उडत होता नि पायघोळ झगा वाऱ्याने फडफडत होता. ग्लाडसाहेबाने तिला मनगटाला धरून चालवले होते, अगदी हळुवारपणे. साहेबाची

ही माया अप्रूप वाटून की काय एका खटयाळ कोकिळेनं साद घातली...

'कुहू ऽ ऽ कुहू ऽ ऽ'

'पापा ऽ ऽ कोकिळा ?'— जीनने आनंदून साहेबाला विचारले.

साहेबाने कपाळाला तिरस्काराच्या आठया चढवल्या नि होकार दिला.

'पापा, तुम्हाला तिची गोड शीळ आवडली नाही?' जीनने आश्चर्याने विचारले.

'कावळा बरा हिच्यापेक्षा' ग्लाडसाहेबाने उत्तर दिले. 'तो बारा महिने एकाच आवाजात ओरडतो आणि ही लवाड... आंब्याला मोहोर आला की तेवढ्यापुरताच हिला कंठ फुटतो. माणसाच्या जातीची... बदमाष साली !'

जीन हिरमुसली आणि अबोला धरून चालू लागली.

गार्डड्यूटीवरल्या हवालदारांनी सवयीने सलामी दिली; पण साहेबाच्या नक्षत्रासारख्या पोरीला पाहून बोळक्या तोंडाच्या जमादाराचेही डोळे चमकले !

मेनगेटचे दरवाजे करकरले.

ग्लाडसाहेबाने पुढे होऊन लेकीला हात दिला. तिची नाजूक पावले मेनगेटमध्ये पडली आणि सारा मेनगेट इंपोर्टेड सेंटने भरून गेला. मेनगेटमधल्या जेलरांनी, जमादारांनी साहेबाला टाळत जेनीकडे पुन्हापुन्हा चोरटया तिरप्या नजरा टाकल्या.

बालबच्चेवाल्या प्रौढ सीनियर जेलरला मात्र ग्लाडसाहेबाचे वागणे खटकले. बाई सोडा, साधा सिव्हिलियन कपडाही नजरेस न पडणाऱ्या कैद्यांसमोरून साहेबाने आपल्या पोरीला हिंडवावे हे काही त्याच्या हिंदूमनाला पटेना; पण ग्लाडसाहेबाला कोण बोलणार ?

साहेबाने फाशीगेटचा रस्ता धरला, तशा बंदीला चाललेल्या कैद्यांच्या वखवखलेल्या बुभुक्षित नजरा वळून वळून जेनीच्या सर्वांगावरून फिरू लागल्या; पण तिच्या नजरेला नजर भिडवण्याचे धाडस मात्र कोणाला झाले नाही. कैद्यांनाच कशाला, खुद्द फाशीगेटच्या जेलरलाही झाले नाही !

ग्लाडसाहेबाने फाशीगेटमध्ये पाऊल टाकले... आणि आख्ख्या जेलमध्ये मान वर करून सरळ नजरेने फक्त नक्षलवाद्याने जेनीला पाहिले.

'कशीय ?'— ग्लाडसाहेबाने विचारले.

'सुंदर !'— नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'किती ?'— साहेबाने प्रश्न टाकला.

'इतकी सुंदर, इतकी की, हिला पाहिलं असतं तर अनेक शेक्सपियरनं कवींच्या कविता जरा जास्त सुधारल्या असत्या !'— नक्षलवाद्याने उत्तर दिले.

आणि सारा फाशीगेट साहेबाच्या मनमुराद गडगडण्याने भरून गेला. आपल्या पोरीच्या सौंदर्याच्या तारिफेने साहेब हरखून गेला आणि मोठ्या उत्सुकतेने त्याने विचारले,

'जीनला पाहून तुला आठवली का एखादी कविता ?'

'नाही. मला फक्त तिच्या आईची हत्या आठवली !' नक्षलवादी अभावितपणे बोलून गेला.

पण रानगट रासवट ग्लाडसाहेबाचेही काळीज गोठून गेले नि दगड होऊन तो जमिनीला खिळला. जेनीने चमकून नक्षलवाद्याकडे पाहिले... त्याच्या डोळ्यांत दोन-चार थेंब जमा झाले होते.

साऱ्या फाशीगेटमध्ये एक असह्य शांतता पसरली. मग जेनीनेच उसने हसू चेहऱ्यावर आणले आणि ती नक्षलवाद्याला म्हणाली,

'तुम्हाला दाखवायला मी माझ्या कविता आणल्यात.'

'ओह ! बघू तर खरं–' भानावर येत नक्षलवादी म्हणाला.

मग जेनीने आपल्या हातातली नोटबुक नक्षलवाद्याला दिली. नक्षलवाद्याने ती वरवर चाळली. अतिशय मोहक भारी निळसर कागदावर सेंट शिपडलेला होता आणि रेखीव वळणदार अक्षरात बऱ्याच कविता लिहिलेल्या होत्या. श्रीमंत बापाच्या लाडक्या लेकीने लिहाव्यात तशाच त्या कविता होत्या. चंद्रताऱ्यांच्या, फुलापाखरांच्या आणि झिजून झिजून गुळगुळीत होऊनही अमर राहिलेल्या प्रेमाच्या.

दोन-चार कविता वाचून न वाचून नक्षलवाद्याने नोटबुक जीनला परत केली आणि तो म्हणाला...

'कविता अपुऱ्या आहेत.'

'का म्हणून ?'— लाडिक तक्रारीने जीनने विचारले.

'यात अंगाई कुठाय ?' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'जगातली पहिली कविता स्त्रीच्या तोंडून आली. अंगाई म्हणता म्हणता आणि म्हणून कविता मिसेस कविता आहे, मिस्टर कविता नाही !'

जेनी निरुत्तर झाली, निःस्तब्ध झाली.

बंदीचे टोल पडू लागले.

'मी एक विचारू ?' जाता जाता जेनीने विचारले. नक्षलवाद्याने होकारार्थी मान हलवली.

'तुमचं मृत्युपत्र फार सुंदर आहे. तेजस्वी आहे. एखाद्या क्रांतिकारक कवितेसारखं; पण...पण ह्या इतक्या वेदना, छळ ! तुम्हाला दुःख होत नाही ?'

नक्षलवाद्याने नकारार्थी मान हालवून सांगितले,

'ज्या वेदना वांझ नसतात त्यांचं दुःख करायचं नाही !'

तटाबाहेरील चर्चमध्ये ऑर्गनचे सूर उंचावू लागले. यार्डायार्डात बत्त्या पेटू लागल्या. ग्लाडसाहेब लेकीला घेऊन माघारी चालू लागला.

उताण्या घोरत पडलेल्या ग्लाडसाहेबाला नाइटलँपच्या उजेडाने जाग आली आणि डोळे किलकिले करीत तो कुशीवर वळला.

— बेडरूमच्या दरवाजाशी अस्ताव्यस्त कपड्यात जेनी उभी होती. बापाला जाग आलेली पाहताच ती साहेबाच्या जवळ आली नि पलंगावर बसली. साहेबाने पाहिले, विचाराने जीनचा चेहरा शिणला होता, डोळे रडून लाल झाले होते नि गाल सुजल्यासारखे दिसत होते. साहेबाला वाटले, आईच्या आठवणीने पोरीला झोप येत नसावी. मग साहेबाने तिला जवळ ओढले नि कुशीत घेत थोपटत साहेब पुटपुटला,

'झोप येत नाही माझ्या बाबाला ? भीती वाटते ?'

जीनने नुसती नकारार्थी मान हालवली आणि बराच वेळ बापाच्या कुशीत ती नुसती पडून राहिली. मग एकदम आवेगाने ती उठून बसली आणि बापाला गदागदा हालवीत ओरडली,

'पापा ऽ ऽ यू मस्ट बिहेव विथ ए सोलजर लाइक ए सोलजर !'

ग्लाडसाहेब दचकून जागा झाला. त्याची झोप पुरती उडाली नि त्याने पोरीला विचारले,

'वॉट डू यू मीन, जीन ?'

'आय मीन...पापा, ही इज नॉट ट्रेटर...पापा, ही इज ए ग्रेट रेव्होल्युशनरी...रियली ही इज ब्रेव्ह सोल्जर...!'

आवेगाने नि तावातावाने जीन ओरडत होती. ग्लाडसाहेब उठून बसला तसा साहेबाच्या नाइटगाउनचा गळा आवळीत जीन म्हणाली,

'पापा, खुनी–दरोडेखोरासारखे त्याला हँग कशाला करता ? जीवच घ्यायचाय त्याचा तर त्याला समोरासमोर शूट करा ना ! गिव्ह हिम ए सोल्जर डेथ !'

सुन्न होऊन ग्लाडसाहेब जागीच उभा राहिला. साहेब निरुत्तर होता. मनोमन त्यालाही आपल्या पोरीचे म्हणणे पटले होते. एका तडफदार, तेजस्वी क्रांतिकारकाला चोराचिलटांच्या हिशेबाने फासावर लटकावणे काही खरे नव्हते; पण साहेब हतबल होता, असहाय होता.

–खरंकन् ड्रॉवर ओढून साहेबाने व्हिस्कीची बाटली बाहेर काढली नि दातांनीच तिचे बूच उडवले.

तोच जेनी पुढे झाली नि साहेबाच्या हातातली बाटली खसकन् हिसकावून ओरडली,

'पापा, यू फर्स्ट अॅनसर मी !'

'प्लीज, जेनी...जीन...प्लीज. प्लीज !' साहेबाने अजीजीने पोरीच्या हातून बाटली काढून घेतली नि घशाला लावली. चार घोट कोरेच घटाघटा प्याल्यावर साहेबाच्या जिवात जीव आला नि तो पोरीला म्हणाला,

'जीन, यू डोंट नो माय पोझिशन; बट ही नोज, ही नोज, दॅट आय अॅम ए लिट्ल पेटी ब्युरॉक्रॅट !'

आपणही अखेर एक सांगकामे हुकमाचे ताबेदार असे चाकरमानेच आहोत, या जाणिवेने साहेबातला साहेबही कोसळून पडला आणि साहेबाने इझीचेअरमध्ये अंग टाकले. कासावीस जेनी आपल्या दुबळ्या बापाच्या मांडीवर डोके घाशीत तडफडत राहिली.

रात्र निबिड होती, अंधारी होती; पण तरी रातराणी टेचात उभी नव्हती. तिचा सुवासही कोठे दरवळत नव्हता. साहेबाच्या बंगल्यात, वरच्या बेडरूममधला क्षीण दुबळा दिवा नुसता जळत होता. नुसता जळत होता !

ग्लाडसाहेब माणसात आल्यापासून तुरुंग म्हणजे नुसती धर्मशाळा होऊन राहिली होती. गेल्या दोन–अडीच महिन्यांत एकही दंडा कोणाच्याही पाठी तुटला नव्हता. साहेबाच्या आगमनाने वडा-पिंपळाच्या झाडांना सोडाच, कद्यांनाही चोरट्यासारखे वाटत नव्हते.

'लक्षणं काही बरी वाटत नाहीत,' –सीनियर जेलर स्वतःशीच




पुटपुटला. साहेब असाच वागत राहिला तर जेल-अॅडमिनिस्ट्रेशनच कोसळून पडेल असे त्याला वाटू लागले होते आणि आताशा ग्लाडसाहेबाचा दरारा नि धाकही कमी होत चालला आहे असे त्याला जाणवू लागले होते.

फाशीगेटचा तो अजागळ आणि वेंधळा जमादार. वस्तुतः त्या मूर्खाला अशा जोखमीच्या ठिकाणी राहू देणं सीनियर जेलरला मान्य नव्हते; पण जमादार आता ग्लाडसाहेबाच्या खास मर्जीतला झाला होता आणि त्याला कारणही तसेच नाजूक होते.

जमादाराची म्हातारी सुईण म्हणून प्रसिद्ध होती आणि साहेबाच्या पोरीचे दिवस भरत आले होते. एकाच वेळी तिघातिघांना थंड काळजाने हॅंग करणाऱ्या ग्लाडसाहेबाचे काळीज मात्र त्यामुळे भित्र्या सशासारखे धडधडू लागले होते. त्या म्हातारीने सांगितलेले सर्व औषधोपचार साहेब पोरीवर करत सुटला होता. खरे म्हणजे सीनियर जेलरने साहेबाला दोन-चारदा 'त्यात काळजी करण्यासारखे काही नसते' असे समजावले होते; पण साहेब मात्र घायकुतीला आला होता. आधीच साहेबाच्या घराला बाईमाणसाची सावली दिसलेली नसते...त्यात जीव की प्राण पोरीचे बाळंतपण!

इतर काही नाही, तरी पोरीच्या बाळंतपणामुळे का होईना, ग्लाडसाहेबाला माणसांची गरज भासू लागली होती. एरवी हिंस्र वाघासारखा एकटाच गुहेत डरकाळचा फोडीत बसणारा साहेब अलीकडे माणसांत वावरू लागला होता. परवा तर तो चक्क भट्टी-खान्याच्या जेलरच्या घरी दुर्गापूजेलाही जाऊन आला होता आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अगदी शिपाई-चपराश्यांची पोरेटोरेही साहेबाच्या बंगल्यात खेळताना सीनियर जेलरने अलीकडे पाहिली होती.

गार्डड्यूटीवरल्या शिपायांनी सलामी दिली. मेनगेटचे दरवाजे करकरले. ग्लाडसाहेब जेलमध्ये आला नि थेट ऑफिसात गेला. मग खाली मान घालून वफादार कारकुनाप्रमाणे कामात मग्न झाला...

साहेबाने दिवसभर पुरेल एवढा दराराही निर्माण केला नाही अथवा धाकही कोणाला दाखवला नाही.

तासातासाचे टोल पडत होते. दिवस सरत होता. शाळेतल्या कंटाळलेल्या पोरांप्रमाणे जो-तो आपापले काम आटोपत होता. फाशीगेटचा जेलर सीनियर जेलरला म्हणाला...

'आताशा सर्व्हिसमध्ये काही थ्रिल राहिलं नाही.'

सीनियर जेलरने एक अगतिक हुंकार दिला.

लांबवरून मोटरसायकलीची धडधड ऐकू येऊ लागली. ऑफिस संपता संपता ही काय नवी झगझग आली या विचाराने सीनियर जेलरच्या कपाळाला आठ्या पडल्या...

रायडरने मोटारसायकल मेनगेटसमोर उभी केली नि तुरुंगात प्रवेश केला. होमडिपार्टमेंटच्या रायडरला पाहून सीनियर जेलरच्या डोक्यात तर्ककुतर्कांनी पिंगा घालायला सुरुवात केली.

टाचा जुळवून सॅल्यूट ठोकत रायडरने सीलबंद लखोटा सीनियर जेलरच्या स्वाधीन केला आणि पोच घेऊन तो चालता झाला.

सीनियर जेलरने लखोटा फोडला नि त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. फाशीच्या शिक्षेचा हुकूमनामा होता तो. कैदीनंबर आठसोवयालीस...वीरभूषण पटनाईक याच्या देहान्ताच्या शिक्षेवर राष्ट्रपतींचे शिक्कामोर्तब झाले होते आणि फाशीच्या तारीख, वार वेळेनिशीचा हुकूमनामा होमडिपार्टमेंटने धाडला होता.

लगबगीने सीनियर जेलर उठला. बऱ्याच दिवसांनंतर एक 'थ्रिलिंग एक्स्पीरियन्स' मिळणार होता. हा हुकुमनामा पाहताच ग्लाडसाहेब नॉर्मलवर येईल याची त्याला खात्री होती. फाशीचा एकेक हुकूम-नामा म्हणजे ग्लाडसाहेबाच्या लेखी 'माणसाच्या शिकारीची' एकेक संधी! एकेकाला हॅंग करताना एखादे धार्मिक कृत्य केल्याचे सात्त्विक तेज साहेबाच्या तोंडावर ओसंडे.

सॅल्यूट ठोकून सीनियर जेलरने लखोटा साहेबांच्या हाती दिला. बराच वेळ साहेबाने लखोटचाला हातही लावला नाही. लखोटचात काय असेल याची जाणीव साहेबाला होती; पण टाळ म्हणून टाळण्या-सारखी ती गोष्ट नव्हती. अखेर साहेबाने लखोटा उचलला नि शून्य नजरेने वाचला...

अटेन्शनमध्ये उभे राहून सीनियर जेलरची कंबर भरून आली होती; पण ग्लाडसाहेब स्थितप्रज्ञासारखा नुसता बसून होता. साहेबाच्या चेहऱ्यावर ना आसुरी झळाळी झळकली, ना दुःख उमटले.

बऱ्याच वेळाने साहेब जागचा उठला. तांब्याभर पाणी त्याने गटगटा प्याले. डोक्यावर कॅप चढवली नि निष्प्राण हुकूम केला...

'तयारीला लागा!'

सीनियर जेलरने मान झुकवली नि तो बाहेर पडला. साहेबाने बटण दाबलं. पिवळसर उदास प्रकाश ऑफिसभर रेंगाळला.

—ऑफिसच्या गजा-खिडक्यांतून एक अस्वस्थ रात्र डोकावू लागली होती.

त्या अस्वस्थ रात्री;

ग्लाडसाहेबाचे डोळे कोणा अज्ञात शक्तीने चरचरा कापले, बुबुळांच्या जागी खाचा पडल्या आणि गरम रक्ताचे दोन ओहोळ ग्लाडसाहेबाच्या गालांवरून वाहू लागले...ग्लाडसाहेब धडपडत उठला. एका हाताने त्याने दोन्ही डोळे घट्ट दाबून धरले आणि चाचपडत दुसऱ्या हाताने त्याने नाइटलॅम्पचे बटन दाबले एक मंद भावशून्य प्रकाश खोलीभर रेंगाळला. मग हळूच डोळे किलकिले करीत ग्लाड-साहेबाने आरशात पाहिले.

साहेबाच्या डोळ्यांच्या कडा भिजल्या होत्या आणि आसवांचे दोन थेंब गालांवरून घरंगळत मानेवर सांडले होते. जखमबिखम कुठेच नव्हती. रात्री जरा जास्त घेतल्याने डोळे थोडे लाल झाले होते इतकेच. ग्लाडसाहेबाला क्षणभर हायसे वाटले. बऱ्याच वर्षांनी भीति-दायक का होईना पण त्याला स्वप्न पडले होते.

मग त्या अनाकलनीय, भीतिदायक स्वप्नाचा अन्वयार्थ लावायचा ग्लाडसाहेब प्रयत्न करू लागला; पण विचार करकरूनही साहेबाला अर्थ लागेना. विचाराच्या निमित्ताने तो नक्षलवादी मात्र ग्लाड-साहेबाच्या डोक्यात डोकावू लागला. तसे अति पिण्याने जड झालेले डोके ग्लाडसाहेबाने एकवार गदागदा हालवले आणि खर्रकन् ड्रॉवर ओढून व्हिस्कीच्या बाटलीचे बूच उडवले. चार घोट तसेच कोरडे गटागटा पिऊन साहेबाने ड्रॉवर थाडकन् बंद केला. लाइट घालवला आणि डोक्यावर ब्लॅंकेट ओढून घेतले.

...साहेब खटल्याला बसला होता. समोरच्या कैद्यांना सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवत होता. तोच आकाशाला एक मोठा खळगा पडला आणि आकाश निस्तेज झाले. अष्ट दिशांच्या क्षितिजावरून बलदंड काळे ढग घोंघावत राजमहेंद्री-जेलवर चालून येऊ लागले. ग्लाडसाहेब धडपडत उठला आणि त्याने शिट्टी फुंकली. अलार्मची घंटा घणाणू लागली. हाणत-ठोकत कैद्यांना बराकीत बंद केले जाऊ लागले. यार्डायार्डातून गिनतीचे आकडे ओरडले जाऊ लागले. जेलच्या शिपायांनी जेलच्या तटाभोवती कडे केले. गार्डड्यूटीवरल्या हवालदारांनी त्या काळ्या ढगांकडे संगिनी रोखल्या. तरी आठी दिशांनी कडाडत-गर्जत काळे ढग तुरुंगावर चालून येतच होते. ग्लाडसाहेबाने कमरेला पट्टा अडकवला आणि स्वतः धावतधावत तो मेनगेटच्या दरवाजाच्या बाल्कनीत येऊन उभा राहिला; पण ग्लाडसाहेबालाही न जुमानता ढग पुढे येतच होते. ग्लाडसाहेब संतापाने लालीलाल झाला आणि रिव्हॉल्व्हर रोखून काळ्या ढगांवर त्याने ओपन फायर केला; पण काळ्या ढगांना ना त्याची तमा ना फिकीर! तुरुंगाच्या तटाच्या अगदी जवळ येऊन काळ्या ढगांनी विजांचे लोळ तुरुंगाच्या भिंतीवर फेकायला सुरुवात केली. तटावर आदळणाऱ्या विजांच्या लोळाने तटाचा एकेक चिरा हलू लागला...दुभंगू लागला...कोसळू लागला. तोच काळ्या ढगांच्या त्या गर्दीतून एक जळता-पेटता लाल ढग पुढे आला आणि विजेचा एक झगझगीत लोळ मेनगेटवर त्याने फेकला. मेनगेटवरचा फडफडणारा तिरंगा जळून राख होऊन मातीला मिळाला आणि मेनगेट कोसळू लागले. उडणाऱ्या धुरळ्याने ग्लाडसाहेब गुदमरून गेला आणि दगडामातीच्या ढिगात ग्लाडसाहेब गाडला जाऊ लागला...

ग्लाडसाहेब भीतीने थरथरत जागा झाला. बेडवरच उठून बसला. त्याचे सारे अंग घामाने थबथबले होते. ब्लँकेटनेच अंग पुसून ग्लाडसाहेब पलंगावरून खाली उतरला. नाइटगाउनचा पट्टा आवळून त्याने वाऱ्यासाठी खिडकी उघडली. बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता. विजा लखलखत होत्या.

भयाण स्वप्नांनी साहेबाच्या झोपेची अगदी चाळण उडवली होती. बेडरूममध्ये बसणेही साहेबाला असह्य झाले. मग साहेब व्हरांड्यात आला आणि पावसाचे शितोडे खात इझीचेअरमध्ये बसून झोके घेऊ लागला. मरियमबरोबर आल्प्सपर्वताच्या कुशीत पहिली तीच साहेबाची अखेरची स्वप्ने! ती स्वप्ने गॅसचेंबरमध्ये जळाली,... आणि साहेबाचा स्वप्नांशी संबंधच तुटला. ग्लाडसाहेबाच्या सूडाने भरलेल्या डोळ्यांत यायलाही स्वप्ने धजावत नसत. गेल्या पंचवीस वर्षांत चांगले किंवा वाईट, कोणतेच स्वप्न ग्लाडसाहेबाला कधी पडले नव्हते. डोळे मिटले की साहेबाला शांत झोप येई. एकाच वेळी तिघा-तिघांना फासावर चढवूनही घरी येऊन ग्लाडसाहेब शांत झोपला होता; पण आज, नक्षलवाद्याला फासावर चढवायचे या कल्पनेनेच ग्लाडसाहेबाची झोप उडाली होती. विचार करता करता साहेबाने मान टाकली...

'मोहमयी निळ्या अवकाशात हिरवीगार पृथ्वी मंद गतीने फिरत होती. तोच एक भली मोठी करवत लखलखवीत नक्षलवादी पुढे आला. त्याने फिरणाऱ्या पृथ्वीला गुडघ्याखाली दाबून धरले आणि उत्तर ध्रुवापाशी करवत टेकून पृथ्वीला कापायला सुरुवात केली. ग्लाडसाहेबाने त्याचे हे अघोरी कृत्य पाहिले मात्र आणि ग्लाडसाहेब धावत पुढे आला. नक्षलवाद्याचा हात घट्ट पकडीत साहेब किंचाळला,

'ए, कैदी नंबर आठसोबयालीस, काय करतोयस?'

ग्लाडसाहेबाला दूर ढकलत निर्विकार चेहऱ्याने नक्षलवादी म्हणाला, 'दिसत नाही?, आजपर्यंत किती शतके अन्यायाने, जुलमाने माणसे गाडली गेलीत. त्यांना बाहेर काढतोय!'

'का म्हणून?' ग्लाडसाहेबाने विचारले.

'आज पुनरुत्थानाचा दिवस आहे ना?' नक्षलवाद्याने सांगितले.

पुनरुत्थानाचा दिवस!

ग्लाडसाहेबाचे अंग शहारून गेले. ग्लाडसाहेबाने जागे होत सभोवार पाहिले. पावसाची झड थांबली होती. सारा आसमंत तृप्त आणि कृतार्थ दिसत होता. दूरवरच्या चर्चमध्ये पापक्षालनासाठी मंद उदास प्रार्थना ऑर्गनवर आळवल्या जात होत्या. चर्चच्या शिखराकडे थोडा वेळ एकटक ग्लाडसाहेबाने पाहिले आणि काही तरी निश्चय करून साहेब दिवाणखान्यात आला.

जेनी ऽ जीन ऽ ऽ स्वीट जीन...लिट्ल जीन...जेनी. घरभरून हाका साहेबाने मारल्या; पण जेनीची ओ आली नाही. पोरगी मॉर्निंग वॉकला गेली असेल असे समजून ग्लाडसाहेबाने सपाता सरकवल्या आणि नाइटगाउनमध्येच रस्ता तुडवायला सुरुवात केली.

चर्चच्या दरवाजासमोर ग्लाडसाहेब किंचित थबकला आणि थिजल्या डोळ्यांत अपार करुणा आणि पश्चात्ताप घेऊन शिखराकडे पाहू लागला. गेली पंचवीस वर्षे प्रभोचा, धर्माचा नि चर्चचा साहेबाने केवळ द्वेष आणि तिरस्कार केला होता. एवढा शक्तिमान प्रभो पण तोही एका हुकुमशहाच्या तावडीतून मरियमला वाचवू शकला नव्हता. हिटलरच्या गॅसचेंबरमध्ये मरियमबरोबर ग्लाडसाहेबाची सर्व श्रद्धा जळून गेली होती.

—तरी पण आज ग्लाडसाहेब प्रभोच्या दारात आला होता. या क्षणाला त्या अज्ञात ईश्वराशिवाय कोणाचाही आधार त्याला नव्हता. ग्लाडसाहेबाला चर्चच्या पायऱ्या चढताना पाहून फादरलाही आश्चर्य वाटले आणि ऑर्गनवरल्या पोराने नकळत स्वर उंचावले.

मंद पावलांनी ग्लाडसाहेब मदर मेरीच्या स्टॅच्यूपुढे आला आणि मटकन गुडघे टेकवून त्याने मान झुकवली.

मागच्या बाकावर बसलेल्या जेनीने आपल्या बापाला गुडघे टेकवलेले पाहिले आणि तिचा जीव कळवळला. अखेर तिचा आडदांड राक्षसासारखा बापही कोणाला तरी शरण गेला तर!

ग्लाडसाहेब चर्चमधून परत आलेला पाहून खानसाम्याने डायनिंग टेबलावर ब्रेकफास्टची मांडामांड करायला सुरुवात केली; पण ग्लाडसाहेबाची अन्नावरची वासनाच उडाली होती. समोरच्या डिशला हातही न लावता अनाशेपोटीच जगभर पाणी पिऊन ग्लाडसाहेब उठला नि बेडरूममध्ये गेला...

बेडरूमच्या कपाटात ग्लाडसाहेबाचाच सिव्हिलियन सूट गेली कित्येक वर्षे अनाथासारखा लोंबकळत होता. ब्रशने जरा झटकून साहेबाने सिव्हिलियन सूट अंगावर चढवला आणि जेनी, जीन, स्वीट जीन, लिट्ल जीन...जेनी अशा घरभर हाका मारीत साहेब खाली उतरला. बापाच्या हाका ऐकताच जडावलेल्या पावलांनी अल्लड

मुलीसारखी दुड्दुडू धावत जेनी हॉलमध्ये आली...बापाच्या अंगावर सिव्हिलियन सूट पाहून तिला आश्चर्यही वाटले नि हसूही फुटले आणि टिंगलीच्या सुरात तिने बापाला विचारले,

'पापा, अम्मीनं तरी तुम्हाला सिव्हिलियन सूटमध्ये कधी पाहिलं होतं का हो?'

खरे तर माराचा उल्लेख येताच ग्लाडसाहेबाच्या राठ गुबगुबीत अँग्लोइंडियन गालावर खळी उमटायला हवी होती; तरी पण साहेबाचे गाल तसेच रुसवे राहिले होते. ग्लाडसाहेब स्वतःशीच पुटपुटला, 'माझं मी तरी कोठे पाहिलंय स्वतःला सिव्हिलियन सूटमध्ये?' मग त्याने जेनीला विचारले, 'जीन, गावात चलतेस?'

'व्हाय नॉट पपा,' जेनी उत्तरली.

ग्लाडसाहेबाने अॅक्सिलरेटवर साहेबी खाक्यात पाय दाबला आणि चिखल उडवीत, खड्डे पाडीत झोंबणाऱ्या वाऱ्याला न जुमानता जीप भरधाव धावू लागली. वळणावर जीपचा वेग मंदावला तेव्हा साहेबाने पोरीला विचारले,

'जीन बेटा, इंडियन कल्चरची तुला माहितीय ना?'

'हां पापा, अँग्लोइंडियन असलो तरी आपण इंडियन आहोत ना पपा? शाळेत इंडियन कल्चर हा विषयच घेतला होता मी.' जीन म्हणाली.

जीनच्या उत्तराने ग्लाडसाहेब जरा खुशीत आला आणि मग त्याने स्टिअरिंगवरली पकड ढिली न करता नोटबुक व पेन पोरीच्या हाती दिले...

'हिंदूंच्या धर्मग्रंथांची चार नावं लिही यावर. आपल्याला पर्चेस करायचेत!' ग्लाडसाहेबाने फर्मावले.

'व्हाय पापा?' जीनने लिहिता लिहिता विचारले.

'त्या नक्षलवाद्याला वाचायला द्यायचेत. दॅट ब्लडी ब्रेव्हो मॅन! पोराचा फाशी जाताना धीर खचायला नको!' साहेबाने सांगून टाकले.

जीनने एकटक बापाकडे पाहिले. फाशी जाताना नक्षलवाद्याचा धीर खचणार नाही हे तिने ओळखले होते; पण त्याला फाशी द्यायच्या विचाराने बापाचाच धीर खचतोय हे ती ओळखून चुकली होती. तिच्या एकटक नजरेची ग्लाडसाहेबाला दादसुद्धा नव्हती. तो तिच्याशी बोलल्यासारखे, पण खरे तर स्वतःशीच बोलत होता...

'जीन, आत्मा, पुनर्जन्म असतो का ते माहीत नाही मला; पण असावा. असायलाच पाहिजे. नाही तर बघ ना, मृत्यू म्हणजे सर्व संपलं असं वाटतं नि सर्व संपलं ही भावना फार हिडिस असते, क्रूर असते. अगदी वैराण असते पोरी...'

'पण पापा, पुनर्जन्म आहे.' जीनने बापाचे बोलणे मध्येच तोडले.

'व्हॉट नॉनसेन्स!' पोरीच्या अंधश्रद्धाळू भावनेवर तडकत ग्लाडसाहेब तिरसटला, 'आत्मा, पुनर्जन्म ऑल हंबग! पोएटिक कल्पना!' ग्लाडसाहेब हेटाळणीच्या सुरात पुटपुटला.

जीप आता पुलावरून धावत होती. वाऱ्याबरोबर जेनीचे केस भुरभुरत होते. आपल्या मताशी जेनी मात्र ठाम होती. तिने लगेच बापाला प्रत्युत्तर दिले...

'नो पापा, वेस्टमध्ये सायंटिफिक रिसर्च चाललाय आणि आताशा तर सायंटिस्टदेखील आत्मा–पुनर्जन्म–कल्पना मान्य करायला लागलेत.'

ग्लाडसाहेबाने ब्रेक करर्रदिशी दाबले. फोरव्हीलर जागच्या जागी थांबली. ग्लाडसाहेबाने एकदम आवेगाने जेनीचे हात तळव्यात पकडून छातीवर दाबले. जेनीने पाहिले, तिच्या बापाच्या तोंडावरून स्वर्गीय आनंद ओथंबत होता. छाती फुटून जाईल अशा कातर स्वरात ग्लाडसाहेब पुटपुटला,

'म्हणजे जीन, मारा मला पुन्हा भेटेल? मारा मला पुन्हा भेटेल?' क्षणभरातच ती वेडी आशा, खोटा दिलासा ओसरला. ग्लाडसाहेबाचे हात थंड पडले. नजर अचेतन झाली नि असहाय्यपणे त्याने स्टिअरिंगवर मान टाकली.

आपल्या आडदांड राक्षसी बापाला आईच्या आठवणीने विव्हळताना पाहून जेनीचा बांध फुटला आणि बापाच्या खांद्यावर डोके टेकवून ती हमसून हमसून रडू लागली.

खाली नदी दुथडी भरून वाहत होती. वारा रोंरावत होता आणि ते बापलेक दोन्ही तीरांपासून दूर मध्येच कुठे असहाय्यपणे स्वतःचा जीव जाळीत होते.

ठण ऽ ठण ऽ ठण ठण...

सकाळचे सहा वाजले. बराकीचे टाळे खुलू लागले. कैदी नळावर–हौदावर गर्दी करू लागले.

फाशीगेटमध्ये नक्षलवाद्याने मात्र आपली कूस बदलली आणि अर्धवट झोपेत तो स्वतःशीच पुटपुटला, 'आता फक्त एक दिवस आणि एक रात्र!' आणि कांबळे त्याने डोक्यावर ओढून घेतले...

'वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृण्हाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि
संयाति नवानि देही ॥

खणखणीत अनुनासिक पण शब्दबंबाळ संस्कृताने नक्षलवाद्याची झोप चाळवली आणि त्याने बाहेर पाहिले. गजांसमोर चौरंगावर गीता ठेवून एक काळा तेलंगी ब्राह्मण आपल्या द्राविडी संस्कृतात गीता पठण करीत होता. त्याच्या शब्दोच्चारांनी नक्षलवाद्याची झोपच उडाली आणि कांबळे लपेटून तो दरवाजाजवळ येऊन ब्राह्मणाला विचारता झाला,

'पंडितजी, ये क्या चल रहा है?'

वेंधळ्या जमादाराने मध्येच तोंड घातले आणि सांगितले–

'बड्या साहेबांचा हुकूम आहे...सर्व पोथ्या वाचून त्याचा नक्षलवाद्याला अर्थ सांगा!'

आणि टाळा खोलून एक मोठी थैली जमादाराने नक्षलवाद्याच्या हातात दिली. नक्षलवाद्याने ती पालथी केली. गीतेपासून सत्यनारायणाच्या पोथीपर्यंत चांगली पाचपंचवीस पोथ्यापुराणे होती त्यात.

'साहेबांनी जातीने स्वतः आणलीत तुमच्यासाठी!' जमादाराने खुलासा केला.

'साहेब बराच उदार झाला की रे तुझा?'

नक्षलवादी जमादाराला म्हणाला आणि पोथ्यापुराणांचा तो गठ्ठा भिंतीलगत रचून ठेवून त्यावर खापराच्या तुकड्यांचा केलेला अॅशट्रे नक्षलवाद्याने ठेवला. नक्षलवाद्याच्या या कृत्याने आत्म्याचे अमरत्व

सांगणारी ती निर्जीव बुके ओशाळून गेली.

'जिस तरह आदमी अपने वस्त्र बदल लेता है, आत्मा भी उसी तरह देह बदलता है।'

तामिळी ब्राह्मणाने एकेक श्लोक अर्थासकट वाचायला सुरुवात केली. नक्षलवादी मात्र संस्कृत श्लोक म्हणताना होणाऱ्या त्याच्या वेडचावाकडचा तोंडाकडे पाहत सिगरेट ओढीत बसला.

सकाळचा भत्ता आला तशी ब्राह्मणालाही भोजनाची आठवण झाली आणि आत्मा अविनाशी असल्याचे सांगितले तेवढे पुरे असे वाटून तो उठला. पोथ्या त्याने बासनात बांधल्या. पळीने पंचपात्रातले पाणी नक्षलवाद्यावर उडवीत तोंडातल्या तोंडात आत्म्यालाच समजेल असा काही तरी मंत्र पुटपुटत तो जायला निघाला.

जमादार पुढे झाला नि ब्राह्मणाला दक्षणा द्यायला साहेबाने दिलेले पैसे त्याने खिशातून काढले. जमादारासारख्या हलक्या वर्णात जन्माला आलेल्या आत्म्याकडून दुरूनच स्पर्शही न करता ओंजळीत दक्षणा घेऊन ब्राह्मण चालू पडला.

त्या दशग्रंथी ब्राह्मणाला मेनगेटमधून बाहेर पडताना ग्लाडसाहेबाने पाहिले आणि आता तरी आत्मा अविनाशी असल्याची नक्षलवाद्याची खात्री पटली असेल अशी समजूत करून घेऊन साहेबाने टिफिनला हात घातला.

अन्नावरची नक्षलवाद्याची वासनाच उडाली होती; पण आलेला भत्ता तो परत पाठवीत नसे. दोन घास स्वतः खाऊन बाकी तो वेडचा कैद्याला देई किंवा डवा आला-नाहीचे निमित्त करून वेंधळा जमादारच त्यावर उभा-आडवा हात मारी. आत्ताही भत्ता आला तेव्हा नक्षलवाद्याने जमादाराला हाक मारली.

'जमादारसाब, आज कुछ भोजनप्रबंध है या नहीं?' ओशाळे हसत जमादार कोठडीशी आला नि आणखीन ओशाळत म्हणाला,

'आजकल बच्चे भी शैतान हुए हैं. कई बार उनसे कहा है, भई, सरकारी आदमी हूँ मैं...कैदीखाना खाना अच्छा नहीं. पर बेटे सुनतेही नहीं. मैं आया इधर कि वो चले उधर...खाना तो भी कौन लाएगा?'

घास तोंडात असतानाही सफाईदार लष्करी हिंदीत जमादार आपली अडचण सांगत होता; पण त्याची खरी अडचण नक्षलवाद्यापासून लपून नव्हती. 'तेवढेच एक वेळचे जेवण सुटते,' हा दारिद्र्यातून सुचणारा विचार नक्षलवाद्याला परका नव्हता.

'सो तो कहानी पुरानी है मगर नुस्खा नया. तब मैं अपनी डिवीजन लेकर अॅबिसिनिया में रोमेलसे लड रहा था...' खाता खाता रंगात येऊन युद्धात झालेल्या आपल्या उपासमारीचे रोमांचक वर्णन जमादाराने सांगायला सुरुवात केली. नक्षलवाद्यानेही आता 'दोन तासांची चिंता नाही' या खात्रीने त्याच्या गप्पात मन घातले. तोच एकाएकी तोंडातला घास घशाखाली ढकलीत जमादार धडपडत उभा राहिला नि नक्षलवाद्याला पायानेच ढोसत पुटपुटला,

'अंदर...अंदर...बेबी मेमसाब आता है!'

मग आधी मंद सुवास दरवळला. वाऱ्याची एक झुळूक आली. पाठोपाठ जडावलेल्या पावलांनी वड्या साहेबाची नक्षत्रासारखी बेटी आली. तिच्या एका हातात फुले होती नि दुसऱ्या हातात छोटीशी डिश होती. नक्षलवाद्याच्या कोठडीशी येऊन ती क्षणभर नुसती उभी राहिली. मग हातातली फुले देत त्याला म्हणाली,

'पापांच्या परमिशनने तुला अखेरची भेटायला आलीय!'

'बरं झालं, उद्या तुझ्या पापांनी परमिशन दिली तरी तुला मला भेटता यायचं नाही!' नक्षलवाद्याने हसून उत्तर दिले.

मृत्यूच्या सावलीतले ते नक्षलवाद्याचे हास्य जेनीच्या काळजात पुन्हा ठसून गेले. मग, तिने अंदाज घेत पुस्तकाकडे पाहत त्याला विचारले,

'माझं सिलेक्शन कसंय?'

'बरंच जाडजूडय.' नक्षलवादी.

'तसं नाही; पण तुला पटलं ना?'

'काय?'

'आत्मा अमर असतो हे?'

नक्षलवादी चूप बसला, जाणीवपूर्वक गप्प बसला. आपल्या हत्येचे पातक त्याला ग्लाडसाहेबाच्या डोक्यावर पुनःपुन्हा चिकटवायचे नव्हते. आत्म्याच्या अमरत्वाने त्याच्या मृत्यूपासून नामानिराळे राहायचे, त्या बापलेकीला मिळणारे सुख त्याला हिरावयाचे नव्हते. त्याच्या गप्प बसण्याने जेनीला मात्र वाटले, 'अखेर यालाही पटलं तर!'

मग तिने हातातली डिश पुढे केली. वेंधळ्या जमादाराने नजर डिशकडे ठेवीत ताला खोलला. नक्षलवाद्याने डिश हातात घेत विचारले,

'काय आहे?'

'काही तरी गोड आहे!' जेनी.

'बरं झालं, मरणाआधी गोड तोंडाने जगाचा निरोप घेता यईल!' नक्षलवादी म्हणाला आणि त्याने ती डिश पुस्तकावर ठेवून दिली. जमादाराने दरवाजा पुन्हा बंद केला.

बराच वेळ पुन्हा नुसता शांत गेला आणि एकदम कातरत जेनीने नक्षलवाद्याला विचारले,

'तुला मी आवडले का रे?'

'तू कोणाला आवडणार नाहीस?'-नक्षलवादी.

'मग माझं एक ऐकशील?'-जेनी.

'काय?'-नक्षलवादी.

'उद्या तू...तू...फक्त पंधरा दिवस थांबून राहा! पुन्हा जन्म घेशील तो माझ्याच पोटी घे!'

नक्षलवाद्याने चमकून जेनीकडे पाहिले. तिच्या डोळ्यांत पाणी तरळत होते.

'मला तुझ्यासारखा मुलगा पाहिजे; शूर आणि कवीही! फक्त पंधरा दिवस थांबशील ना?'

नक्षलवाद्याने मान खाली घातली. काय, बोलावे तेच त्याला सुचेना. त्याच्यातला प्रखर बुद्धिवादी जेनीच्या भावनांपुढे निष्प्रभ होऊन गेला. त्याने काहीच उत्तर दिले नाही. तेव्हा जेनीने दोन्ही तळव्यांनी त्याचा चेहरा वर उचलीत पुन्हा काकुळतीला येऊन विचारले,

'मी तुला आवडते ना रे? येशील ना माझ्या पोटी?'

नक्षलवाद्याची छाती भरून आली. त्याच्या तोंडून श्वासही फुटेना. मग त्याने नुसती होकारार्थी मान हलवली. तसे जेनीने एकदम त्याला

जवळ ओढले नि त्याचे डोके आपल्या छातीत खुपसून घेऊन तान्हुल्या बाळाचे घ्यावे तसे त्याच्या कपाळाचे पटापट मुके घेतले नि ती पुन्हा पुन्हा पुटपुटली,

'वाट बघते हं राजा तुझी. वाट बघते !'

उन्हे उतरणीला लागली होती. सावल्या लांबू लागल्या होत्या. बंदीची वेळ आली होती. एकदा बंदी होऊन सहाचे टोल पडले की, ग्लाडसाहेबाला निघायला हवे होते. फाशीची पूर्वतयारी तपासायला पाहिजे होती. सुरक्षिततेची सर्व काळजी डोळ्यांत तेल घालून घ्यायला हवी होती. ऑर्डर्लीने साहेबाचा पोशाख आणून समोर ठेवला आणि बूट चकचकीत करावयास सुरुवात केली...

ग्लाडसाहेब उठला. आतापावेतो त्याने स्वतःला सावरले होते. मनःक्षोभ संपवला होता. नेहमीच्याच थंड रक्ताने आणखी एकाला फासाला टांगायला तो पूर्ण तयार झाला होता. खर्रकन् ड्रावर उघडून त्याने व्हिस्कीची बाटली काढली. चार घोट कोरडेच गटागटा घेतले. तोच फोन खणखणला !

खणखणणाऱ्या फोनकडे पाहत बराच वेळ ग्लाडसाहेब बसून राहिला. निदान हा तरी फोन फाशी कॅन्सल झाल्याचा असावा असे त्याला वाटले. त्याच्या कारकीर्दीत एका बड्या पुढाऱ्याला नऊ आदिवासींना जिवंत जाळल्याबद्दल चार वेळा फाशीची शिक्षा झाली होती; पण तो एक बडा पुढारी असल्याने फाशीच्या आदल्या रात्रीच त्याची शिक्षा रद्द झाली होती. इतकेच नव्हे तर, दोन वर्षांनी त्याला सोडूनही देण्यात आले होते. जर एका नरपशूची फाशी रद्द होऊ शकते, तर एका तरुण, बुद्धिमान क्रांतिकारकाची शिक्षा रद्द व्हायला काय हरकत होती ?'

ग्लाडसाहेबाने फोन उचलला. सीनियर जेलर बोलत होता...

'सर, कैदी नंबर सातसोअडतीस...'

'कोण ?'—ग्लाडसाहेबाने विचारले.

'सर, तो फाशीगेटचा वेडा कैदी. आज दुपारी जो झोपला तो उठलाच नाही. झोपेतच मेला असावा !'

'असेल तसाच राहू दे ! मी येतोच.' ग्लाडसाहेबाने हुकूम फर्मावला आणि ऑर्डर्लीने साहेबाच्या पायांत बूट चढविले...

सूर्य अस्ताला चालला होता. आकाश शेंदरी झाले होते. संपूर्ण तुरुंगावर मृत्यूचे सावट पसरू लागले होते. तुरुंगाच्या दगडी भिंती नुसत्या अंधाराचे रूप धारण करू लागल्या होत्या.

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाड्खाड् वाजू लागली. गार्ड-ड्यूटीवरले हवालदार अटेन्शनमध्ये उभे राहिले.

—ग्लाडसाहेब तुरुंगाकडे चालला होता !

ग्लाडसाहेबाने फाशीगेटमध्ये पाऊल टाकले. समोरच्या साऱ्या कोठड्या अगदी मोकळ्या-माणसाच्या निष्प्राण कुडीप्रमाणे अचेतन होऊन पडल्या होत्या. केवळ एकाच कोठडीत दिवा लुकलुकत होता. नक्षलवादी मात्र त्या मिणमिणत्या उजेडात लिहीत बसला होता आणि दुसऱ्या कोठडीत त्या वेड्या कैद्याचा निष्प्राण देह ! साहेबाच्या डोक्यात विचार आला—उद्या रात्री संपूर्ण फाशीगेटमध्ये अंधार असेल. पुन्हा या फाशीगेटमध्ये कोणी फाशीची शिक्षा लागून येऊ नये. पुन्हा या फाशीगेटमध्ये विझण्यासाठी दिवे पेटू नयेत !

ग्लाडसाहेबाला आलेला पाहताच फाशीगेटचा वेंधळा जमादार जेलर आणि सीनियर जेलर पुढे सरसावले. साहेबाला सलाम ठोकून जमादार सांगू लागला,

'साहेब, सकाळचा भत्ता खाल्ल्यानंतर वेडा कैदी जो झोपला तो उठलाच नाही ! संशय आला म्हणून मघाशी आत जाऊन त्याला पाहिले तर मेलेला !...'

'आर. एम्. ओ. ने तपासले ?'—ग्लाडसाहेबाने प्रश्न विचारला.

'नो सर. आज सकाळीच भाऊ आजारी असल्याची तार आली असे सांगून लीव्ह ॲप्लिकेशन टाकून आर्. एम्. ओ. निघून गेले !'— सीनियर जेलरने उत्तर दिले.

'गांडू साला !' ग्लाडसाहेब उद्वेगाने बोलला, 'या आर्. एम्. ओ. ची ही सवयच आहे. नेमका फाशीच्या दिवशी काही तरी निमित्त काढून लीव्ह–ॲप्लिकेशन टाकून चालता होतो !'

'मला वाटतं सर, डॉक्टरांना फाशीच्या शिक्षेच्या वेळी हजर राहणं सहन होत नसावं !' सीनियर जेलरने शंका व्यक्त केली.

'मग साला झाला कशाला जेलचा डॉक्टर ?' ग्लाडसाहेब बोलला. 'भडवे माणसाला उभा-आडवा चिरतात. ऑपरेशन टेबलावर, तरी फाशी देताना पाहून तंतरतात. नॉनसेन्स ! झाले कशाला जेलचे डॉक्टर !'—ग्लाडसाहेब तिरस्कारला.

मग जरा वेळ शांतता पसरली आणि नेहमीच्या खाक्याप्रमाणे आल्या प्रसंगातून ग्लाडसाहेबानेच मार्ग काढला.

'असं करा, उद्या सकाळी सिव्हिल सर्जन येईलच. तेव्हा नक्षल-वाद्याबरोबर या वेड्याचंही पोस्टमॉर्टेम करून टाका आणि रिपोर्ट तयार करा !'

नुसत्या माना हलवून सर्वांनी साहेबाचा हुकूम स्वीकारला. मग जरा वेळ शांतता पसरली. साहेब जायला निघाला तेव्हा वेंधळ्या जमादाराला त्याने सहज विचारले,

'जमादार, मरण्याआधी देखील हा वेडा कैदी 'मैंने खून किया नहीं, मैंने खून किया नहीं असेच ओरडत होता का ?'

'नहीं साहेब, आज तो एकदाही तसं ओरडला नाही. आज सकाळ-पासून तो फक्त गात होता. '—जमादाराने उत्तर दिले.

जमादाराची माहिती ऐकून ग्लाडसाहेबाला आश्चर्य वाटले आणि जमादाराला त्याने सहज विचारले, 'काय गात होता ?'

जमादाराने लगेच गाण्याचे बोल सांगितले...

'हे प्रिये, तुझ्यासाठी,

सैतानलाही आव्हान दिले मी; पण तुझ्याचमुळे का ईश्वरालाही विसरलो मी...'

साहेब दगड होऊन जमिनीला खिळला. बऱ्याच वेळाने भानावर आला आणि जड पावलाने फाशीगेटमधून बाहेर पडला...

एव्हाना रातकिड्यांची किरकिर सुरू झाली होती !

'उंच शिखर असलेल्या चर्चमध्ये शिरतोय आपण !'

ग्लाडसाहेबाला नक्षलवाद्याचे शब्द आठवले.

साहेब क्षणभर थांबला आणि त्याने समोर नजर टाकली.

फाशीच्या कोठडीसमोरचे मैदान खुरपून स्वच्छ केले होते. गवताचे एकसुद्धा हिरवे पाते शिल्लक नव्हते.

–जणू जीवनाचा अवशेषच नव्हता!

मग ग्लाडसाहेब चार पावले पुढे सरकला आणि बुटाने अलगद त्याने दरवाजा ढकलला.

कोठडीचा दरवाजा वाजवीपेक्षा जरा जास्त करकरला तसे साहेबाने निरीक्षण केले. बिजागरी गंजली होती.

'बिजागरी नवीन बसवून घ्या!' साहेबाने फर्मावले, फाशीगेटच्या जेलरने तत्परतेने नोटबुकमध्ये साहेबाचा हुकूम लिहून घेतला.

मग साहेबाने कोठडीत पाऊल टाकले.

सारी कोठडी फिनेल मारून स्वच्छ धुऊन काढली होती. भिंतीही लख्ख केल्या होत्या. एकदम वहीच्या एखाद्या कोऱ्या पानाप्रमाणे मग साहेब स्वतःला सावरीत स्लोपवरून ओटयाखालच्या खड्डयात उतरला. डोक्यावरली फळी आणि पायाखालची फरशी यात बरोबर आठ फूट अंतर आहे हे त्याने पुन्हा तपासले. मग उलटपावली परत येऊन तो स्लोपवरून ओटयावर चढला. फासाखालच्या फळयांना दोन-चार सणसणीत लाथा हाणून त्या भक्कम आहेत की नाहीत त्या तपासल्या. मग हलकेच उडी मारून वरचा बार पकडून एक प्लस त्याने काढली. बार भक्कम होता; पण थोडासा फिरला. मग त्याने बारचे भिंतीतले स्क्रू पिळायचा हुकूम सोडला...

फाशीगेटच्या जेलरने त्वरित सुतारखात्याच्या वॉर्डरला बोलवणे धाडले.

ग्लाडसाहेबाने हयगय नको म्हणून पुन्हा फळया तपासल्या. तेल-पाणी खाऊन चकाकणाऱ्या त्या फळया माणसाच्या रक्ताकरता जिभा लवलवत होत्या.

अखेर ग्लाडसाहेबाने दोराला हात घातला. लोण्यात तीन दिवस बुडवून वळलेला फासाचा दोर हातात ठरत नव्हता. जरा मुठीत पकडला की सर्रकन् सरकत होता. साहेबाने दोराचा पितळी हूक पाहिला. नेहमीप्रमाणेच तो जड नि थंड होता. कैद्याच्या कानशिला-खाली गप्पकन रुतून मज्जारज्जू तोडून टाकण्यास तो समर्थ होता. सारं काही जेथल्या तेथे बिनबोभाट पाहून साहेब प्रसन्न झाला आणि ट्रायलचा त्याने हुकूम केला.

दोघे शिपाई पोतं फरफटवीत घेऊन आले. साहेबाने पोत्याला काटा लावला. बरोबर एकशेचाळीस पौंड. मग रजिस्टरमध्ये डोके घालून नक्षलवाद्याचेही वजन तेवढेच असल्याची त्याने खात्री करून घेतली.

शिपायांनी पोतं फरफटवीत फळीवर नेऊन उभे केले. फाशीगेटच्या जेलरने फासाचा दोर पोत्याभोवती बसवला. पितळी हूक वाळूत रुतला आणि पोते जाम झाले. फाशीगेटचा जेलर खाली उतरला. सीनियर आणि तो एका रांगेत उभे राहिले.

मग ग्लाडसाहेबाने खटका ओढला.

खडाड ऽऽखाड ऽऽऽ

फळया दणकन आपटल्या. त्यांचा आवाज बंद–कोठडीत गोल गोल घुमला.

–आणि ग्लाडसाहेबाचे काळीज लखलखले. त्याच्या हाताला कंप फुटला आणि पाय थरथरू लागले.

फासाने गोणपाट फाटून पोत्यातील वाळू भसाभसा खड्डयात सांडत होती आणि सांडणाऱ्या त्या वाळूच्या वेगाने साहेबाचा धीरही खचत होता.

'सब ठीक है...सब ठीक है!...'

यार्डायार्डात रात्रपाळीचे हवालदार ओरडत होते.

फाशीगेटचा दरवाजा उघडला नि साहेब बाहेर पडला.

वेंधळ्या जमादाराने गडबडीने पुढे होत साहेबाच्या डोक्यावर छत्री धरली.

मुसळधार पाऊस कोसळत होता. विजा लखलखत होत्या. ढग गडगडत होते.

फाशीची पूर्ण तयारी झाली होती!

मेनगेटच्या फरसबंदीवर नालबंद बूट आपटू लागले. तटाबाहेरील आर्म्ड हवालदार एकेक करीत आत येऊ लागले. यार्डा–यार्डातला पहारा वाढू लागला. मध्यरात्रीच पुन्हा एकदा गिनती घेण्यात आली....

खरे तर एवढ्या कडेकोट बंदोबस्ताची काहीच गरज नव्हती. लांडग्याविरुद्ध मोठ्या मेंढ्या कधीच बंड करू शकत नाहीत; पण रिवाज म्हणजे रिवाज!...सारे कसे रीतीप्रमाणे झाले पाहिजे!

ग्लाडसाहेब आपल्या ऑफिसात येऊन स्थानापन्न झाला. नक्षल-वाद्याचे सर्व केसपेपर नि रजिस्टर त्याच्यापुढे ठेवण्यात आली. साहेबाने ती पुन्हापुन्हा डोळ्याखालून घातली आणि सर्व काही बरोबर असल्याची खात्री करून घेतली.

'सब ठीक है...सब ठीक है!...' यार्डायार्डात रात्रपाळीचे हवालदार ओरडले.

...साहेबाने खिशातून व्हिस्कीचा पाइंट काढून तोंडाला लावला. त्याचे जरा वेळ लखलखलेले काळीज पुन्हा गोठू लागले नि हाता-पायांच्या नसा पुन्हा फुलू लागल्या. साहेबाच्या जिवात जीव आला नि फाशीचे दोर अधिकच निष्प्राण झाले!

'सर, टेलिफोनलाइन इज आउट ऑफ ऑर्डर.'

–सीनियरने साहेबाला इन्फॉर्म केले.

'व्हॉट?'

ग्लाडसाहेबाने त्रासिकपणे कातवून विचारले. मग रिसीव्हर घेऊन कानाला लावला. चार वेळा नंबर फिरवला आणि लाइन डेड आहे हे पाहून रिसीव्हर दाणकन आपटला.

'आय हँगड् वन हंड्रेट अँड एटीन क्रिमिनल्स...'

ग्लाडसाहेब चिडून सांगू लागला, 'पण या नक्षलवाद्याइतका मन-स्ताप मला कधी झाला नाही! नाउ व्हॉट टू डू?'

ग्लाडसाहेबापुढे मोठा प्रश्न पडला होता. रीतीप्रमाणे मध्यरात्रीच सिव्हिलसर्जनला जेलमध्ये आणले जात असे. मग सकाळी सहाच्या ठोक्याला फाशी; पण आज सिव्हिलसर्जनचा अजूनपर्यंत पत्ताच नव्हता. नदीनाले भरून चालले होते...तुरुंगाचा शहराशी असलेला संबंधच तुटला होता आणि टेलिफोन आउट ऑफ ऑर्डर!

'सर, रायडरला वैजाखरोडने पाठवू?'

सीनियरने उपाय सुचवला आणि हाताखालच्या माणसाने सुचवलेला मार्गही ग्लाडसाहेबाने मान्य केला. मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. रस्ता दूरचा आणि खराब होता. मोटारसायकलवरून मेसेंजरने जावे आणि डी. एस. पी. कडून पोलिसजीप घेऊन सिव्हिलसर्जनला घेऊन यावे असे ठरले. नाही तरी नाल्याचे पाणी फार वेळ राहत नसेच. पहाटेपर्यंत सिव्हिलसर्जनला आणणे जरुरीचे होते. सिव्हिलसर्जनबरोबरच डिस्ट्रिक्ट मॅजेस्ट्रेटही येणार होता.

सीनियरने डी. एस. पी. साठी दिलेला तर्जुमा टायपिस्टने ताडताड टाइप केला. ग्लाडसाहेबाने नजरेखाली घालून सही ठोकली. मेनगेटच्या जेलरने मेसेज घाईगर्दीने लखोटयात घालून सीलबंद केला. आपला पाण्याने जड झालेला रेनकोट सांभाळत रायडर मोटारसायकलवरून चालता झाला.

सीनियरने हॅट काढून डोक्यावरचा घाम पुसला. ग्लाडसाहेबाने व्हिस्कीचा पाइंट तोंडाला लावला.

रायडरला जाऊन तासभर लोटला होता; पण पावसाचा जोर काही कमी झाला नव्हता. आकाश फाटल्यासारखा धो धो पाऊस पडत होता. रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले होते. इतकंच काय पण मेनगेटमध्येही घोटाभर पाणी साचले होते. फाशीच्या कोठडीत पाणी जाते की काय याचीच फाशीगेटच्या जेलरला चिंता लागून राहिली होती. त्याने सीनियरची फॉर्मल परमिशन घेतली आणि चार वॉर्डर, वॉचमन बराकीतून उठवून आणले. भट्टीखान्यातून वाळूची पोती आणवून फाशीच्या कोठडीच्या दरवाज्यासमोर टाकून घ्यायला सुरुवात केली.

एकंदरीत एरवीच फाशीची रात्र फार अभद्रच असे; पण आजची रात्र नुसती अभद्रच नाही तर चमत्कारिकही होती. स्टाफपैकी कोणाच्याही डोळयाला डोळा लागत नव्हता. पहाऱ्यावरल्या हवालदार-जमादारांपासून सीनियर साहेबापर्यंत सारे ताटकळत सहाच्या टोलची वाट पाहत होते. एकदा खटका ओढला गेला, सहाचे टोल पडून यार्डायार्डात 'सब'ठीक है' चा पुकारा झाला की सारेजण चिंता आणि क्लेश यातून सुटणार होते.

पहाऱ्यावरल्या रात्रीपाळीच्या हवालदारांची मात्र आज चांगलीच कुचंबणा झाली होती. संध्याकाळी रोलकॉल झाल्या झाल्या त्यांना ड्यूटीज वाटून यार्डायार्डात धाडले गेले होते. जेवायलाही उसंत मिळाली नव्हती. त्यात आज फाशीचा दिवस असल्याने एकाही यार्डात एकाही बराकीत हंडी पेटली नव्हती. समाजातल्या घाणीतली घाण असलेल्या त्या निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या जगातही फाशीच्या रात्री हंडी पेटवणे, गांजा–चरसाच्या चिलमी फिरवणे, नाही तर जुगाराचा डाव मांडणे असभ्यपणाचे समजले जाई. अंगाचे मुटकुळे करून आढयाला डोळे लावून सारे कैदी बंदी संपायची वाट पाहत नुसते पडून राहिले होते. त्यांच्याचपैकी एकजण आज फाशी जाणार होता.

–फाशीगेटमधल्या आपल्या कोठडीत नक्षलवादी मात्र मायकोवस्कीच्या पोएम्स वाचता वाचता शांतपणे झोपी गेला होता.

मुसळधार पावसात छत्री सांभाळत वडया साहेबाचा सेंट्री येताना पाहून मेनगेटच्या जमादाराने दरवाजा खोलला. सेंट्री काकडत काकडत आत आला. 'साब है ?' जमादाराला त्याने विचारले.

'हां. है.' जमादाराने उत्तर दिले.

'बडे साब ऽ !'

सेंट्रीने ग्लाडसाहेबाला सलाम ठोकत हाक मारली.

'क्या है ?'

'साब, बेबीमेमसाब को बहुत तकलीफ होता है. आपको पुकारता है....'

सेंट्रीला धड काही सांगता येईना; पण त्याच्या गोंधळलेल्या–गडबडलेल्या चेहऱ्याने सांगायचे ते सांगितले. ग्लाडसाहेब धडपडत उठला. सीनियरनेही डोक्यावर लगेच हॅट चढवली.

'सर, फ्रॉम येस्टरडे नर्स इज अॅटेंडिंग हर.'

सीनियरने साहेबाला इन्फॉर्म केले. गेल्या दोन दिवसांपासून जेलहॉस्पिटलमधली नर्स बेबीमेमसाबच्या देखभालीसाठी ग्लाडसाहेबाच्याच बंगल्यावर मुक्काम ठोकून होती आणि शहरातल्या लेडीज स्पेशॅलिस्टने तारीखही तशी दोन आठवडे पुढचीच दिली होती. तसे चार-दोन दिवस पुढे–मागे होतातच. 'त्यात काळजी करण्यासारखे काही नसते.' सीनियरने नेहमीचेच पालुपद लावले; पण पोरगी ग्लाडसाहेबाची होती !

'एकदा समक्ष पाहून आलेलंच चांगलं.' ग्लाडसाहेबाने विचार केला. मग ग्लाडसाहेब आणि पाठोपाठ सीनियर मुसळधार पावसात बंगल्याकडे चालू लागले. सेंट्रीने स्वतः भिजत साहेबाच्या डोक्यावर छत्री धरून साहेबाची पाठ धरली.

ग्लाडसाहेब बंगल्याच्या फाटकाशी आला नि जेनीच्या किंकाळीने मटकन फाटकाला टेकला. त्याच्याच्याने पाऊल उचलेना. जेनीच्या जीवघेण्या किंकाळयांनी त्याच्या काळजाचे पाणी पाणी होऊन गेले. त्याच्या पायांना कंप फुटला. सीनियरने परिस्थिती ओळखली आणि साहेबाला धीर देऊन, साहेबाला बंगल्याकडे चालवण्यास सुरुवात केली. तसा सीनियर खालच्या रँकचा असला तरी या बाबतीत मात्र ग्लाडसाहेबाला तो सीनियर होता. चार पोरांचा बाप नि दोन नातवांचा आजा होता. ग्लाडसाहेबही स्वतःच्या खांद्यावरल्या फिती विसरला नि मदतीच्या, सल्ला–मसलतीच्या आशेने आशाळभूत नजरेने सीनियरकडे पाहू लागला.

'यू डोंट वरी सर, नथिंग इज सीरियस !' सीनियरने साहेबाला धीर दिला खरा; पण बंगल्यात पाऊल टाकताच एकंदर वातावरण पाहून तो मनोमन हादरला.

खालच्या हॉलमध्ये शिपाया–जेलरांच्या चार बाया कडवोळे करून बसल्या होत्या. लांब आणि गंभीर चेहऱ्याने आपापसात कुजबुजत होत्या. सीनियरला पाहताच जराशी पोक्त अशी एक बाई उठली... सीनियरच्या कानात तेलगूत काही कुजबुजली. सीनियरचा चेहरा अधिकच गंभीर झाला.

'व्हॉट शी सेज् ? व्हॉट शी सेज् ?'

ग्लाडसाहेबाने काकुळतीला येऊन पुन्हापुन्हा विचारले; पण सीनियर एक शब्द न बोलता पायऱ्या चढू लागला. वरच्या व्हरांड्यात सीनियरबरोबर ग्लाडसाहेब आला नि जेनीच्या किंचाळण्याने मटकन खुर्चीत बसला. सीनियरने बेडरूमच्या दरवाजावर टकटक केले. बेडरूमचा दरवाजा थोडा कलकलला......चेहऱ्यावरचा घाम पुशीत

नर्स बाहेर आली आणि सीनियरला तिने सांगितले,

'केस गंभीर आहे! लगेच सिजरिंग केलं नाही तर पेशंट वाचणार नाही!'

सीनियर दगड होऊन मातीला खिळला. ग्लाडसाहेब धावत पुढे झाला नि त्याने नर्सचे खांदे धरून गदगदा हालवीत काय झाले ते विचारू लागला. नर्सने पुन्हा तेच उत्तर दिले. ग्लाडसाहेब गडबडला. गोंधळला. मग वेड्यासारखे बडबडला, 'अँब्यूलन्स! अँब्यूलन्स!'

मग ग्लाडसाहेब गडबडला होता तरी सीनियर पूर्ण शुद्धीवर होता. अँब्यूलन्स बोलावून काही उपयोग नव्हता. इतक्या सीरियस पेशंटला अँब्यूलन्समधून नेणे आधी अवघड होते. त्यात शहराशी संबंधच तुटलेला होता.

'कोणी... कोणी सर्जन अॅव्हेलेबल नाही?'

ग्लाडसाहेबाने पुन्हापुन्हा वेड्यासारखा तोच तोच प्रश्न विचारला; पण आर. एम. ओ. रजेवर गेला होता आणि सिव्हिलसर्जन यायला पहाट उजाडायला हवी होती. शहरात जाणे तर अशक्यच होते. सीनियरने मन घट्ट करून साहेबाला सांगितले,

'सर, वुई हॅव टू वेट फॉर मॉर्निंग!'

पण सकाळपर्यंत थांबणे अशक्य होते. नर्सने एकदम विचारले,

'सर, तो नक्षलवादी चांगला सर्जन आहे ना?'

सीनियरने डोळे वटारून नर्सला दाटण्याचा प्रयत्न केला; पण नर्सचे तिकडे लक्षच गेले नाही. तिने सरळ ग्लाडसाहेबालाच विचारले,

'सर, त्या नक्षलवाद्यालाच बोलावून घ्या ना! आर. एम. ओ. सांगत होते, ही इज् ए व्हेरी गुड सर्जन. इक्विपमेंट्स् सर्व आहेत आपल्याकडे!'

नर्सचा सल्ला ऐकून ग्लाडसाहेब फक्क झाला. फाशीच्या कैद्याला तुरुंगात देखील फाशीगेटच्या बाहेर काढण्याचा कायदा नव्हता. तशात ज्याला चार तासांनी फाशी द्यायचे त्याला तुरुंगाबाहेर काढायचे? अशक्य, अशक्य!

पण जेनीच्या वाढत्या किंचाळ्यांनी ग्लाडसाहेब अधिकाधिक हतबल होत चालला होता. पोरीचा जीव वाचवायचा असेल तर कायदा धाब्यावर बसवण्याशिवाय गत्यंतर नव्हते आणि कायद्याबाहेर जाऊन वागणे साहेबाच्या शिस्तीत बसत नव्हते.

जेनीच्या एका आर्त किंचाळीने सीनियर दचकला. ग्लाडसाहेब अधिकच रडवेला झाला. तशी नर्स संतापाने फणफणली आणि ग्लाडसाहेबाला फाडदिशी बोलली,

'मिस्टर ग्लाड, यु टेक युवर ओन डिसिजन इमिजिएटली. जर काही बरं-वाईट झालं तर मग मला ब्लेम करू नका!'

ग्लाडसाहेब ताडकन् उभा राहिला. व्हिस्कीचा पॉइंट त्याने तोंडाला लावला आणि नर्सला हुकूम सोडला, 'तू इक्विपमेंट्स् मागवून घे. सर्जन आम्ही आणतो!'

साहेबाचा हुकूम सुटला होता. फाशी गेली खड्ड्यात! साहेबाचा हुकूम मानणे अधिक महत्त्वाचे होते. सेंट्री परिस्थिती ओळखून फाशीगेटच्या जेलरला इनफॉर्म करायला पुढे धावत निघाला. सीनियरने साहेबाला सॅल्यूट ठोकला आणि साहेबाच्या बेकायदेशीर हुकुमाची तामिली करायला तुरुंगाकडे चालू लागला.

सीनियर जेलर खाडखाड चालत होता. गार्डड्यूटीवरले जमादार रायफली सावरत त्याच्या मागोमाग पळत होते. फाशीगेटचा जेलर सीनियरसाहेबाची वाटच पहात होता. सीनियरसाहेबाला पाहताच त्याने हुकूम केला नि फाशीगेटचा दरवाजा करकरला. साऱ्या लव्याजम्यासहित सीनियरसाहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन उभा ठाकला.

फाशीच्या कोठडीत गळफास लोंबत होता.

बाहेर वादळाने आणि पावसाने आकांडतांडव घातले होते. क्षणाक्षणाला घड्याळाचा काटा सहाच्या दिशेने सरकत होता.

पण नक्षलवादी मात्र आपल्या कोठडीत शांत चित्ताने झोपी गेला होता आणि मायकोवस्कीच्या पोएम्स् त्याच्या हृदयाचे ठोके मोजत त्याच्या छातीवर उपड्या पडल्या होत्या.

सीनियर जेलरची क्षणभर मती गुंग झाली. चार तासांनी ज्याला हँग करायचे आहे त्याच्याकडून ग्लाडसाहेबाच्या मुलीसाठी जीवदान कसे मागावे हेच त्याला सुचेना. मग त्याने हातातला दंडा नुसता गजांवरून फिरवला...

कड-कड, कड-कड, कड-कड... आवाजाने नक्षलवाद्याची झोप चाळवली. डॉक्टर... डॉक्टर... सीनियरसाहेबाने अडखळत्या घोगऱ्या आवाजात हाका मारल्या. नक्षलवादी जागा झाला. एकवार त्याने छताकडे नजर टाकली आणि मग उठता उठता त्याने सीनियर साहेबाला विचारले, 'निघायची वेळ झाली?'

सीनियर जेलरने नुसती नकारार्थी मान हालवली.

'देन व्हाय यू डिस्टर्ब मी?' नक्षलवाद्याने प्रश्न केला.

क्षणभर सीनियरसाहेब गप्प राहिला. मग पुटपुटला...

'ग्लाडसाहेब तुमची वाट पाहताहेत. जेनी अडलीय!'

सीनियर जेलरच्या बोलण्याने नक्षलवादी स्तंभितच झाला.

'कोणी डॉक्टर अॅव्हेलेबल नाही?' त्याने विचारले.

'बाय गॉड, ओनली यू आर अॅव्हेलेबल!' सीनियरने उत्तर दिले.

'पण इक्विपमेंट्स?...'

'नर्सने बंगल्यावर नेलीत.' सीनियरने उत्तर दिले.

नक्षलवाद्यानं थोडा वेळ स्वतःशीच विचार केला. मग तो उठून सीनियर साहेबासमोर गेला आणि साहेबाला डोळा घालीत म्हणाला,

'चला. तेवढेच पुण्य गाठीला!'

वेंधळ्या जमादाराने क्षणाचीही वाट न पाहता दरवाजा उघडला. फाशीगेटच्या जेलरने नक्षलवाद्याच्या हातात बेड्या चढवल्या आणि एक बेडी आपल्या हाताला अडकवून नक्षलवाद्याला चलायचा इशारा केला. नक्षलवाद्याने पाऊल टाकले नि गार्डड्यूटीवरले हत्यारी शिपाई पुढेमागे उभे राहिले.

कैदी नंबर आठसोबयालिस, डॉक्टर वीरभूषण पटनाईक चालू लागला.

जीपची पाठ मेनगेटला लावून ड्रायव्हर तयारच होता. नक्षलवादी शिपायांसकट जीपमध्ये चढला नि सुसाट धावत जीप साहेबाच्या बंगल्याच्या फाटकाशी येऊन उभी राहिली. नक्षलवाद्याने जमिनीवर पाऊल टाकले नि मोकळ्या हवेचा आणि रातराणीच्या सुवासाचा एक दीर्घ श्वास घेतला. सीनियर जेलर पुढे झाला आणि सारा लवाजमा जिना चढू लागला.

व्हरांड्यात ग्लाडसाहेब त्यांचीच वाट पहात उभा होता. आत त्याची लाडकी लेक प्रसूतीच्या असह्य वेदनांनी तडफडत होती, रडत-ओरडत होती.

'हॅलो मिस्टर ग्लाड, हाऊ आर यू?' नक्षलवाद्याने नेहमीचे स्मित केले.

ग्लाडसाहेब लाचार... दीनवाणा होऊन नक्षलवाद्याला सामोरा गेला. ज्याच्याशी उभा दावा मांडला त्या वैऱ्यालाच फाशी देण्याआधी आपल्या मुलीचे प्राण कसे मागावे ते साहेबाला समजेना... आणि हा कैदी आपल्या मुलीचा जीव तर घेणार नाही ना, ही भीतीही त्याच्या मनातून जाईना.

जेनीच्या किंचाळीने पुन्हा त्या दगडी भिंतीच्या पाषाणअंगावर काटा उभा राहिला नि पुन्हा ग्लाडसाहेबाचे काळीज फाटले. मग एकदम पुढे होऊन त्याने आपली कॅप नक्षलवाद्याच्या पायांवर ठेवली नि कमरेचे रिव्हॉल्व्हर नक्षलवाद्याच्या हाती देत साहेब कळवळला... 'यू कॅन शूट मी माय बॉय... बट सेव्ह माय डॉटर. फॉर द सेक ऑफ गॉड, सेव्ह माय डॉटर!'

'मिस्टर ग्लाड, जगातल्या कोणत्याही सर्जननं पायात दंडाबेडी असताना हातात नाइफ घेतलेला नाहीय!...' नक्षलवादी निर्विकारपणे म्हणाला.

ग्लाडसाहेब भानावर आला आणि ओशाळत पुटपुटला...'आय ॲम व्हेरी सॉरी माय बॉय, व्हेरी सॉरी!' आणि तात्काळ हातातल्या रिव्हॉल्व्हरच्या दोन आवाजांनी ग्लाडसाहेबाने नक्षलवाद्याला बंधमुक्त केले. पायाला ओरखडाही न गेलेला पाहून नक्षलवादी आश्चर्यचकित झाला नि साहेबाला म्हणाला,

'रिव्हॉल्व्हर म्हणजे तुमच्यासाठी खेळणंय मि. ग्लाड!'

नक्षलवाद्याच्या कॉम्प्लिमेंट्सनी साहेब किंचित सुखावला.

मग साहेबाबरोबर नक्षलवादी बेडरूममध्ये आला. वेदनांनी तडफडणाऱ्या जेनीच्या कपाळावर मायेचा हात फिरवून नक्षलवादी तिच्या कानात कुजबुजला...

'जीन, ज्या वेदना वांझ नसतात त्यांचं दुःख करायचं नसतं!'

त्याला पाहून जीन समाधानाने हसली आणि होकारार्थी मान हलवून कमरेतून सणसणत आलेली एक कळ तिने ओठावर दातांनी दाबून धरली.

'मोठी धीराची आहेस जीन तू!' नक्षलवादी तिच्या गालांना थोपटत म्हणाला आणि मानेनेच त्याने नर्सला इशारा केला आणि नक्षलवाद्याने फर्मावले,

'मिस्टर ग्लाड, नो बडी कॅन स्टे हियर!'

'या!' साहेब पुटपुटला आणि त्याने सर्वांना बाहेर निघण्याचा इशारा केला. तेवढ्यात सीनियर पुढे सरसावला आणि म्हणाला,

'मि. पटनाईक, छतावर आणि प्रत्येक खिडकीखाली गार्डस् उभे आहेत. त्यांच्या हातांत लोडेड गन्स आहेत–'

नक्षलवाद्याने एकवार हसून मान हलवली आणि उत्तर दिले,

'माहितीय मला. त्यांना फक्त माणूस मारता येतो, वाचवता येत नाही!' सीनियर निरुत्तर झाला. तोच ग्लाडसाहेब गरजला...

'यू रास्कल! प्रत्येक शिपाई जेलवर परत पाठवा!'

आणि सीनियरच्या व स्वतःच्या कमरेची रिव्हॉल्व्हर नक्षलवाद्याच्या पुढ्यात टाकत तो म्हणाला...

'आय बिलीव्ह माय बॉय. यू आर. बॉर्न. रेव्होल्यूशनरी अँड नॉट ए ट्रेटर.' ...

आणि ग्लाडसाहेबाने दरवाजा लोटला!

पण बेडरूमचा बंद दरवाजाही जीनच्या किंकाळ्यांना रोखू शकत नव्हता. गांगरलेला ग्लाडसाहेब धावरून धाडधाड जिना उतरला आणि व्हरांड्याच्या पायथ्याशी रातराणीच्या रोपाखाली बसकण मारून बसला.

समोरच्या खोलीत हवालदार–जेलरांच्या दोन–चार बायका कडबोळे करून तोंडाशी पदराचे बोळे लावीत हळूहळू कुजबुजत होत्या. ग्लाडसाहेबाने डोळे बारीक करून कानात तेल ओतले.

त्या बायका, फाशीच्या कैद्याच्या हातात पोरीला सोपवले म्हणून साहेबावर ताशेरे झाडीत होत्या.

ग्लाडसाहेब थाडकन जागचा उठला. हातात कात्र्या, सुया असलेला नक्षलवादी निश्चितच आपल्या पोरीला ठार मारील या विचाराने संतापला. मग अगतिकतेने स्वतःच्याच कपाळावर चार बुक्क्या थाडथाड आपटीत तो परत तडातडा जिना चढू लागला.

'कूं कूं' करणारा चंप जिन्यातच साहेबाच्या पायांत घोटाळू लागला. साहेबाला जिना चढणे अशक्य झाले तशी रागाने साहेबाने ताडकन लठ्ठ बुटाचे टोक चंपच्या बरगडीत हाणले आणि त्याला दूर करीत तो व्हरांड्यात आला.

तोच बेडरूमचे दार करकरले आणि नर्स घाईघाईने बाहेर आली. ग्लाडसाहेब पोरासारखा धावत तिच्या पुढ्यात गेला; पण नर्सने हातानेच त्याला दूर केले आणि त्रासिकपणे ती म्हणाली, 'प्लीज डोंट डिस्टर्ब अस!' आणि काही तरी घेऊन लगबगीने ती परत आत गेली. बेडरूमचा दरवाजा पुन्हा एकदा बंद झाला.

जीनच्या सोबतीला नर्स का होईना पण आत आहे, या विचाराने साहेबाला थोडेसे हायसे वाटले. मग दैवावर भरवसा ठेवून समोरील स्टूल ओढून साहेब त्यावर बसला नि कठड्यावर हाताची घडी ठेवून त्याने मान खुपसली...

रात्र अशीच होती...पावसापाण्याची, विजाढगांची. दरवाजा थडाथडा वाजू लागला. जीव मुठीत धरून राहणारे मारा-ग्लाड जागे झाले. नाइटगाउनचा पट्टा आवळीत हलक्या हाताने खिडकीचा पडदा दूर करीत ग्लाडसाहेबाने बाहेर डोकावले...चार गेस्टापो बाहेर उभे होते. झटकन त्याने छोट्या जेनीला उचलले नि वेताच्या मोठ्या बास्केटमध्ये ठेवीत पारोसे कपडे वर गपागपा भरले आणि शेजारच्या आलमारीत माराला बंद करून थडाथडा वाजणारा दरवाजा उघडला. ...ते चौघे गेस्टापो लांडग्यासारखे आत घुसत ओरडले, 'कुठायत तुझी बायकापोरे? तसल्या घाण अशुद्ध ज्यूरक्ताची जर्मनराष्ट्राला गरज नाही!'

आणि त्यांनी पलंग उलटापालटा केला. सारे घर धुंडाळायला सुरुवात केली. एकजण बास्केटपाशी गेला नि त्याने पारोसे कपडे काढायला सुरुवात केली. आलमारीच्या फटीतून माराने ते पाहिले नि थाडकन ती बाहेर आली. सावज सापडल्याच्या आनंदाने ते चौघे तिच्यावर तुटून पडले नि लाथाबुक्क्यांच्या वर्षावात 'पोरगी

कुठाय ?' म्हणून चौकशी करू लागले. माराने उत्तर दिले, 'माझी मुलगी मेली !'

'केव्हा ?' ते गरजले.

'पंधरा दिवस झाले !' ग्लाड अभावितपणे म्हणून गेला. मग जर्मन राष्ट्राचे रक्त शुद्ध ठेवण्यासाठी ते चारीजण माराच्या झिज्या उपटीत तिला फरफटत नेऊ लागले. ग्लाडसाहेब लाचारीने गयावया करीत चौकापर्यंत धावत गेला होता. गेस्टापोंनी माराला गाडीत कोंबले तेव्हा ग्लाडने रडत-ओरडत त्यांच्या पायांशी लोळण घेतले. तेव्हा खाडकन ग्लाडसाहेबाच्या मुस्कटात मारत मारा ओरडली, 'पुरुषासारखा पुरुष असून षंढासारखी अत्याचाऱ्यांच्या पुढ्यात लोळण का घेतोयस ?'

ग्लाडसाहेब कावराबावरा झाला. त्यान मान उचलली. बेडरूम अजून कण्हत होती. दिवा मिणमिणत होता. सीनियर जेलर खुर्चीवर अस्वस्थपणे बसला होता. ग्लाडसाहेबाने हाताच्या घडीत पुन्हा मान खुपसली. 'माराला घेऊन गेस्टापो चालते झाले आणि सर्वस्व हरपलेला ग्लाड घरी परतला. तो बेडवर बसून छोटी जीन 'मम्मा—मम्मा' करीत रडत होती. साहेबाने तिला पाहिले आणि आपण सर्वस्व हरवून बसलो नाही, अजून माराचा ठेवा आपल्याकडे आहे हे तो समजून चुकला. गपकन आपल्या राठ हातांनी त्याने जेनीचे तोंड दाबले. दिवे मालवून अंधार करीत ब्लँकेटात जेनीला गुंडाळून ग्लाड धावत सुटला. बर्लिनहून तो लंडनला कसा पोचला हे त्याचे त्यालाच आठवत नव्हते !

युद्ध संपले. राइशटॅग मातीला मिळाले आणि वेड्यासारखा ग्लाड पुन्हा दग्धभू जर्मनीत आला. जर्मन राष्ट्र राखेतून पुन्हा उभे राहत होते, नवे जीवन फुलवत होते; पण उद्‌वस्त झालेल्या ग्लाडला काही पूर्वस्मृती सापडेना; मिळेना. रस्ता-रस्ता वेड्यासारखा तुडवल्यावर त्याला दिसली फक्त शाळा. ज्या शाळेत मारा टीचर होती. ज्या शाळेच्या फाटकाभोवती तरणा ग्लाड भिरभिरत घिरट्या मारीत असे. तो शाळा तशीच होती आणि फाटकही तसेच!

मारा गॅसचेंबरमध्ये जळल्यानंतर तब्बल चार वर्षांनी त्या फाटकावर डोके ठेवून ग्लाडसाहेब ढसढसा रडला होता. मग विक्षिप्तासारखे ग्लाडसाहेबाने जेनीला त्याच शाळेत घातले. साहेबाला वाटले आपल्या षंढपणाने पोरगी आईला मुकली असली तरी या शाळेने तिच्या मायेला अंतरणार नाही. जेनीला शाळेत भरती करून ग्लाडसाहेब तडक इंडियाला परतला आणि त्याचा दिनक्रम सुरू झाला...

रोज कोणाच्या तरी पाठीवर दंडा मोडायचा, हाती सापडलेल्या कैद्याला तुडवतुडव तुडवीत माणसाच्या जातीचा सूड घ्यायचा, भरमसाट ढोसायची आणि छोट्या जीनला लांबलचक खूपखूप पत्रे लिहायची, गोष्टी लिहायच्या. पऱ्यांच्या, स्वर्गाच्या, हिंदुस्तानातील वाघांच्या, सापांच्या आणि सिंहांच्याही.

तेव्हा 'पोरगी मेली' हे शब्द उच्चारून साहेबाने पोरीचे प्राण वाचवले होते; पण आज तेच शब्द साहेबाचे प्राण कासावीस करीत होते.

ग्लाडसाहेबाच्या विचाराने शिणलेल्या डोक्याला पेंग यायला लागली.

'टँह्याँ ऽऽ टँह्याँ ऽऽ' नवजात अर्भकाचे रडणे ग्लाडसाहेबाच्या कानात घुमू लागले. साहेबाने घाईगर्दीने आत जाऊन पाहिले. ब्लँकेट अंगावर घेऊन पडलेल्या माराच्या कुशीत एक लालभडक मांसाचा गोळा हातपाय उडवीत होता. जेनीचा जन्म झालेला पाहून वेड्यासारखे माराचे नि तिचे ग्लाडसाहेबाने पटापट मुके घेतले होते. आपले लठ्ठ पाकीट त्या रात्री मित्रांसमवेत शँपेनच्या बाटल्या फोडण्यात साहेबाने रिते केले होते. जेनीच्या जन्माच्या आठवणीने...तिच्या टँह्याँ टँह्याँ ऽऽ टँह्याँ ऽऽ' रडण्याच्या आवाजाने साहेबाला घेरून टाकले. साहेबाची छाती भरून आली. नाक मुसमुसू लागले नि मनातल्या मनात ग्लाडसाहेब हुंदके देऊ लागला. त्याच्या कानात छोट्या जेनीच्या रडण्याचा आवाज घुमत होता...टँह्याँ ऽऽ टँह्याँऽऽ'

'सर ऽ...सर ऽऽ' सीनियर जेलरने ग्लाडसाहेबाला गदागदा हालवीत भानावर आणले. ग्लाडसाहेबाने मान उचलली. त्याचे डोळे डबडबलेले होते! आणि नाक सूं सूं करीत होते.

'हार्टी कॉंग्रेच्युलेशन सर! यू आर ग्रँड फादर नाऊ! तुम्हाला नातू झाला! ...' सीनियर सांगत होता. ग्लाडसाहेबाने सभोवार पाहिले. बेडरूममधून तान्ह्या बाळाचे रडणे ऐकू येत होते. दिवा मिणमिणत होता. गळून गेलेल्या ग्लाडसाहेबाने उभे राहत विचारले...

'माझी जीन कशीय ? जीन कशीय ?'

नर्स पुढे होत म्हणाली,... 'शी इज क्वाइट ओ. के. सर, केस फार डिफिकल्ट होती; पण चांगल्या सर्जनमुळे तुमची मुलगी मृत्यूच्या दाढेतून परत आली!'

ग्लाडसाहेब एकेक पाऊल चालत बेडरूमच्या दरवाजाशी जाऊन उभा राहिला...त्याला पाहताच म्लान आणि क्षीण होऊन पडलेल्या जीनने प्रसन्न होऊन हाक मारली. 'पापा ऽ पापा ऽऽ !'

ग्लाडसाहेब आवेगाने पुढे गेला. जेनीचे हात घट्ट पकडत बोलण्याचा प्रयत्न करू लागला; पण बराच वेळ त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. अखेर गदगदलेल्या सुरात त्याने विचारले...

'बेटा, फार त्रास झाला का ग ?'

'ना पापा! ज्या वेदना वांझ नसतात त्यांचा त्रास होत नाही !' जेनी म्हणाली. ग्लाडसाहेबाने तिचे तळवे आपल्या गरम कपाळावर ठेवले आणि समाधानाचे हसू त्याच्या ओठांवर फुटले. मग त्याला नक्षलवाद्याची याद आली. त्याने पाहिले, नक्षलवादी स्वतःच्या कामात मग्न होता. कसले तरी इंजेक्शन जेनीच्या दंडात तो खुपसत होता. त्याला काय नावाने हाक मारावी हेच ग्लाडसाहेबाला समजेना. मग साहेब उठून त्याच्या समोर गेला नि त्याचे खांदे थोपटत पुटपुटला...'

'यू सी... यू सी...'

नक्षलवाद्याने एकवार ग्लाडसाहेबाकडे पाहिले नि चटकन त्याच्या खिशातील पेन काढून घेत पेपरवर चार औषधे लिहीत नर्सला ती आणवायला सांगितले. मग त्याने एकवार डोळे घट्ट मिटून सर्व कामाची उजळणी केली. बाकी काही राहिले नाही याची खात्री पटल्यावर तो उभा राहिला आणि एक मस्त आळस आणि जोरदार जांभई देत ग्लाडसाहेबाला म्हणाला,

'इट इज ऑल राइट मिस्टर ग्लाड! नाऊ कॅन यू अ‍ॅरेंज ए कप ऑफ टी फॉर मी ?'

'व्हाय नॉट ? व्हाय नॉट ? ग्लाडसाहेब पुटपुटला आणि एव्हाना

जमा झालेल्या गर्दीतल्या खानसाम्याला तावडतोब चहा बनवण्याची ऑर्डर त्याने दिली आणि नक्षलवाद्याला विचारले,

'वॉज इट व्हेरी डिफिकल्ट केस ?'

'ओ...नो;' नक्षलवादी काहीसा बेफिकीरपणे म्हणाला.

'केस तशी मायनर होती; पण थोडा वेळ मीच माझा आत्मविश्वास गमावला होता. वाटले, इतक्या दिवसांनी केस हातात घेतोय, जमेल की नाही. पेशंट मरायचा स्वतःच्या मरणानं आणि नाव डॉक्टरचं बदनाम व्हायचं. काय ?'

'रियली यू आर ग्रेट डॉक्टर!' नक्षलवाद्याचे खांदे थोपटत ग्लाडसाहेब पुटपुटला. 'फाशीचा दोर मानेवर लटकत असतानाही तू इतक्या शांत चित्तानं सिझरिंग करू शकलास!'

'फाशी ?' नक्षलवादी एकदम पुटपुटला. मग परिस्थितीची जाणीव होऊन तो खदखदून हसला आणि साहेबाला म्हणाला, 'पाहिलत मिस्टर ग्लाड! कोणत्याही नशेपेक्षा माणसाचे प्राण वाचवायची नशा सर्वांत वाईट, ती देहभानच काय स्वतःचा मृत्यूही विसरायला लावते. किती वाजले ? सहा वाजता तुम्हाला फाशी द्यायचंय मला!'

सीनियर लगेच घड्याळ दाखवीत पुढे आला आणि ग्लाडसाहेबाला म्हणाला,

'सर, वुई कांट स्पॉइल सिंगल मिनिट! फक्त दहा मिनिटं राहिलियत.'

तोच जीप घरघरत येऊन फाटकापाशी करंकन ब्रेक दाबून उभी राहिली. चार आर्मड् शिपायांना घेऊन फाशीगेटचा जेलर लगदगीने आला आणि साहेबाला शब्दानेही न विचारता त्याने नक्षलवाद्याच्या हातात बेड्या ठोकल्या. सीनियरने नक्षलवाद्याला चलण्याचा इशारा दिला. नक्षलवाद्याने पाठ फिरवली तोच ग्लाडसाहेब पुढे गेला आणि नक्षलवाद्याच्या बेड्या घातलेले हात हातात घेत, त्याचे मुके घेत त्याने नक्षलवाद्याला विचारले, 'पोरा, तू माझ्या मुलीला जीवदान दिलेस. मी काय देऊ तुला सांग! वाट्टेल ते माग मी देईन!'

साहेबाच्या उपकाराच्या ओझ्याने झुकलेल्या चेहऱ्याकडे पाहत नक्षलवादी तुच्छतेने म्हणाला,

'यू लिट्ल पुअर बेगर. तू काय देऊ शकतोस मला ? तू फक्त मला फाशी देऊ शकतोस!'

साहेबाने त्याच्या तोंडावर हात ठेवत गदागदा मान हलवली आणि साहेब म्हणाला,

'असं नको बोलूस पोरा. मी इतका भिकारी नाही! इतका भिकारी नाही. मी देईन...काही तरी देईन!'

'काय देऊ शकता तुम्ही मला ? आणि काही दिलेत तरी त्याची मला किंमत काय ?' नक्षलवाद्याने सवाल केला.

क्षणभर ग्लाडसाहेब दिङमूढ झाला. मग काही तरी विचार करून करारी नजरेने खणखणीत शब्दांत म्हणाला,

'यू ब्रेव्हो यंग चॅप! स्टिल यू डोंट नो मी. तुला बरंच काही देऊ शकतो मी. असं काही तरी देऊ शकतो की पुढले सात जन्म माझे उपकार तू विसरणार नाहीस!'

ग्लाडसाहेबाच्या या बोलण्याला नक्षलवादी नुसता हसला आणि पुटपुटला,

'ठीकच. जे काही द्यायचंय ते फाशीच्या तख्तावर द्या!' आणि सीनियरच्या इशाऱ्याबरोबर तो चालू लागला.

सीनियर जेलर ग्लाडसाहेबासाठी जरासा घुटमळला तोच ग्लाडसाहेबाने त्याला फर्मावले...

'यू गो अहेड! मी निघालोच.'

सीनियर लगेच वळला नि नक्षलवाद्याबरोबर पायऱ्या उतरू लागला. व्हरंड्याच्या पायऱ्यांशी नक्षलवादी जरासा थबकला आणि विझत चाललेल्या रातराणीचा एक दीर्घ श्वास त्याने घेतला. चारी शिपाई पुढेमागे उभे राहिले नि नाकासमोर पाहात नक्षलवादी चालू लागला. फाटकापाशी जीपमध्ये शिपाई चढले. नक्षलवाद्यानेही जीपमध्ये चढण्यासाठी पाऊल उचलले तोच उंच आवाजातली हाक त्याला ऐकू आली...

'कॉम्रेड ऽऽ कॉम्रेड ऽऽ!'

बरेच दिवस अपरिचित असलेल्या त्या सन्माननीय हाकेने नक्षलवाद्याची छाती अभिमानाने फुलून आली आणि त्याने मागे फिरून पाहिले. वर व्हरांड्यात उभे राहून हात हालवीत ग्लाडसाहेब त्याला हाक मारीत होता...

'कॉम्रेड ऽऽ कॉम्रेड ऽऽ!'

सदोदित कैदीनंबर पुकारून हिणवणाऱ्या ग्लाडसाहेबाच्या तोंडून ती हाक ऐकून नक्षलवादी समाधानाने हसला नि हात हालवून साहेबाचा निरोप घेऊ लागला. तोच डाव्या हाताने साहेबाने स्टेनगन उचलली आणि काय होतेय हे समजायच्या आतच दोन फायर केले.

कडाड काड काड काड ऽऽ

कडाड काड काड काड ऽऽ

आसमंत भेदणाऱ्या त्या आवाजाने जीन एकदम अंथरुणात उठून बसली. तिने पाहिले, तिचा बाप व्हरंड्यात उभा होता. त्याच्या हातात स्टेनगन होती आणि अपराधी मुद्रेने खाली मान घालून तो जीनला विचारत होता,

'अॅम आय रॉंग जीन ? अॅम आय रॉंग ?'

'ना पापा,' ओक्शाबोक्शी रडत जीन म्हणाली.

'ना पापा, ही वॉज रिअली ए ब्रेव्ह सोल्जर!' आणि तिने उशीत स्फुंदून स्फुंदून डोके खुपसले.

ग्लाडसाहेबाने समाधानाने मान हलवत तिच्या म्हणण्याला संमती दिली नि खाली पाहिले...बेडीच्या हाताने छाती घट्ट दाबून नक्षलवाद्याने घट्ट मूठ वळलेला हात वर केला होता. साहेबाच्या या विश्वासघाताने तो खवळून उठला होता. त्याने रक्ताग्नीने भरलेल्या जळजळीत नजरेने साहेबाकडे पाहिले...

पण ग्लाडसाहेबाच्या नजरेत करुणा होती. याचना होती आणि ग्लाडसाहेब पुनःपुन्हा ओरडत होता,

'कॉम्रेड, तुम्हारे सिनेपे गोली चलायी है मैंने, पीठपे नहीं. तुम्हारे सिनेपे गोली चलायी है मैंने, पीठपे नहीं!'

साहेबाच्या या खुलाशाने नक्षलवाद्याचे डोळे पुन्हा शांत झाले. एकवार समाधानाने हसत वळल्या मुठी सोडून त्याने साहेबाला बाय बाय केले आणि सारी शक्ती एकवटून तो ओरडला,

'थँक यू...थँक यू मिस्टर ग्लाड!'

आणि रक्ताच्या थारोळ्यात कैदीनंबर आठसोबयालीस वीरभूषण पटनाईक वीराचे मरण घेऊन निष्प्राण होऊन पडला!

जेलच्या भिंतीवर सहाचे टोल पडत होते.

'सब ठीक है! सब ठीक है!' यार्डायार्डातून रात्रपाळीचे हवालदार ओरडत होते.

आणि ग्लाडसाहेब गुडघ्यात मान खुपसून हमसून हमसून रडत होता!

सकाळ झाली.

पण आकाश निर्विकार होते, नि उजेड निस्तेज. सूर्याचा एकही किरण दिसत नव्हता. राजमहेंद्री सेंट्रल जेलच्या सुपरिंटेंडेंटचा बंगला पोलिसांनी भरला होता. पंचनामा आटोपला आणि डी. एस. पी. ने ग्लाडसाहेबाचा पट्टा, टोपी उतरवली आणि वीरभूषण पटनाईक याच्या खुनाच्या आरोपावरून साहेबाच्या हातात बेडी ठोकली; पण साहेब निर्विकार होता. त्याच्या चेहऱ्यावर तीच विरागी शांती होती, जी नक्षलवाद्याच्या होती.

डी. एस. पी. ने खूण केली आणि ग्लाडसाहेब चालू लागला.

काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाडखाड वाजू लागली. रस्ता निर्मनुष्य झाला; पण आसपासच्या झाडावरल्या पाखरांची किलबिल शांत झाली नाही. ती किलबिलत होती; 'थँक यू...थँक यू मिस्टर ग्लाड!'

साहेब मेनगेटच्या दाराशी आला नि सवयीने त्याने नजर टाकली; पण गार्डड्यूटीवरल्या शिपायांनी त्याला खडी ताजीम दिली नाही. मेनगेट उघडले नाही. क्षणभर साहेब खचला...अपमानित झाला...

तोच राजमहेंद्री सेंट्रल जेलच्या भिंतीच थोड्या वाकल्या आणि म्हणाल्या, 'थँक यू, थँक यू मिस्टर ग्लाड!'

त्या पाषाणभिंतींची मानवंदना थोडी मान लववून साहेबाने घेतली नि नाकासमोर सरळ पाहात पावले तालात फेकली आणि एक जाडाभरडा भरदार खर्ज लावला,

'हे प्रिये, तुझ्यासाठी...'

# स मा प्त

---

## नव्या बदलांचा अर्थ : पृष्ठ ८ वरून

असती. काही राज्यांत सभापतींचे मंत्री व मंत्र्यांचे सभापती झालेले आहेत; पण केंद्रात असा बदल प्रथमच होत आहे. वाटप करावयाच्या अधिकारपदांपैकी एक पद एवढ्याच दृष्टीने सभापतिपदाकडे प्रथमपासून पाहिले गेले. या पदी असलेल्या व्यक्तीला सरकारपासून आणि पक्षीय राजकारणापासून नेहमी अलिप्त ठेवण्याचा पायंडा रूढ करणे व तो कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे.

हरियानाचे मुख्य मंत्री बन्सीलाल यांना केंद्रीय मंत्रिपदाची बढती मिळाली असली तरी बहुगुणांप्रमाणेच सत्तारूढ पक्षातील एका गटाला मुख्य मंत्री म्हणून ते नकोसे झाले होते काय? झटपट कामे करून घेणारा तडफदार मंत्री अशी ख्याती बन्सीलाल यांनी मिळविली; पण त्यांचे मंत्रिमंडळही गटबाजीपासून अलिप्त नव्हते. गेल्या फेब्रुवारीमध्ये झालेल्या विधानसभेच्या तीन पोटनिवडणुकांपैकी दोन काँग्रेस हरली ती या गटबाजीमुळेच.

बन्सीलाल यांच्यावर विलक्षण गंभीर आरोप करणारे निवेदन १२० खासदार व आमदारांनी राष्ट्रपती गिरीकडे दोन वर्षांपूर्वी सादर केले होते व चौकशी कमिशन कायद्याखाली आरोपाच्या चौकशीसाठी खास कमिशन नेमण्याची मागणी केली होती. पंतप्रधानांची व केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका उपसमितीने या आरोपांची छाननी केली आणि बन्सीलाल निर्दोषी असल्याचा निष्कर्ष काढला. आरोपी व न्यायाधीश एकाच पक्षाचे तेव्हा ही निःपक्षपाती चौकशी होऊच शकत नाही अशी त्यावर जनसंघाचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी टीका केली. पंतप्रधानांचे चिरंजीव संजय गांधी यांच्या मोटारकारखान्यासाठी गुरगाव येथे स्वस्त किमतीत जागा दिली, काही नेमणुका करताना राज्य पब्लिक सर्व्हिस कमिशनला डावलले वगैरे आरोप या निवेदनात केलेले होते; पण निःपक्षपाती चौकशी न होताच हे आरोप निकालात काढण्यात आले.

हरियानाचा नवा मुख्य मंत्री निवडताना लोकशाही संकेत डावलण्यात आले. बन्सीलालच्या जागी बनारसीदास गुप्ता मुख्य मंत्री होतील हे श्रेष्ठींनी ठरवून टाकले व त्यानुसार गुप्तांचा शपथविधीही झाला. पक्षाने नेता निवडावयाचा असतो याची कोणाला आठवणही झालेली दिसली नाही, दोन दिवसांनी मग पक्षाची बैठक भरून बनारसीदास गुप्ता यांची नेतेपदी औपचारिक निवड करण्यात आली. □



# एक बेफाट जुलूस !

भारतकुमार राऊत

गच्च भरलेलं रवीन्द्र नाटयमंदिर. तिसरी बेल होते आणि डबे खुळखुळवत कार्यकर्ते आत येतात. दर दोन महिन्यांनी असली निधीची टूम असते. कधी जवानांसाठी, कधी आंधळयांसाठी, कधी दुष्काळवाल्यांसाठी तर आता पूरग्रस्तांसाठी. कुणी डब्यात पैसे टाकतं तर कुणी नाही.

इतक्यात ब्लॅकआउट, प्रचंड गोंधळ, गडबड. त्याच्यातच कुणाची तरी केविलवाणी किंकाळी. कुणाचा तरी खून झालाय. स्टेजवर उजेड पडतो. पडदा अद्याप बंदच. त्याच्या-बाहेर एक मुडदा. गुरुशर्टातला. तो उठतो.

'माझा खून झालाय. इथे–अगदी इथे. माझा खून झालाय. मला मारण्यात आलंय, मी मेलोय. आता माझा खून झालाय. आज माझा खून झालाय. काल माझा खून झाला होता. परवा, तेरवा, गेल्या आठवडयात माझा खून झाला होता. गेल्या महिन्यात, गेल्या वर्षी, रोज माझा खून होतोय. दररोज खून, दररोज मृत्यू. दररोज. उद्या माझा खून होईल. परवा, तेरवा, पुढच्या आठवडयात, पुढच्या महिन्यात, पुढच्या वर्षी-मृत्यू दररोज माझा माझा !

असं बरंच काही तो गुरुशर्टातला उभा मुडदा बोलत रहातो. वसंत आबाजी डहाळेंची एक अख्खी कविता गद्यात म्हणून टाकतो. पुन्हा पडतो. 'तो हा विठ्ठल बरवा–तो हा माधव बरवा 'चा गजर करत प्रेक्षकांमधून पात्रं येतात. ' जयराम श्रीराम 'चा गजर करत प्रेत उचलून नेतात.

तो मेलेला अजित केळकर, कुणी तरी कुजबुजतं. एव्हाना पडदा उघडलेला. त्यात एक चष्मेवाला, दुसरा गुरुशर्टवाला. वैताग-लेल्या सुरात त्याची बडबड.

'जुलूस, जुलूस, जुलूस...'

शवयात्रा, शोभायात्रा, पदयात्रा, शुभ-यात्रा, अयात्रा, कुयात्रा तऱ्हेतऱ्हेचे जुलूस यावे. यावे. मिरवणूक चालली आहे. जुलूस चालला आहे.......

> जुलूस जुलूस रोटीकपडयाचा जुलूस
> परमार्थी जुलूस, विप्लवी जुलूस,
> मिलिटरी जुलूस
> शरणागतांचा जुलूस,
> पूरग्रस्त सहाय्यक जुलूस
> शोक जुलूस, प्रतिवादी जुलूस,
> उत्सवी जुलूस
> सिनेनटांचा जुलूस.

जुलूस जुलूस जुलूस.

बहुरूपी सादर करीत आहे जुलूस.

लेखक बादल सरकार, अनुवाद अनुया पालेकर.

अनौंसमेंट चालू होतात.

मध्येमध्ये हिंदी सिनेमात असतात तसले इंटरकट्स. कधी कवायतपरेड तर कधी महारोगी–भिकारी.

'बहुरूपी 'चं अमोल पालेकरनं दिग्दर्शित केलेलं नाटक चालू असतं.

तो मघाचा. त्याचं बोलणं चालूच आहे. त्याचा मुन्ना हरवलाय. त्याच्या तो शोधात. पोलिसपासून स्फुटनिकपर्यंत सर्वत्र तपास चालू. हे सगळं एकदम तालात. सिनेमाचं फास्ट एडिटिंग असावं तशी खटाखट् वाक्यं. मुन्नाला वेगवेगळी आमिषं.

> बॅट बॉल बिस्किट चॉकलेट
> वह्या, पुस्तकं, स्कूल, कॉलेज
> पास, फेल, नोकरी, धंदा
> जमीन, जायदाद, धन, दौलत
> मोटार, गाडी, सोनं-चांदी
> सुख, शांती, धर्म, मोक्ष
> बायको, पोरं, नातवंडं, पतवंडं

पण मुन्नाचा पत्ता नाही. त्याला शोधणाऱ्याचा शोध चालूच. जगाचं रहाटगाडगंही चालूच. रेशनच्या तांदुळात वाढपासून निक्सनचा टेप द्यायला नकारपर्यंतच्या शेकडो अंगाभवती घोंघावणाऱ्या बातम्या.

अनेक अडचणींतूनही प्रत्येकजण आपला मार्ग काढतोय. ट्रेनची प्रचंड गर्दी, बसचे क्यू. त्यातूनच मागून संदेश.

'हमे भविष्य में और भी दुर्दिन का सामना करने के लिये प्रस्तुत रहना है।'

मुन्नाचा शोध चालूच. शोध घेणाऱ्या पात्राचं नाव हेमचंद्र अधिकारी. मुन्ना मेलाय की हरवलाय ? तो मुडदा कुणाचा ? कोण मेलंय ? खून कुणाचा झालाय ?

खाकी कपडे घातलेला सरकारी पोलिस-अधिकारी प्रत्येक वेळी आपल्या ड्रेसाला आणि पगाराला जागून सांगतोय कुणाचाही खून झालेला नाही. जुलूस चालू ठेवा !

त्या मघाच्या मुडद्याचा पुन्हा प्रवेश. जुलूस, जुलूस राजपथावर जुलूस. जनपथावर जुलूस फक्त जुलूस. रोजरोज राजपथावर, जनपथावर मिरवणुकीखाली भरडला जातोय. मरतोय. रक्त, खत होतेय. जुलूस जुलूस.

हाच तो हरवलेला मुन्ना. त्या जुलुसातच त्याचा खून झालाय. तो मेलाय; पण जुलूस चालू आहे. रथोत्सव होतायत. मुहरम होतायत. ख्रिसमस कॅरल आळवलं जातेय.

जनता गुरुदेवांना शरण जातेय. स्टेज-वरची पात्रं भराभर उतरून प्रेक्षकांमध्ये बसलेल्या गुरुदेवाला डोक्यावर उचलून स्टेजवर नेतात. गुरुदेवाचं भंकस प्रवचन. त्याला ' होय महाराजाचा ' कोरस. गुरुदेव बोलतात, ' सतत ध्यानी राहू द्या की आपल्या देशाची एक प्रदीर्घ आणि प्राचीन परंपरा आहे. नका विसरू स्वाधीनता संग्रामातल्या त्या अगणित हुतात्म्यांना ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले...लक्षात ठेवा भारत-वर्ष हे एक महान गणतंत्र आहे. भारताच्या घटनेमधील मूलभूत तत्त्व कधीच विसरू नका! '

जिवाला कंटाळलेले लोक सुद्धा मन लावून जगतच आहेत. पुन्हा बादल सरकार साम्य-वादाचा एक प्रचंड सिद्धांत मांडतो. सृष्टीच्या आरंभी सर्व मनुष्य समान होते; परंतु ते असभ्य होते. दिवसभर काम करूनही ते पोटभर मिळवू शकत नव्हते. त्यामुळे ते सर्व एकसारखे होते. त्यानंतर मनुष्य शिकला-सभ्य झाला. यातून असमानता निर्माण झाली. जगात काही प्रभू आहेत काही दास आहेत. जगात संपत्ती वाढते आहे. ही संपत्ती सर्व माणसांना समान व सुंदर जीवन जगण्या-साठी पुरेशी नक्कीच आहे; परंतु असं झालं

तर जगात प्रभू रहाणार नाही. सभ्यताच नष्ट होईल.

'सभ्यतेचा सर्वांत मोठा शत्रू कोण?' सारा समाज बिनधास्त उत्तर देतो 'साम्यवाद!'

आता नाटक डोक्यात जायला लागतं. इतर नाटकांपेक्षा वेगळं, चाकोरीतून बाहेर पडलेलं पण तरीही त्या चाकोरीशी नातं सांगणारं हे नाटक. स्टेजवरची तेराचौदा पात्रं सतत नजर खिळवून ठेवून हे डोस पाजत रहातात.

'तुम्ही पशू नाही. माणसं आहात. माणसं म्हणून जगा!' हा गुरुदेवांचा मंत्र. तो आचरणात आणण्याचा जनता बराच प्रयत्न करते. जेव्हा हे अशक्य होतं तेव्हा गुरुदेवांना पुन्हा शरण. 'दारू.' सर्व दुःखहारिणी तिचा उपयोग. सर्व दुःख गायब.

मुन्नाला शोधणारा म्हातारा सुद्धा प्यायलाय. 'दारू, स्वतःला विसरून जाण्याचा रामबाण उपाय! विसरून जा. हरवून जा. फक्त हरवून जा! शोधणं गेलं मसणात. मुन्ना तर कधीचा हरवलाय. बाजारात, जत्रेत, गर्दीत, मिरवणुकीत शोधता शोधता आज म्हातारा झालाय. तरीही शोधणं चालूच आहे. त्याला अंत नाही.'

आता तो उत्तर दिशेच्या शोधात. पण होकायंत्र नाही. सूर्य मावळलेला. हजारो चांदण्यांत ध्रुव ओळखू येत नाही. तो सूर्याची वाट पहातो. इतक्यात स्टेजवर ब्लॅकआउट.

शू! दिवा लावू नका! नीट बघून चला!

पण तो कुठल्या बाजूला गेलाय?

आज बच्चमजीची खैर नाही!

हां रेडी ...... वगैरे वगैरे.

इतक्यात पुन्हा कर्कश किंकाळी. खून! त्या सरकारी पोलिसअधिकाऱ्याचा टॉंच! 'काहीही खून झालेला नाही. सर्व जण घरी जा! स्टेजवर पुन्हा उजेड. तो मघाचाच मुडदा. मुन्नाचा. पुन्हा प्रेतयात्रा. मघासारखीच. जगाचं रहाटगाडगं चालूच आहे. मुन्ना मेलाच. कुणालाही त्याची फिकीर नाही. रेल्वेप्लॅटफॉर्मवरची गर्दी कायम आहे. जुलूस चालूच आहे.

'जय भारत देश हमारा, यह भारत देश है हमारा! मुन्ना ओरडत धावतो. बंद करा! ही सगळी बंडलबाजी आहे. आपल्याला फसवायचा प्रयत्न आहे. माझा—खून झालाय. रोज माझा खून होतोय; रोज होत राहील, हेच केवळ सत्य आहे. रात्रीच्या अंधारात, दिवसभराच्या धकाधकीत. रोज तुम्ही लोक ही गोष्ट दडवायचा प्रयत्न करता पण तसं होणार नाही! मी अजिबात होऊ देणार नाही!

सरकारी माणूस त्याचं तोंड दाबतो.

नाटक जिवाशी जवळीक साधून जातं. हे नाटक मला माझंच वाटायला लागतं. ते माझं आहे, त्याचं आहे, सगळ्यांचं आहे.

गुरुदेवाची बकवास सगळेजण मन लावून निमूटपणे भक्तिभावानं ऐकतायत, जुलूस चालूच आहे. तो वृद्ध मुन्नाला शोधतोच आहे. तो जुलुसांना कंटाळलाय. तो स्वतः सुद्धा हरवलाय. घरचा रस्ता शोधतोय. तो वाट दाखवणारा जुलूस कुठे आहे? प्रत्येक जुन्या जुलुसाला कंटाळून तो नव्या जुलुसाकडे आशेनंच पहातोय.

जनतेचं अमुकतमुक झिंदाबाद चालूच. मुन्ना सणकतो. उसळतो. पेटतो.

'हे सगळे फक्त मरणाचे जुलूस. फक्त—मरणाचे...आपण सगळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बसून जुलूस पहाताहात. जुलूस नाही खून पहाताहात. खून करत आहात. हो, तुम्ही खुनी आहात, मी खुनी आहे, आपण सगळे खुनी आहोत.

पुन्हा त्याच्या मुसक्या बांधल्या जातात. पुढे फाशी. मुन्ना पुन्हा उठतो.

'तुम्ही खुनी आहात.' आता गिलेटिन-चॉपवर मरण. पुन्हा तो सर्वांना खुनी ठरवतो. आणि गॅसचेंबरमध्ये मरतो. पुन्हा बोंबलतो आणि मशिनगनपुढे पडतो.

स्टेजवर मुन्ना पडलेला. तो वृद्ध त्याला उठवतो. 'माझा खून झालाय!'

'वेडा, तुझा खून झाला नाही, तू हरवलायस! हरवलं तर शोधता येतं, शोधलं तर मिळवता येतं! मेलं तर काय शोधता येत? मिळवता येतं?

पुन्हा एक प्रचंड तत्त्वज्ञान.

मुन्ना आणि तो वृद्ध हातात हात घालून एकेक पाऊल टाकत रस्ता शोधतात; आनंदतात.

'माझं नाव मुन्ना होतं.'

'माझं नाव मुन्ना आहे.'

तोच पुन्हा जुलूस. पण तो वृद्ध म्हणतो, 'हा खरा जुलूस. तो घराची वाट दाखवील. खऱ्या खऱ्या घराची वाट. हा माणसांचा जुलूस.'

'घनश्याम सुंदरा' भूपाळी म्हणत जुलूस-स्टेजवरून प्रेक्षकांच्यात येतो. थिएटरबाहेर जातो.

गेली अनेक वर्षं हे नाटक आम्ही रात्रंदिवस भोगतोय. तेच नाटक आज थिएटरमध्ये जगलो. बादल सरकार ग्रेट आहे. अमोल पालेकर ग्रेट आहे. बहुरूपीचे कलाकार ग्रेट आहे. जुलूस ग्रेट आहे. बेफाट आहे. तुफान आहे.

□




## महापूर : पृष्ठ ६ वरून

इतर सर्व पात्रे बोलत असताना अतिशय कमी हालचाल करणारा, जबरदस्त मुद्राभिनयावर सर्व पेलून नेणारा चार्लटन हेस्टन स्टाइलचा अभिनय कॉन्ट्रास्ट म्हणून योजला असता तर हे पात्र उठून दिसले असते व हा डॉक्टर नायकास फँटसीमध्ये जाण्यास भाग पाडत आहे हे उघड झाले असते. प्रॉडक्शन म्हणून हे नाटक सुबक वाटले; पण ग्रँड वाटले नाही. याचा काय गुणदोष दिग्दर्शकावर पडत असेल तो मोहन गोखल्यांना घेणे भाग आहे. नट म्हणून सतत लक्षात राहील ते पात्र गोविंदचे ऊर्फ मोहन गोखले यांचे. उत्कृष्ट अभिनयाचा तो एक नमुनाच होता. एक गोष्ट खटकली. अनेक वेळा घशाच्या शिरा ताणणे, डोळे मिचकावणे, ओठ खेचणे, हात गुडघ्यामध्ये घेणे अशा किती तरी मॅनरिझम्स गुरु डॉ. जब्बार पटेल यांच्या सहीसही मोहन गोखल्यांमध्ये उतरल्या आहेत. थिएटर अॅकॅडमीसारख्या संस्थेत जिथे विचारपूर्वक अभिनय होतो तेथे एवढासा दोष काढून टाकता येणार नाही ? सुलभा ऊर्फ मंजिरी परांजपे यांनी गोविंदला छान साथ दिली. बाकीच्यांचा अभिनयही छान होता. प्रकाशयोजना सतीश आळेकर व ध्वनियोजना नंदू पोळ यांची होती. त्याबाबत वर उल्लेख येऊन गेलेला आहेच. नेपथ्य माधुरी पुरंदरे यांचे होते. अंग मोडून काम करणारी स्त्री नेपथ्यासारख्या भागात काम करते हेच मराठी नाटकात मला मुळात कौतुकास्पद वाटते. चाळीतील खोली त्यांनी वास्तव उभी केली होती.

'महापूर' या नाटकामध्ये मनोविकार व विकृत मनोव्यापार यांचे आकर्षक प्रतिबिंब आढळले. त्याला सामाजिक पार्श्वभूमी आहे. उपहास व विनोदाची झालर आहे. केस हिस्टरीची पातळी सोडून हे नाटक वरच्या पातळीवर गेले व मनोविकारशास्त्रातील शास्त्रज्ञ सोडून इतर किती तरी क्षेत्रांतली माझी असोसिएशन्स जागृत झाली. त्यामुळे हे नाटक मला कलात्मक पातळीवरचे वाटले. इतरही क्षेत्रांतील हजारो प्रेक्षक या नाटकाला येतील, त्यांची हजारो असोसिएशन्स जागृत होतील तर हे नाटक सर्वांनाच कलात्मक वाटले असा अर्थ घेण्यास हरकत नाही. ☐

# साप्ताहिक भविष्य

### कृष्ण माईणकर

### १३।१२।७५ ते १९।१२।७५

### भारताच्या राजकीय क्षितिजावर नव्या पर्वाची चाहूल

ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून मी माणूसमधून आजपर्यंत जे जे अंदाज वर्तवले ते ते खरे ठरले आहेत याचा वाचकांना प्रत्यय आला आहेच. कॉंग्रेसपक्षातील माझा अंदाज प्रसिद्ध होऊन एक-दोन दिवस होतात न होतात तोच बहुगुणांचा राजीनामा अनपेक्षित वृत्तपत्रांतून झळकला, हे वाचकांनी वाचलेच आहे. या आठवड्यात भारताच्या मकरराशीला रवी हा राजकीय धर्माचा ग्रह प्रतिकूल होत आहे आणि मंगळाबरोबर त्याचा प्रतियोगही आहे. त्यामुळे भारताच्या उत्तर–पूर्व सीमेवर कटकटी निर्माण होण्याची शक्यता असून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना संरक्षणखात्यावर जास्त लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. अर्थात या बाबतीतही त्यांच्या डावपेचांची झलक देशाला व जगाला दिसून येईलच. अंतर्गत कारभारात काही नवे खळबळजनक निर्णय घ्यावे लागतील. महाराष्ट्रात विशेष काही तरी घडू शकेल. शासन व सत्तारूढ पक्ष यांत जर दुरावा वा मतभेद निर्माण झाले तर आश्चर्य वाटू नये. मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांची लोकप्रियता अधिक वाढेल.

---

### मेष : उपासनेची गरज

या आठवड्याच्या दोन दिवसांनंतर मंगळ चौथा होणार असून तो शनीच्या साह्याला येणार आहे. शनि-मंगळाची ही स्थिती फारशी वाईट नसली तरी फार अनुकूल आहे असे मात्र नाही. प्रामुख्याने सुखस्थान दोन पापग्रहांनी दूषित होत आहे. म्हणून या वेळी तुमच्या कुलदेवतेची व दत्तगुरूची उपासना करण्याची फार गरज आहे. कारण डोके सतत नको त्या त्रासाने व नको त्या विचाराने गरगरत राहणार आहे. या वेळी नोकरीत वरिष्ठांचे बोलणे एवढे मनाला लावून घेऊ नका. मात्र आपले काम काळजीपूर्वक करा. स्थावराच्या व घराच्या अडचणी तडजोडीने मिटवणे फायद्याचे ठरेल. बेकारांना काम मिळेल; पण फार दगदग करावी लागेल. सोमवार व गुरुवार महत्त्वाची घटना घडेल. महिलांचे मानसिक स्वास्थ्य थोडेफार बिघडणार आहे. स्थावराचे काम होईल. विद्यार्थ्यांच्या हितसंबंधात काही चांगले घडेल.

### वृषभ : अडचणीचे धुके निवळेल

कौटुंबिक त्रासातून तुम्ही या आठवड्यात मुक्त होणार आहात हे लिहायला मला आनंद वाटतो. कारण मंगळ दुसरा होता तो तिसरा होत आहे. तुमच्या उद्योगातील रेंगाळलेल्या योजना आता कार्यान्वित होऊ शकतील. काही तरी नवे व आकर्षक घडेल असा हा आठवडा आहे. नोकरीच्या बाबतीत कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. नव्या क्षेत्रात तुमचा जम बसेल. आर्थिक परिस्थितीचा ताण कमी होऊन मदत व सहकार्य मिळू शकेल. व्यापार व उद्योगात फायदा मिळून चार पैसे मनासारखे हाती येतील. केतूमुळे तब्येतीला थोडेफार जपणे आवश्यक आहे; पण खर्चापुरता पैसा निश्चितपणे मिळेल. रविवार ते बुधवार नव्या योजनेसाठी मदत मिळण्याची शक्यता आहे. अपेक्षित व्यक्ती भेटेल. बेकारांना स्वतंत्र उद्योग मिळेल. महिलांना नोकरी व उद्योग मिळू शकेल. प्रयत्नाला यश येईल. विद्यार्थ्यांना काही कर्तृत्व दाखवता येईल. जबाबदारी स्वीकारावी.

### मिथुन : पैसा जपून वापरा

मंगळाने तुमची रास आता सोडली आहे व तो शनीबरोबर हातमिळवणी करणार आहे. अजून तुमची साडेसाती संपलेली नाही याचे भान विसरू देऊ नका. या आठवड्यात विशेष काळजी खर्चाच्या बाबतीत घ्या. हाती आलेला पैसा उधळून टाकू नका. कारण अनपेक्षित अशा खर्चाचे एखादे नवे प्रकरण उद्भवण्याची शक्यता आहे. सरकारी वा खाजगी नोकरीत ज्यांच्याकडे प्रत्यक्ष पैशांचा

व्यवहार आहे त्यांनी संशय निर्माण होण्यासारखे व्यवहार करू नयेत. एरवी नोकरीत हा आठवडा तसा प्रतिकूल नाही. शंकाकुशंका मनात आणण्याचे कारण नाही. वरिष्ठांकडून तशी तुम्हाला सहानुभूती मिळेल. नव्या नोकरदारांनी स्वतःचे गुण दाखवल्यास त्यांना स्कोप आहे. शनिवार, सोमवार व मंगळवार नवा उद्योग वा इतर कार्याला अनुकूल आहेत. महिलांनी नोकरीचा प्रयत्न करावा. त्यांना कायम अशी नोकरी मिळेल. कुटुंबात मात्र काही अडचणी संभवतात. विद्यार्थ्यांनी राजकारणापासून दूर राहावे.

**कर्क** : यशाची पर्वणी

राशीत असलेल्या शनीबरोबर आता मंगळ आला आहे. बाराव्या मंगळाची त्रासदायक कारकीर्द संपून आता सहकार्याची नवी नाविन्याची कारकीर्द सुरू झाली आहे. आता तुम्ही जे काय कराल ते यशाची शिखरे गाठणारे आहे. प्रामुख्याने स्वतंत्र उद्योगात किंवा व्यापारात ज्यांना काही करून दाखवायचे आहे त्यांनी या वेळी प्रयत्न करावा. नोकरीत आता त्रास संपला आहे. तुमच्या गुणांचे चीज व्हावे असे नवे क्षेत्र तुम्हाला मिळणार आहे. साहित्य, वाङमय, कला यात लक्ष घाला. सेवानिवृत्तीच्या कडेला आलेल्या लोकांना मुदतवाढ मिळेल. बेकारांना आता निराश होण्याचे कारण नाही. शनिवार, रविवार व गुरुवार चर्चा, विचारविनिमय, वाटाघाटी करा. महिलांच्या गुणांना नवे क्षेत्र उपलब्ध होईल. वाङमयात भाग घ्यावा. विद्यार्थ्यांच्या आशाआकांक्षा पुऱ्या होण्याची चिन्हे दिसतील.

**सिंह** : अडचणीतून मार्ग

बाराव्या शनीच्या जोडीला आता बारावा मंगळ आला आहे. हे दोन्ही ग्रह तुम्हाला लगेच काही त्रास देतील असे नव्हे. रवि हा तुमचा राशिस्वामी आहे व तो तुमच्यावर खूष आहे. त्यामुळे विरोधकांचे मनसुबे व कारवाया तो हाणून पाडील यात शंका नको. याचा अर्थ तुम्ही बेसावध मात्र राहू नये हे ध्यानी घ्यावे. राजकारणात या वेळी तुमचे विरोधक जोर करणार आहेत. त्यामुळे काही वेळा माघार घ्यावी लागेल; पण ते तुमच्या हिताचे ठरेल. नोकरीत स्थलांतर व स्थित्यंतर असे काही तरी घडू शकेल. पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करा. तुम्हाला क्वचित नको तो मोह होईल. तो मात्र टाळा. रविवार व गुरुवार अपेक्षित व्यक्ती भेटतील. महिलांनी सार्वजनिक कार्यात मोठेपणाच्या नादी लागू नये. नोकरीत पुढे पाऊल पडेल. विद्यार्थ्यांनी उपासना करावी. स्मरणशक्ती तीव्र होईल.

**कन्या** : पैशाचे यश

तुम्हाला अकरावा शनि होता त्याच्या जोडीला आता अकरावा मंगळ आला आहे. हा मंगळ तुमची खर्चाची गरज भागवील. काही अनपेक्षित असे लाभ तुमच्या पदरात पडतील. या वेळी तुम्ही लॉटरीसारख्या साधनाचा मुद्दाम उपयोग करा. पूर्वजन्माच्या ग्रहानुसार जमून जाईल श्रीमंत होण्याचे स्वप्न ! नोकरीच्या दृष्टीने वाईट काहीच नाही. कामात ताण पडला तरी तुमची प्रतिष्ठा वाढेल. काही चांगले शुभकारक असे घडू लागेल. प्रवासाचे बेत अचानक जमून येतील. लेखन, वाङमय यात वेळ घालवू शकाल. प्रगतीच्या आड येणारे अडथळे दूर होतील. बेकारांच्या बाबतीत महत्त्वपूर्ण असे काही तरी घडेल. रविवार ते शुक्रवार अनपेक्षित अर्थप्राप्ती. महिलावर्गाला शारीरिक त्रास कमी होईल. कामाचा ताण संपेल. विद्यार्थी या वेळी बौद्धिक क्षेत्रात चमकेल.

**तूळ** : नोकरीत बढती

हा आठवडा फार छान आहे. अनेक दिवसांच्या उराशी बाळगलेल्या आशाआकांक्षा पुऱ्या होऊ लागतील. ज्यासाठी खूप परिश्रम केले ते फळ या वेळी पदरात पडेल. नोकरीच्या क्षेत्रात या वेळी बऱ्याच महत्त्वाच्या घटना घडतील. अचानक तुम्हाला बढती मिळून जाईल. नवे कार्यक्षेत्र लाभेल. गुणांचे चीज व्हावे असे ते असेल आर्थिक बाजू तर भक्कम होईल. जुने येणे वसूल होईल. आश्वासने कृतीत उतरत येतील. बेकारांना आता खितपत पडावे लागणार नाही. कृषि, खते, प्लॅस्टिक, लोखंड, महसूल, बांधकाम या खात्यांशी संबंधित अशा ठिकाणी नोकरी व स्वतंत्र उद्योग मिळू शकेल. चालू नोकरीत बदलीचे प्रयत्न अवश्य करावेत. राजकारणात तुमचे नाव गाजेल. सोमवार ते गुरुवार परदेशप्रयाणासाठी पत्रव्यवहार करा. यश येईल. ही संधी तुम्हाला मिळणार आहे. महिलांना गायनाच्या वा नोकरीच्या क्षेत्रात मोठे यश मिळणार आहे. प्रतिष्ठा, कीर्ति मिळेल. विद्यार्थ्यांना पैशाची मदत मिळेल.

**वृश्चिक** : आर्थिक उलाढाल

राहूने बाराव्या स्थानी पदार्पण केल्यापासून तुमच्या व्यवहारात चढउतार होत आहेत हे खरे. अनपेक्षित खर्च वाढले आहेत. कधी दवाखाना तर कधी नातेवाइकांना मदत; पण या आठवड्यात राशिस्वामी मंगळ नववा झाला आहे व तो तुमचे आर्थिक भाग्य फुलवणार आहे. जमिनीची खरेदीविक्री, शेतीचा माल, औषधे, कागद, स्टेशनरी इत्यादी व्यापारात भरपूर लाभ होणार आहे. चार पैसे परत मिळवू शकाल. स्थाव-



राचे काम आता रेंगाळणार नाही. नोकरीत बस्तान व्यवस्थित बसेल. विस्कटलेली घडी नीट बसेल. नोकरीतील धाकधूक व्यर्थ ठरेल. बेकारांनी स्वतंत्र उद्योगाकडेच प्रयत्न करावेत. मंगळवार ते गुरुवार अनपेक्षित घटना. महिलांना नोकरीचे आकर्षण तर वाटेलच; पण त्यांना सहानुभूतीही मिळेल. विद्यार्थ्यांनी लहानसा धंदा करावा.

**धनू : नोकरीत कामाचा ताण**

हा आठवडा तुम्हाला मुळीच प्रतिकूल नाही. काही महत्त्वाचे बदल घडू शकतील. तुम्ही जर योजना मांडल्या तर त्या मान्य होऊ शकतील. मात्र तुमच्यावर जबाबदारी पडणार असून तुमचा कामाचा ताण फार वाढणार आहे. उसंत अशी मिळणार नाही. एक काम संपले की दुसरे असे काही तरी घडू शकेल. बेकारांना आत्मविश्वासाने स्वतंत्र उद्योग करता येईल. भांडवल अगर तात्त्विक अडचणी निर्माण होणार नाहीत. प्रकाशनाचा व्यवसाय उत्तम अंग धरील. सोमवार, मंगळवार व शुक्रवार महत्त्वाच्या वाटाघाटी बोलणी व चर्चा करता येईल. तब्येत एकंदरीत चांगली साथ देईल. नव्या योजनांबद्दल पत्रव्यवहार करता येईल. महिलांना हा आठवडा अनुकूल अनुभव देईल. जुन्या मैत्रिणींकडून पाहुणचार मिळेल. नोकरीत शुभकारक घटना. विद्यार्थ्यांच्या प्रवासाला तर अनुकूल संधी मिळणार आहे.


बॉम्बे डाईंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड. पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये


**मकर : हट्टी स्वभाव आवरा**

शनी-मंगळाचे तेज व सामर्थ्य तुमच्यामागे खडे आहे ही फारच भाग्याची गोष्ट आहे; पण त्याचबरोबर हेच ग्रह स्वभावात उग्रता व हट्टीपणा आणतात. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः ज्यांच्या हातात फार मोठे अधिकार आहेत त्यांनी याबाबतीत जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. नाही तर त्यांच्या हातून भले होण्याऐवजी नको ते घडू शकेल. या वेळी नोकरांबरोबर किंवा हाताखालच्या व्यक्तिबरोबर संयमाने वागणे श्रेयस्कर आहे. एरवी आठवडा छान आहे. राजकारणात तुमचे व्यक्तिमत्त्व तेजळून उठेल. छाप पडेल. विरोधकदेखील हात पुढे करतील. नोकरीत बढती, प्रमोशन अधिकोन्नती असे काही तरी घडेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. लॉटरी-रेसमध्ये बक्षीस मिळू शकेल. रविवार, गुरुवार नव्या कामाची सुरुवात करा. महिलांना स्वतःचे घर राहण्यासाठी मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत अनुकूलता. विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षा सफल होतील.

**कुंभ : स्थानांतर व स्थित्यंतर**

दुष्टग्रह माणसाला फार त्रास देतात हे खरे; पण तेच ग्रह शत्रुस्थानी असले तर ते शत्रूला धडा शिकवतात व स्वतःची उन्नती घडवून आणतात. शनि-मंगळ शत्रुस्थानी आहेत ही तुमच्या दृष्टीने एक अपूर्व अशीच गोष्ट आहे. तुम्ही राजकारणी असाल तर तुमचे विरोधक या वेळी तुमच्यासमोर नांगी टाकतील. अपराधाची कबुली देतील. तुम्हाला मदत करतील. हा आठवडा तुमचे स्थलांतर व स्थित्यंतर घडवून आणणार आहे. प्रमोशनवर व मोठ्या अधिकाराच्या जबाबदारीवर तुमची बदली होईल. पूर्वी प्रयत्न यशस्वी झाले नाहीत; पण आता होतील. नातेवाइकांचे व मित्रांचे सहकार्य मिळेल. स्थावराच्या व्यवहारांत फायदा होईल. सोमवार व शुक्रवार मोठ्या व्यक्तीचा परिचय होईल. पैसे मिळतील. महिलांना सार्वजनिक सन्मानाचा योग नोकरीत कायमपणा येईल. विद्यार्थ्यांनी नवे काहीतरी शिकावे. प्रवासाचा योग येणार आहे.

**मीन : प्रगतिकारक पर्व**

शनिबरोबर मंगळहि आता पाचवा होत आहे. ही घटना मीनराशीच्या व्यक्तींना एक पर्वणी आहे यांत शंका नको. फार दिवसाची उराशी बाळगलेली स्वप्ने पुरी होण्याचा हा समय आहे. या वेळी तुम्ही उत्साहाने नवे पाऊल उचला व कामाला लागा. यश हाती येईल. लेखकांना एखादे सरकारी बक्षीस व पुरस्कार मिळण्याची शक्यता आहे. पत्रकारांना त्यांच्या अंगच्या गुणावर मोठा वाव मिळणार आहे. प्रकाशकांना श्रेय व दर्जा प्राप्त होईल. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा फार महत्त्वाचा आहे. अचानक बढती प्रमोशनचे योग येतील. ज्यांच्या नोकऱ्या अस्थिर व अनिश्चित असतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. याच वेळी तुमच्यापैकी विवाहेच्छु मंडळीची लग्ने जमतील व पार पडतील. नवे संसार सुरू होतील. संसारात प्रसन्न वातावरण राहील. मंगळवार ते गुरुवार महत्त्वाची बोलणी व कामे करा. महिलांना हा आठवडा काही तरी नवे देणार आहे. मन आनंदी व प्रसन्न राहील असे काही तरी घडेल. विद्यार्थ्यांना परीक्षेचा निकाल मोठी प्रतिष्ठा मिळवून देईल. □ □

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे उद्घाटनाचे भाषण : पृष्ठ ४ वरून

त्यांनी अलीकडे तसाच दाबून न धरता अत्यंत विनयपूर्ण भाषेत व्यक्त करून राष्ट्रपतींकडे पाठविला आहे. त्यावर ज्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्यांची मोठी मालिका मी येथे वाचून दाखवीत नाही; परंतु एवढे मात्र सांगितले पाहिजे की, मराठी साहित्यमहामंडळाचे सर्वश्री माजी अध्यक्ष द. वा. पोतदार, विद्यमान अध्यक्ष आ. रा. देशपांडे ऊर्फ कवी अनिल, लक्ष पारितोषिकाने अखिल भारताचे लक्ष वेधून घेणारे वि. स. खांडेकर, ना. सि. फडके, अनंत काणेकर, ग. दि. माडगूळकर, वामनराव चोरघडे, नरहर कुरुंदकर, वि. भि. कोलते, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, वि. द. घाटे, दादा धर्माधिकारी वगैरे मोठमोठे साहित्यिक, शिवाय प्रकाशक, संपादक, कलावंत यांच्या स्वाक्षऱ्या त्याच्यावर आहेत, माझीही स्वाक्षरी त्यावर आहे. साहित्य-निर्मितीला अत्यावश्यक असलेल्या मोकळ्या वातावरणाला सध्याच्या संशयास्पद परिस्थितीत धोका निर्माण झाला आहे व तो म्हणजे लेखनस्वातंत्र्यावरील निर्बंध होय. हा निर्बंध आपद्धर्म म्हणून आला आहे. सर्वसामान्य परिस्थिती उत्पन्न झाली, अडचणी कमी झाल्या, वातावरण निवळले म्हणजे लेखनस्वातंत्र्य पूर्ववत राहील, अशी आशा पोटाशी बाळगूनच राष्ट्रपतींना हे नम्र निवेदन दिले आहे.* कित्येक वेळा उपायच दुरुपाय ठरतात, आपत्काल तात्कालिक न ठरता कायमचा मुळे रोवून बसतो. लोकशाहीचा धोका दूर करण्याकरता जे उपाय योजले जातात, तेच उपाय कित्येकदा लोकशाहीलाच दूर ठेवू शकतात, हे काही लोकशाही ध्येयाची निष्ठा असलेल्या सत्ता-धाऱ्यांना सांगावयास नको. कारण त्यांना ते स्पष्टच दिसत असते. आपले सध्याचे सत्ताधारी लोकशाहीचे अनन्य भक्त आहेत, अशी श्रद्धा आपण बाळगूनच, हे मन उदास करणारे गढूळ हवामान बाजूला जाईल व लेखनस्वातंत्र्याच्या निर्मळ आकाशाच्या वातावरणात आपण पुन्हा सारस्वत संसाराचा व्यवहार चालवू शकू, अशी आशा बाळगतो आणि या संमेलनाचे उद्घाटन झाले असे मी जाहीर करतो. मला हा मान दिल्याबद्दल स्वागतमंडळाचे व स्वागताध्यक्षांचे अंतःकरण-पूर्वक आभार मानतो. ☐

[ * निवेदन संमेलनापूर्वीच मराठीतील बहुतेक प्रमुख वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले होते. संदर्भासाठी ते खाली पुन्हा उद्धृत केलेले आहे. ]

---

दि. १४ नोव्हेंबर १९७५

माननीय राष्ट्रपती
राष्ट्रपतीभवन
नवी दिल्ली

द्वारा / माननीय मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सादर नमस्कार

आम्ही महाराष्ट्रातील लेखक, कवी, पत्रकार, प्रकाशक आणि कलाकार आपल्याला मनःपूर्वक पुढील विनंती करीत आहोत.

लोकशाहीतील जबाबदार नागरिक म्हणून आमची राजकीय मते अनेकविध आहेत आणि तरीही शांततामय सामाजिक परिवर्तनावर, न्यायावर, समतेवर आणि आपल्या राष्ट्राच्या लोकशाही समाजवादी शिस्तबद्ध उभारणीवर आम्हा सर्वांची दृढ निष्ठा आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासनाने प्रवर्तित केलेला वीस कलमी कार्यक्रम आम्हाला स्वागतार्ह वाटतो. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती शासनाने आणि आमच्या महाराष्ट्र राज्यशासनाने रोजगारहमी, कर्जनिवारण, देवदासी-प्रथा-निर्मूलन यासारखे जे नवे उपक्रम सुरू केले आहेत तेही आम्हाला इष्ट वाटतात. परंपरागत दृष्टिकोनावर अडलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या रथाला गती देणे हे आणिबाणीचे उद्दिष्ट आम्हाला मान्य आहे. हे उद्दिष्ट लवकर आणि प्रभावीपणाने साध्य करण्यासाठी यापुढे देशात निःशंकपणाचे, विश्वासाचे आणि परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. विशेषतः साहित्याचा आणि कलांचा निकोप विकास अशा मुक्त वातावरणातच शक्य असतो. तेव्हा आता आणिबाणीचे निर्बन्ध त्वरित उठवून असे वातावरण निर्माण करण्यास शासनाने साहाय्यक व्हावे अशी आमची विनंती आहे. ☐

# दिघे समितीचा अहवाल आणि श्री. जवाहरलाल दर्डा

**नागपूर, दिनांक ३० नोव्हेंबर ( भारती )**
महाराष्ट्र हाउसिंग फायनान्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या व्यवहारात गैरप्रकार असल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यानुसार आढळून आले असल्याने सरकारने योग्य ती कारवाई करावी असे चौकशीसमितीने आपल्या अहवालात म्हटले आहे.

श्री. जवाहरलाल दर्डा सोसायटीचे अध्यक्ष असताना सोसायटीच्या व्यवहारांची चौकशी करण्यासाठी आमदार शरद दिघे यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने चौकशीसमिती नेमली होती. समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला असून सरकार त्याची छाननी करत आहे.

चौकशीच्या वेळी काही जणांनी ॲफिडेविट करून 'हाउसिंग फायनान्स सोसायटीत पैसे घेऊन कामे केली जातात' असे सांगितले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी पुराव्यानुसार सोसायटीत गैरव्यवहार झाले असल्याच्या निष्कर्षावर समिती आली आहे. या प्रकरणी सरकारने योग्य ती कारवाई करावी असे अहवालात म्हटले आहे.

यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या गृहनिर्माणसंस्थेचे केवळ पायाचे काम झाले असताना त्या संस्थेला पाच लाख रुपयांचे वर कर्ज दिले आहे. समितीने या संस्थेच्या घरबांधणी कामाची प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा प्राध्यापकांच्या संस्थेचे फक्त ६५ हजार रुपयांचे काम झालेले आहे असे आढळून आले आणि आर्किटेक्टने संस्थेच्या तीन मजली इमारतीचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल दिला होता. हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या अध्यक्षासमवेत समितीने यवतमाळला भेट देईपर्यंत फायनान्स सोसायटीच्या अध्यक्षांनीसुद्धा प्राध्यापकांच्या संस्थेचे काम पूर्ण झाले आहे, असेच समितीला सांगितले होते.

मुंबईच्या गृहनिर्माण संस्थांनी नागपूरच्या एका विशिष्ट दैनिकासच जाहिराती दिल्याचे दिसून आल्याने समितीला हा व्यवहारही संशयास्पद वाटतो.

—लोकसत्ता, दिनांक १ डिसेंबर १९७५
अंकात प्रसिद्ध झालेली वार्ता.

[ श्री. जवाहरलाल दर्डा यांच्या एकूण व्यवहारासंबंधी 'माणूस' मधून प्रसिद्ध झालेले लेख बेजबाबदारपणे लिहिले गेलेले नव्हते, पुरेशी प्राथमिक चौकशी करून व सार्वजनिक हित डोळ्यांसमोर ठेवूनच हे लेख प्रसिद्ध करण्याचा निर्णय 'माणूस' ने घेतला, या वस्तुस्थितीला वळकटी आणणारा हा म. शासनानेच नेमलेल्या दिघे समितीचा अहवाल आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने यावर तूर्त अधिक भाष्य होऊ शकत नाही; पण दर्डांची सद्दी संपली हे उघड दिसत आहे. आता तरी त्यांनी 'माणूस' ला छळण्याचा नाद सोडून द्यावा हे बरे! —संपादक ]